<u>ठाणे महानगरपालिका,ठाणे.</u>

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :२६.०३.२०१०.

<u>ठाणे महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत</u>
<u>सभा क्रमांक २० दिनांक २६.०३.२०१०</u>
<u>सभा सूचना कमांक ११ दिनांक ०८.३.२०१०.</u>
<u>सभा क्रमांक २ दिनांक २६.०३.२०१०</u>.

ठाणे महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार दिनाक २३.०३.२०१० रोजी सभा सूचना क्रमांक ११, दि.०८.३.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरीता बोलाविण्यांत आली होती. परंतू सदरहू दिवशी गणपुर्तीअभावी सभा तहकूब झाल्याने, सदरची सभा शुक्रवार दि.२६.०३.२०१० रोजी ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न " डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात "सकाळी ठिक १२.३० वा.सभा सूचना क्रमांक ११, दि.०८.३.२०१०रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरीता आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर श्री.अशोक बारकु वैती हे उपस्थित होते.

सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे
१) श्री. अशोक बारकू वैती- मा.महापौर .
२) श्री. मनोज विठ्ठल लासे- मा. उप महापौर

| | |
|---|---|
| ३. श्री.सारंग राजेश नामदेव | ४.श्री.पाटील बाळकृष्ण पुंडलिक |
| ५. श्री मधुकर रामचंद्र पावशे | ६. श्रीमती पाटील कविता सुरेश |
| ७. श्री.जयनाथ यशवंत पुर्णेकर | ८.श्री.आनंदा तुकाराम केसरे |
| ९. श्री.रामचंद्र लहू फडतरे | १०.सौ.शिंदे मिनाक्षी राजेंद्र |
| ११. सौ.ताई मारुती भोंडवे | १२. श्री.दिनेश मनोर पाथरे |
| १३. श्री.जगदाळे हणमंत ज्ञानू | १४. श्री. राजेश रामचंद्र ठाकूर |
| १५. श्रीमती अनिता अशोक सावंत | १६. श्रीमती इंदिसे द्रौपदाबाई जगदीश |
| १७. श्री.नागसेन (भैय्यासाहेब)गंगाराम इंदिसे | १८. सौ.वनिता गंगाराम इंदिसे |
| १९. श्री. सुरेश दाजी भोईर | २०. श्री.भोईर संजय देवराम |
| २१. श्री.भोईर देवराम लक्ष्मण | २२. श्री.रविंद्र माणिक पाटील |
| २३. श्रीमती तरे महेश्वरी संजय | २४. श्रीमती छाया मनोहर राव |
| २५. सौ. परिषा प्रताप सरनाईक | २६. श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे |
| २७. श्री.बारटक्के दिलीप चंद्रकांत | २८. श्रीमती यादव केवळादेवी रामनयन |
| २९. श्रीमती राधा फत्तेबहादूर सिंह | ३०. श्री.कांबळे सुरेश चंदू |

2.. ..

३१. सौ.एकता एकनाथ भोईर
३२. श्री.दशरथ बाबुराव पालांडे
३३. श्रीमती अपर्णा नंदकुमार यादव
३४. कु.योगिता रमेश वैती
३५. श्री. संतोष वसंत वडवले
३६. श्री.सोनार संजय प्रभाकर
३७. श्री.राऊळ अशोक राजाराम
३८. श्री.कोकाटे सुधीर विष्णू
३९. श्रीमती मुल्ला फातिमा अंजूम मुहम्मद असिफ
४०. श्रीमती कदम रुपाली रमेश
४१. श्री.पाटणकर मिलिंद माधव
४२. श्री.पाटील उमेश काशिनाथ
४३. सौ.गौरी अनिता सुनिल
४४. श्री.कांबळे दिनेश दाजी
४५. सौ.साळवी अपर्णा मिलींद
४६. श्रीमती खातू सुरेखा सुरेश
४७. श्री. अशोक नारायण भोईर
४८. श्री.मिलिंद भारत पाटील
४९. सौ.प्रमिला मुकूंद केणी
५०. श्रीमती शांता शामजी सोलंकी
५१. श्री.बिष्ट महदिप उर्फ मुन्ना
५२.सौ.स्मिता सुभाष इंदुलकर
५३. श्रीमती सुहासिनी (प्रतिभा) सुनिल लोखंडे
५४. श्री.नारायण शंकर पवार
५५. श्री.सामंत विलास शिवराम
५६. श्री.वाघुले संजय संतू
५७. श्रीमती पाटील सुजाता भास्कर
५८. श्रीमती अनिता हिराकांत फर्डे
५९.श्रीमती देशमुख स्मिता मधुकर
६०.श्री.जनार्दन कृष्णा खेतले
६१.श्री.वैती हरीश काशिनाथ
६२.श्री.होडावडेकर मधुकर विठठल
६३.श्री.राम पांडुरंग रेपाळे
६४.श्रीमती सुनिता (ताई) सुरेश सावंत
६५.श्री.मनोज तुकाराम शिंदे
६६.श्री.कणसे घनश्याम शिवाजी
६७.श्री.घाग चंद्रगुप्त सिताराम
६८.श्री.फाटक रविंद्र सदानंद
६९.श्री.मोरे संजय भाऊराव
७०.सौ.संगिता मिलिंद बनकर
७१.श्री.सावंत शैलेश तुकाराम
७२. श्री.भरत अभिमन्यु चव्हाण
७३. श्री.पांडुरंग गोविंद पाटील
७४. श्री.खारकर राजेश आत्माराम
७५. श्री.लक्ष्मण (लच्छू)चंदुमल टिकमाणी
७६. श्री.सचिन जयराज म्हात्रे
७७. श्री.राऊत प्रकाश हरिश्चंद्र
७८. श्री. गणेश यशवंत साळवी
७९.श्री.खारकर सुभाष आत्माराम
८०. श्री.सैय्यद अली अशरफ उर्फ भाईसाहेब
८१. सौ.मनिषा महेश साळवी
८२. श्री.मढवी रमाकांत दशरथ
८३. श्री.साप्ते राजेंद्र रमेश
८४. सौ. अनिता राजन किणे
८५. श्री.कुरेशी यासीन अय्युब
१०८. श्रीमती नाईक हफीजा नसरुददीन
८७. श्री.शिवदास नाना भगत
८८. श्रीमती शेख रजिया इकबाल
८९. श्री.राजन नारायण किणे.
९० श्री. म्हात्रे दिलीप रतन
९१. श्री. डांगरे सिराज अहमंद अली
९२. श्री. नरेश गणपत म्हस्के
९३. श्री. अनिल गजाानन सावे
९४. श्री. मिलींद मनाहेर साळवी

**रजा सदस्य :-**

१.श्री.शैलेश तुकाराम शिंदे

**गैरहजर सदस्य :-**

| | |
|---|---|
| १.श्री.संजय रामचंद्र तांडेल | २.श्री.सुधाकर वामन चव्हाण |
| ३.श्री.हरिश्चंद्र श्रीपत पाटील | ४.सौ.कल्पना हरिश्चंद्र पाटील |
| ५. श्रीमती शारदा दादू पाटील | ६.श्री.एगडे राम हरी |
| ७.श्री.कांबळे पद्माकर संभाजी | ८.श्री.विचारे राजन बाबूराव |
| ९.श्री.साळवी संतोष गजानन | १०.श्री.मुल्ला नजीब सुलेमान |
| ११.सौ.पाटील प्रभावती माणिक | १२.डॉ.जितेंद्र प्रभाकर वाघ |
| १३. श्रीमती कदम निता मदन | १४.सौ.घाग संगीता चंद्रगुप्त |
| १५.श्रीमती काकडे अनिता बालाजी | १६.श्री.भगत सुधिर रामचंद्र |
| १७. सौ.कोमुर्लेकर स्वाती महेंद्र | १८. श्री. महेंद्र वसंतराव कोमुर्लेकर |
| १९.श्री. अन्सारी असलम सलीम | २०. श्रीमती खान शगुफता नसीर |
| २१. सौ. राऊत आशरीन ईब्राहिम | २२. श्रीमती अन्सारी इमतियाजबानू उर्फ (बेबी आपा) |
| २३. श्री. सुभाष गणू भोईर | २४. श्री. पवन काशिनाथ कदम |
| २५. श्री. सन्नी वर्गीस थॉमस | |

श्री.मनोज शिंदे :

महापौर महोदय, माझी याठिकाणी एक सूचना आहे. दि.२३.३.२०१० रोजी अर्थसंकल्पावर जी महासभा होती ती आपण कोरमअभावी तहकूब केली होती. या सभागृहामध्ये कांही सदस्य येथे येऊन सहया करतात आणि निघून जातात. त्यामुळे माझी अशी सूचना आहे की, सकाळी आलेले सदस्य दुपारी जेवणापुर्वी जाण्याआधी व जेवणानंतर तसेच सभा संपण्याआधी अशा चार वेळा सहया घेण्यांत याव्यात, जेणेकरुन फुकटचा निधी घेऊन सदस्य जाणार नाहीत आणि जे ख-या अर्थाने याठिकाणी नागरीकांच्या समस्या मांडतात ते देखिल उत्स्फुर्त होतील.

मा.महापौर :

सन्मा.सदस्य श्री.मनोज शिंदे यांनी जी सूचना केली आहे ती प्रतोद यांना देण्यांत येत आहे की, त्यांनी प्रत्येक तासाला कोण कोण सदस्य उपस्थित आहेत याची नोंद आपल्या पक्षप्रमुखांना दयावी.

मा.अतिरिक्त आयुक्त :

महापौर महोदय,कॅफो श्री.नाईक हे रजेवर गेले असल्याने त्यांचा तात्पुरता चार्ज श्री.निपुर्ते यांना देण्यांत आलेला आहे. व ते आजच्या सभेत उपस्थित आहेत.

श्री.राजेश ठाकुर :

महापौर महोदय,दि.२३.३.२०१० रोजीच्या महासभेत कोरमच्याअभावी माझ्या कांही सूचना अपु-या राहिल्या होत्या त्या मी आजच्या सभेला पुर्ण करीत आहे.

महापौर महोदय,रस्ता या बाबत माझा विषय चालू होता. घोडबंदर रोडवर ज्यावेळी आपण काँक्रिटीकरण केले,त्यावेळी आपल्या अधिका-यांमार्फत कांही हरकती व सूचना आल्या पाहिजे होत्या. आज त्या रस्त्यावर पुर्वी जी गांवे होती त्याठिकाणी आज सिग्नल आलेले आहेत. अशाठिकाणी रस्ता बनविण्याअगोदर सब-वे दिले असते तर आज आपल्याला तेथे सिग्नलची गरज नसती व आज जे रोज अपघात होत आहेत ते झाले नसते. तरी यापुढे अशाप्रकारचे जेव्हा आपण प्रकल्प हाती घेऊ त्यामध्ये गांभिर्याने पुढे भविष्यात अडचण येणार नाही,यादृष्टीने याठिकाणी सन्मा.सदस्य असतात त्यांना सुध्दा विचारुन की आपल्या कांही सूचना आहेत कां याबाबत विचारणा करावी कारण आम्ही सुध्दा चांगल्या सूचना देऊ शकतो,परंतू आमच्याकडून त्या कधी घेतल्या जात नाहीत. सॅटीस प्रकल्पाबाबत कालच्या ठाणे वृतांत या वर्तमानपत्रामध्ये फोटो आलेला आहे,व त्यामध्ये म्हटले आहे की,सॅटीस हा प्रकल्प रिक्षावाल्यांसाठी व फेरीवाल्यांसाठी आहे.आज त्याठिकाणी फेरीवाल्यांचे अतिक्रमण झालेले आहे. परंतू आपल्याकडून याबाबत कांहीच योजना आखल्या जात नाहीत. तरी याबाबत माझी एक सूचना आहे की,या फेरीवाल्यांवर नियंत्रण आणण्यासाठी एक वेगळा विभाग आपण स्थापन करावा .कारण आज अतिक्रमण एवढे वाढलेले आहे व त्याप्रमाणात अतिक्रमण विभागाकडे पुरेसा स्टाफ नाही. आज जर कोठे कारवाई करायची असेल तर प्रत्येक प्रभाग समितीमधून तेथील वॉर्ड ऑफीसरला व तेथे काम करणा-या कर्मचा-यांना कोठेही अचानक बोलाविले जाते. व त्यांना जर कोठे फेरीवाल्यांना हटविण्याकरीता राऊंड मारायला सांगितले तर ते सांगतात की आज आम्हाला मुंब्रा येथे किंवा कळवा येथे कारवाईला जायचे आहे,ही कारणे सांगितली जातात. महापौर महोदय, आपला सुध्दा अधिकार आहे की,आपण त्या फेरीवाल्यांसाठी कांहीतरी विचार केला पाहिजे.

महापौर महोदय, आज ठाणे महापालिकेचे मार्केट याकरीता ब-याच कांही योजना आखलेल्या आहेत. आज ठाणे महापालिकेचे जुने मार्केटस् आहेत त्या सर्व मार्केटची अवस्था अतिशय खराब झालेली आहे. आज आपण २१ व्या शतकाकडे जात असताना मॉल संस्कृती ही खुप वाढत चाललेली आहे. आज आपल्या ठाण्यामध्ये चार ते पाच मॉल झालेले आहेत. व याचप्रमाणे हे जे जुने मार्केट आहेत ते या मॉलप्रमाणे आपण जर विकसित केले आणि एकाचठिकाणी केले तर जो सामान्य माणुस असतो त्याची सुध्दा इच्छा असते एकाचठिकाणी एकाचधर्तीवर एखादया मॉलमध्ये गेल्यावर सर्वच वस्तु घेऊन तो घरी गेला पाहिजे. तरी अशी जी मार्केट आहेत ती मॉलप्रमाणे सुसज्ज केली तर त्याचा फायदा तेथील नागरीकांना होईल. आज आपल्या ठाणे शहरात किती फेरीवाले आहेत याची गणना नाही. आपल्या महापालिकेचे अधिकारी हे संध्याकाळी पाच व दहा रुपयांची पावती फाडतात तरी त्यांना जरी आपण विचारले की तुम्ही आज किती फेरीवाल्यांच्या पावत्या फाडल्या तरी आपल्याला एकुण आकडा समजेल. व या फेरीवाल्यांसाठी त्या त्या प्रभागामध्ये कोठे कोठे मार्केट असायला हवेत याची आपण चौकशी केली पाहिजे व ज्या भागामध्ये जास्त फेरीवाले आहेत त्या भागामध्ये आरक्षण ठेऊन तेथे नविन बाजार आपण बांधू शकतो,व त्यामुळे भविष्यातील पिढीला त्याचा भरपूर फायदा होईल.कारण आत्ताच दूरदृष्टी ठेवली तर पूढे येणारे प्रश्न आपण आज सोडवू शकतो.

महापौर महोदय, आज महापालिकेच्या ज्या मालमत्ता आहेत त्यांचासुध्दा पुनर्विकास करण्याचा चांगला धोरणात्मक निर्णय आहे. जवळजवळ २५ कोटी मागासवर्गीय निधी नगरसेवक निधी सुध्दा त्यामध्ये वाढविलेला आहे. यावेळी नगरसेवकनिधी हा १४ लाखापर्यंत वाढविणार आहात परंतू ते फक्त कागदावरच आहे की आमच्या मनाला दिलासा मिळण्यासाठी आहे याचे रहस्य मला समजले नाही. कारण दरवर्षी बजेट मिटींगला निधी वाढवा म्हणून सांगत असतो. ज्यांचे विभाग मागासवर्गीय आहेत त्यांना निधी पुरेसा मिळतो.ज्यांचा डोंगराळ भाग आहे त्यांना निधी पुरेसा मिळतो.सांगायचे तात्पर्य असे की,डोंगराळ भागाच्या निधीबाबत बोलायचे झाले तर माझा लोकमान्यनगरचा हा भाग डोंगराळ आहे ,एखादया नगरसेवकाचा वॉर्ड डोंगराळ असला परंतू तेथे १०० ते १५० घरे असली तरी त्यांना सुध्दा तेवढाच निधी आणि माझ्या भागामध्ये जवळजवळ ७०० ते ८००घरे असतील तरीसुध्दा मला तेवढाच निधी आहे. तरी हा दुजाभाव होत आहे. जे डोंगराळ भागामध्ये राहतात त्यांच्या गरजा त्याप्रमाणे त्या निधीच्याअभावी आम्ही पुरवू शकत नाही. तरी डोंगराळ भागातील निधीचे वाटप आपण व्यवस्थित केले पाहिजे. त्याचप्रमाणे जेएनएनयुआरएमकडून आपल्याला शासनाचा भरपूर निधी मिळतो तो निधी आपण ठाणे शहरातील मोठमोठया भागामध्ये मग ते एसआरए किंवा एसआरडी असुदे त्याकरीता आपण वापरतो . तरी या निधीतील कांही वाटा हा नगरसेवकांना वर्ग केला तर त्यातील कमीतकमी १०० कोटी दिले तर दहा दहा लाख वर्षाला प्रत्येक नगरसेवकाला त्यांच्या भागांत तेथील नागरीकांच्या आवश्यकतेनुसार आपण तेथे काम करु शकतो. नगरसेवक निधीअभावी कांही अडचण असल्यामुळे अधिका-यांच्या मागे लागावे लागते तरी ही वेळ येता कामा नये. प्रत्येक नगरसेवक हा नागरीकांची कामे करण्यासाठी असतो त्यांचे प्रतिनिधीत्व येथे करीत असतो. अशावेळी त्यांच्या सांगण्याप्रमाणे एखादे काम होत नसेल मग त्या प्रतिनिधीत्व करण्यामध्ये कांहीच अर्थ रहात नाही. व नागरीकांसमोर जाण्यास आम्हाला प्रश्न पडतो. जेएनएनयुआरएममार्फत आपण एसआरए व एसआरडी या स्किम चालवित असतो. आमचा लोकमान्यनगरचा एक विभाग आहे हा विभाग जवळजवळ पाच ते सहा वॉर्डाचा मिळून एक विभाग आहे व पाच ते सहा नगरसेवक या भागामध्ये आहे. तरी माझी एक सूचना आहे की,या नविन

प्रकल्पामध्ये नविन रस्ते घेतलेले आहेत परंतू त्यामध्ये आमचे रस्ते घेतलेले नाहीत तरी ते रस्ते या नविन प्रकल्पामध्ये घ्यावेत अशी माझी सूचना आहे. व रस्त्याचे नाव हत्ती पुल ते चौकीपाडा व हत्ती पुल ते डवलेनगर येथील टीएमटी डेपो तसेच राजा शिवाजी येथील जुना बसस्टॉप हे तीन रस्ते डिपीमध्ये आपण घेतले तर आज तो सामान्य नागरीकांचा विभाग आहे आज तेथील नागरीकांची अशी अडचण आहे की या नागरीकांना जर सकाळी पाच वाजताची बस पकडायची असेल तर पहाटे चार वाजता घरातून निघावे लागते कारण राजा शिवाजी या बसस्टॉपपर्यंत यायला पंधरा ते वीस मिनिटे लागतात व शेवटाचा बस स्टॉप डवलेनगर हा आहे.तरी या गावामध्ये हे रस्ते झाले व तेथील घरे हे एसआरए किंवा एसआरडीमध्ये घोषित करुन तेथे आपण डेव्हलपमेंट करु शकतो आणि चांगल्या सुखसोयी तेथील नागरीकांना देऊ शकतो व तेथील सर्वच प्रश्न सुटले जातील.व त्या भागाचा विकास होईल. तरी मा.आयुक्त महोदय माझी विनंती आहे की यावर्षीच्या प्रकल्पामध्ये हे तीन रस्ते आपण समाविष्ट करावेत.

त्याचप्रमाणे आयुक्त महोदय,पाण्यासंदर्भात मी आपल्याला पत्र दिले होते की,आमच्या भागामध्ये पाहणीकरीता यावे. कारण आमच्या भागामध्ये फॉरेस्टच्या बाजुला पाण्याच्या टाकीकरीता जागा पाहिली होती व दुसरी जागा म्हणजे महापालिकेचेच आरक्षित गार्डन आहे त्या भागामध्ये आम्हाला एक पाण्याची टाकी हवी आहे, कारण आमच्या एका भागामध्ये दिवसांतून फक्त एक तासभरच पाणी मिळते. आमचा भाग हा डोंगराळ असल्यामुळे पाण्याचे प्रेशर कमी असते. तरी आयुक्त महोदय आपण स्वत: तेथील पाहणी केली तर आमच्या भागाच्या कांही सूचना आहेत ते जर जागेवर पाहिल्या तर खूप आनंदाची गोष्ट असेल व तेथील नागरीकांना सुध्दा दिलासा वाटेल. त्याचप्रमाणे पाण्याच्या टाकीच्या सुरक्षेबाबत मला बोलायचे आहे की,रात्रीच्यावेळी पाण्याच्या टाकीवर व पाण्याच्या टाकीच्या खाली कांही लोक ज्यांची समाजात कांहीच किंमत नसते ते अशावेळी तेथे दारु प्यायला बसतात व एखादा वॉलमन तेथे पाणी सोडायला गेला तर त्याला मारहाण करायची असे प्रकार लोकमान्यनगर पाडा नं.४ येथे असे प्रकार हे आठवडयातून दोन ते तीनवेळा होत असतात.व याबाबत तक्रारसुध्दा केली होती परंतू त्याबाबत कांहीच कारवाई झाली नाही. जर उदया कोणी त्या टाकीवर दारु पिऊन चढला व खाली पडला तर महापालिकाच बदनाम होणार आहे. तरी सुरक्षा रक्षकाबाबत माझी एक सूचना आहे की,प्रभागवाईज सुरक्षा रक्षक नेमण्याची आपण परवानगी दयावी. तसेच सुरक्षा रक्षक ठेवताना तेथील स्थानिकांना जास्त प्राधान्य दिले तर बरे होईल व तेथील स्थानिक रहिवाशाचा दहा वर्षाचा रहिवासाचा दाखला घेऊन सुरक्षा रक्षक नेमले तर एका गरजू व गरीब रहिवाशाला नोकरी सुध्दा मिळेल.

आयुक्त महोदय मी क्रीडा व सांस्कृतिक कमिटीमध्ये मी सदस्य आहे. परंतू आम्ही त्या कमिटीचे सदस्य असुन आमच्या कांही सूचना घेतल्या जात नाहीत. ठाणे महापालिका हद्दीमध्ये जेव्हा दुस-या दिवशी कांही कार्यक्रम असतो त्याच्या आदल्यादिवशी आम्हाला आमंत्रण मिळते.परंतू त्या कार्यक्रमाचे कोणी आयोजन केले असते याची आम्हाला कांहीच कल्पना नसते. तरी या समितीमार्फत ठाण्याची संस्कृती जपण्याचे काम या समितीने केले पाहिजे. ठाण्यामध्ये कोणत्याही समाजाचे सांस्कृतिक कार्यक्रम असुदेत.कौपनेश्वर मंदिरातर्फे आत्ताच गुढीपाडव्याला चांगले आयोजन करण्यांत आले होते ,आपल्या महापालिकेतर्फे कौपनेश्वर मंदिराला कांही मानधन देण्यांत आले नव्हते. आज ठाण्याची संस्कृती अशा कांही संस्था जपत आहेत.

महापौर महोदय, महापालिकेची मालमत्ता व इतर संबंधित मालमत्तेचा पुनर्विकास करण्याकरीता, मत्सालय तसेच दादोजी कोंडदेव,किंवा गडकरी रंगायतनचे नुतनीकरण असुदे व इतर याकरीता जवळजवळ २१ कोटी ९० लाखाची तरतुद केलेली आहे. ही तरतुद करीत असताना समितीला विचारण्यात आले नाही. आम्ही सुध्दा याबाबत नागरीकांकडून कांही हरकती घेतल्या असत्या, वर्तमानपत्रामार्फत विचारणा करण्यांत आली असती. ठाण्यातील उपवन तलाव हे पुर्वी सहलीकरीता जाण्यासाठी ठिकाण होते. आज उपवन तलावाचे सुशोभिकरण करुन चांगले बनविण्यांत आलेले आहे. परंतू आज तेथे जर संध्याकाळी कुटुंबाबरोबर फिरावयास जायचे म्हटले तर लाज वाटेल अशा प्रकारच्या तेथे घटना होत असतात,आज त्याठिकाणी प्रेमीयुगुल कट्टयावर बसलेले असतात. तरी माझी एक सूचना आहे की, उपवन तलावाला लागून संजय गांधी नॅशनल पार्कची जागा आहे तरी त्यातील एखादी छोटी जागा आपण फॉरेस्टकडून मागू शकतो तरी तेथे सहलीसाठी पॉईंट झाला पाहिजे अशी माझी सूचना आहे. आज संजय गांधी नॅशनल पार्कमुळे आपल्याकडे प्रदुषण कमी आहे. तरी महापालिका आणि संजय गांधी नॅशनल पार्क यांच्या संयुक्त विदयमाने एकत्र येऊन येऊर येथे एखादे राणीचे बाग नॅशनल पार्क कडून किंवा आपण केल्यास लहान मुलांसाठी ती चांगली जागा होईल.

महापौर महोदय,शहरविकास विभागाकडे जेव्हा सँशन करायला जातो तेव्हा एक नियम काढला आहे की, तुम्ही पाण्याचे संवर्धन करायला पाहिजे. येऊरचे जेवढे पाणी ते सर्व गायमुख येथील समुद्राला जाऊन मिळते. व ते सर्व फुकट जाते. आज तेथे किती पाणी साठवू शकतो आणि किती पाणी दरवर्षी वाया जाते याचा आपण आजपर्यंत सर्व्हे केलेला नाही. ठाण्याच्या नशिबाला एवढे मोठे येऊर मिळाले असताना तेथे जर एखादे धरण बांधल्यास ठाण्याचे पाणी पुरवू शकेल एवढी मोठी जागा आहे, तेथील सर्व पाणी हे चायना क्रिक येथे येते आणि ते सर्व गायमुखला मिळते व वाया जाते तरी हे सर्व पाणी आपण तेथे धरणाची मागणी करण्यांत यावी,आज ठाण्याला चार चार आमदार लाभालेले आहेत त्यातील आज सभागृहात दोन आमदार उपस्थित आहेत. त्याचप्रमाणे क्रीडा व सांस्कृतिक कमिटीला वर्षातून दोनदा अभ्यासदौ-यासाठी कुठेतरी पाठविले गेले पाहिजे.परंतू याकरीता बजेटमध्ये कांहीच तरतुद करण्यांत आलेली नाही. कारण आम्ही जेव्हा या समितीमध्ये सदस्य म्हणून जातो तेव्हा तेथे काय करायला पाहिजे याबाबत कोणी मार्गदर्शन दिलेले नाही.एखादा अभ्यास दौराकेल्यास आम्हाला सुध्दा समितीमध्ये बोलू शकतो.तरी अभ्यासदौ-यासाठी तरतुद करण्यांत यावी,अशी माझी सूचना आहे.

कालच सन्मा.सदस्या सौ.अपर्णा साळवी यांनी प्राथमिक शिक्षणाबाबत चांगले भाषण केले.आता शिक्षकांना निवडणुकीच्या कामासाठी डयुटी लागणार नाही व याबाबत राज्य शासनाने चांगला निर्णय घेतला आहे व त्याचे मी स्वागत करतो. परंतू त्याचबरोबर आपल्या ठाणे महापालिकेच्या हद्दीमध्ये जे प्राथमिक शिक्षण आपण देतो त्याचा दर्जा हा कोठेतरी खालावलेला दिसत आहे. महापौर महोदय,१९४७ पुर्वी जेव्हा आपला देश स्वातंत्र झाला त्यावेळी शिक्षण घेत असताना त्या शिक्षकांच्या डोळयासमोर एक उद्देश होता की देश स्वातंत्र्य झाला पाहिजे व त्याबाबतचे धडे सुध्दा त्यांनी त्यावेळेच्या पिढीला दिले होते आणि त्यामुळे आपण इंग्रजांच्या कचाटयातून सुटलो अशी एवढी मोठी संस्कृती ही आपल्या भारताची असताना आज आपल्या ठाणे महापालिकेचे शिक्षक यांना वंदे मातरम् आणि जन-गण-मन बोलण्याससुध्दा कंटाळा आलेला आहे की हे राष्ट्रगीत बोलताना त्यांची तारांबळ उडते.याबाबत हलगर्जीपणा करुन चालणार नाही तरी असे होत असेल तर आपल्याकडून त्यांना मेमो

दिला गेला पाहिजे. कारण हा देशाचा प्रश्न आहे. आयुक्त महोदय,आपले जे शिक्षणाधिकारी आहेत त्यांना आपण सूचना दयाव्यात व अशा शिक्षकांना नोटीस देण्यांत यावी. आज महापालिकेच्या शाळांमध्ये खिचडीचे वाटप केले जाते.यामध्ये कांही स्थानिक महिला बचत गट असतात व इतर कांही संस्था असतात यांच्यात वाद निर्माण होतात. तरी माझे असे म्हणणे आहे की, ज्या भागामध्ये तीन ते चार वर्ष महिला बचत गट जुने झाले आहे अशा लोकांना जास्तीतजास्त प्राधान्य देण्यांत यावे. तसेच महिला बचत गट स्थापन करण्याबाबत कांहीतरी नियम असायला पाहिजे. तसेच महिला बचत गट स्थापन केल्यानंतर त्या गटातील एकतरी महिला सुशिक्षित असायला हवी. त्याचप्रमाणे मी मगाशी मॉलसंदर्भात बोललो तरी त्याठिकाणी सुध्दा महिलांकरीता व्यवसाय करण्याकरीता व प्रशिक्षण देण्याकरीता आरक्षण ठेवण्यांत यावे.

आयुक्त महोदय,आरोग्याबाबत बोलायचे झाले तर आपल्याकडे एखादया सामान्य नागरीकाला आरोग्याबाबत उपचार घ्यायचा असेल तर ते न पडवडणारे आहे.कारण डॉक्टरी पेशा हा सध्या पैसे कमविण्याचा धंदा झालेला आहे.त्याबाबत माणुसकी राहिलेली नाही. आज आपले छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पीटल जे आहे ते आपण अदयाप सुसज्ज असे करीत नाही. आज ज्युपिटर हॉस्पीटल,कौशल्या हॉस्पीटल नावाजली आहेत परंतू आपले हॉस्पीटल कां नावाजले नाही याच्यामागची कारणे आपण शोधली नाहीत. आपल्या हॉस्पीटलमधील कांही डिपार्टमेंट अशी आहेत की ते ५०टक्के अनुदान महापालिकेकडून आणि ५० टक्के नागरीकांकडून घेऊन देऊ शकतो परंतू त्यासाठी एखादी समिती नेमण्यांत यावी.कळवा प्रभाग समितीच्या नगरसेवकांकडूनच याबाबतीत ओरड केली जाते कारण त्यांच्या भागातील लोकच तेथे जातात. कारण आमच्या भागातील नागरीकांना सदर रुग्णालयांत जायचे म्हटले तर अर्धा ते पाऊण तास लागतो व त्यातच कळवा येथील ब्रिज ओलांडताना एखादया रुग्णाचा जीवसुध्दा जाऊ शकतो,अशी परिस्थिती आहे. आपल्याकडे एकुण नऊ प्रभाग समित्या असुन प्रत्येक प्रभाग समितीमध्ये एखादे सुसज्ज असे हॉस्पीटल कमीतकमी ३०० ते ४००खाटांचे आपण केले पाहिजे. आज वागळे विभाग किंवा रायलादेवी याठिकाणी एमआयडीसीच्या भरपूर जागा मोकळया आहेत. तरी याबाबत शहरविकास विभागाला सांगून योग्य अशाठिकाणी हॉस्पीटलकरीता आत्ताच आरक्षण ठेवले तर भविष्यांत तेथे हॉस्पीटल बांधू शकतो. तरी प्रत्येक प्रभाग समितीवाईज एक हॉस्पीटल प्रत्येक मशिनरीसहीत व्हायला पाहिजे तसेच प्रत्येक प्रभाग समितीमध्ये एक फिरता दवाखाना असणे आवश्यक आह. आपल्याकडे एकच फिरता दवाखाना संपूर्ण ठाणे महापालिका हद्दीत फिरत आहे.

महापौर महोदय,१९८५ साली बनविण्यांत आलेला विकास आराखडा व त्यावेळी टाकण्यांत आलेले आरक्षण आणि त्यानंतर ते आरक्षण दुसरीकडे नेणे असे प्रकार आपल्याकडे भरपूर झालेले आहेत. आज वर्तकनगर भागामध्ये स्मशानाची आवश्यकता असताना तेथे स्मशानभूमी नाही.रेमंड कंपनीची पोखरण रोड नं.२ ला एक एंट्री आहे त्याठिकाणी एखादी जागा स्मशानासाठी आरक्षित करावी.कारण पुर्वीसुध्दा तेथे दफानभूमी होती. तरी तेथे स्मशानभूमीचे आरक्षण केले तर भविष्यांत वसंत विहार व पोखरण नं.२ येथील नागरीकांना ते सोयीचे होईल.

महापौर महोदय,अर्थसंकल्पावर पान क्र.२ वर ठाणे शहरातील महिलांकरीता विविध योजनांचा उल्लेख करण्यांत आलेला आहे. परंतू पान क्र.२३ वर मुद्दा क्रमांक ५वर ज्याप्रमाणे उल्लेख करण्यांत आलेला आहे त्याप्रमाणे तरतुद करुन सुध्दा आपण खर्च केलेला नाही. व आता आपण नविन आठ कोटीची तरतुद केलेली आहे,तरी ही खेदाची बाब आहे. जर शासनाकडून ५ टक्के

निधी उपलब्ध करुन देणे अपेक्षित असतानासुध्दा त्या निधीची मुदत संपली जाते व तो निधी वापरला जात नाही. महापौर महोदय, महिला व बालकल्याणचा जो निधी आहे त्यामार्फत आपण चांगले उपक्रम राबवू शकतो.त्यांच्यासाठी आपण शिबिरे लावू शकतो.

मा.महापौर :

या सर्व योजना चालू झालेल्या आहेत.

श्री.राजेश ठाकूर :

महापौर महोदय,असे असेल तर गेल्यावर्षी सात कोटी रुपये निधी कां वापरला गेला नाही. गेल्यावर्षीच्या बजेटमध्ये तरतुद असताना तो निधी वापरला गेला नाही.

मा.महापौर :

आपण एक तास चर्चा करत आहात तरी आपली वेळ संपलेली आहे.

श्री.राजेश ठाकूर :

महापौर महोदय, अजून फक्त दहा मिनिटे मला बोलण्यास दयावी कारण मला पाण्याविषयी थोडेसे बोलायचे आहे.

मा.महापौरः

पांच मिनिटे वाढवून देण्यांत येत आहे.

श्री.राजेश ठाकूर :

महापौर महोदय,परिवहनच्या आता ज्या बसेस शसनाकडून जेएनएनयुआरएमकडून आल्या आहेत.भिवंडी येथे त्या बसेस अजून उभ्या आहेत. अदयाप त्या बसेस टीएमटीकडे सुपुर्द कां केल्या नाहीत याचे कारण आम्हाला समजलेले नाही. आज टीएमटीची परिस्थिती खालावलेली आहे. तेथील अडीच ते तीन हजार कर्मचा-यांचा आपण विचार करायला पाहिजे.टीएमटीची आज अशी परिस्थिती आहे की ही सेवा आज बंद पडेल की उदया पडेल,व नंतर ती बेस्टला देणार आहे की कांय याबाबत त्यांच्यामध्ये शंका आहे. आमच्या भागातील डौलेनगर येथील जागा आपण बेस्टला दिलेली आहे. असे टीएमटीचे बरेच आगार आहेत ते सुध्दा आपण अशाचप्रकारे बेस्टला देणार असाल तर आपली जी टीएमटी बससेवा आहे त्यांचे पूढे कांय करणार आहात?ज्या दोनशे बसेस येणार आहेत त्यावेळी हया कर्मचा-यांचे बेस्टमध्ये वर्गीकरण करणार आहात कां?आज आम्ही लोकप्रतिनिधी असल्यामुळे आम्हाला नागरीकांचा तसेच आपल्या या टीएमटी कर्मचा-यांचा सुध्दा विचार करावा लागतो. कारण आपल्याच विभागातील नागरीक तेथे कर्मचारी म्हणून काम करीत असतो व आपल्याच भागातील नागरीक त्या बसमधून प्रवास करीत असतात. तरी यांचा ताळमेळ जुळुन या कर्मचा-यांना न्याय दिला पाहिजे.अन्यथा त्यांना व्हीआरएस देऊन त्यांना पैसे देण्यात यावे जेणेकरुन ते त्या पैशातून स्वत:चा कांही धंदा करतील. कारण या टीएमटीमध्ये त्यांनी किती दिवस ताठकळत रहायचे? तरी महापौर महोदय आपण याबाबतीत स्वत:लक्ष घालावे व याबाबतीत विचार करावा.

महापौर महोदय, पाण्याविषयी थोडे बोलत आहे. आजसुध्दा मुलुंडमध्ये पाण्याची पाईपलाईन फुटली व नदीसारखे पाणी संपूर्ण रस्त्यावर आलेले आहे. आयुक्त महोदय,पाण्याच्या गळतीबद्दल आपल्याकडून कांही ठोस निर्णय घेतले जात नाही. पाण्याची गळती झाल्यानंतर तेथील संबंधित अधिकारी तेथील गळती थांबविण्याच्यामागे असतो परंतू त्याला दुरुस्तीकरीता जो खर्च असतो तो त्याला वेळेवर मिळत नाही आणि मग ठेकेदाराला हातपाय पडून तु हे काम कर तुझे बिल नंतर काढतो.म्हणजे बिनाफाईलने त्यांना ती गळती थांबवायला लागते आणि ही प्रॅक्टीकल परिस्थिती

आहे.त्यामुळे तेथील अधिका-याला दोष देऊन कांहीच उपयोग नाही. तरी ही गळती थांबविण्यासाठी कांही ठोस उपाययोजना असल्या पाहिजेत. व याकरीता आपण एक पथक स्थापन केले पाहिजे.व ही सेवा प्रत्येक प्रथागनिहाय करण्यांत यावी. त्याचप्रमाणे महापौर महोदय, प्रत्येक प्रभागवाईज आपण पाण्याचा पुरवठा करीत असतो. आपण याबाबतीत एक निर्णय घेतला होता की,ज्या प्रभागातून महसुल कमी येईल तेथील पाण्याची कपात करण्यांत येईल. हा निर्णय माझ्या मते चुकीचा निर्णय वाटतो. आयुक्त महोदय,आपण प्रत्येक प्रभागवाईज किती पाणी देतो याची नोंद असते. आज माझ्या प्रभागात चोविस तासाने किंवा पस्तीस तासाने फक्त एक तास पाणी मिळत असेल व इतर ठिकाणी चोविस तास पाणी मिळत असेल तर हा दुजाभाव कोठेतरी थांबविली पाहिजे व याकरीता टाक्यांची सोय आणि पाण्याचे मिटर ज्या भागामध्ये पाण्याच्या टाकीतून कोठेकोठे सप्लाय जातो त्याठिकाणी एक मोठा मिटर लावून त्या टाकीतून खरोखरच किती पाणी बाहेर जाते आणि त्यातून लोकांकडून आलेला महसुल किती आहे याबाबत जमा आणि खर्च याची मोजणी केली पाहिजे आणि त्यामुळे आपल्याला समजेल की खरोखरच या भागामध्ये पाणी आपण किती देत आहोत व आपण त्यांच्याकडून किती बिल घेत आहोत.व या भागातील लोक चोविस तासातून फक्त तासभरच पाणी वापरत आहेत.व बिल वेळेवर पोहचले नाही ही नागरीकांची चूक नाही आणि वसुली झाली नाही म्हणून अधिकारी संबंधित ठिकाणी जाऊन तुम्ही बिल भरले नाही कनेक्शन कापण्यात येत आहे,परंतू बिलच जर वेळेवर पोहचले नाही तर नागरीकांचा दोष नाही.तरी माझी विनंती आहे की,आपण जे टॅक्स वसुल करतो त्यामध्येच पाण्याचे बिल समाविष्ट करण्यांत यावे.

महापौर महोदय,अग्निशमन दलातील प्रत्येक कर्मचा-यांचा विमा काढण्यात यावा,एवढी सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

श्री.अशोक भोईर :

महापौर महोदय,सन २००९-२०१० चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१०-२०११चे मूळ अंदाजपत्रक याठिकाणी स्थायी समिती सभापती यांनी आज या सभागृहामध्य्‍ सादर केलेला आहे. हा अर्थसंकल्प सादर करीत असताना २००९-२०१० मध्ये जे चोविस प्रकल्प होते ते लोकार्पण केलेले आहेत व त्याबद्दल मी मा.आयुक्त साहेब, नगर अभियंता यांना त्यांचेबरोबर जे जे सहकारी आहेत त्यांचे सुध्दी मी अभिनंदन करीत आहे.२०१०-२०११ च्या महसुली उत्पन्नावर चर्चा करीत असताना महत्वाचे उत्पन्न आपले जकात आहे.जकात हे सर्वात महत्वाचे उत्पन्न असताना त्या त्याठिकाणी सीसी टिव्हीची योजना कार्यान्वित करण्यासाठी २००७ सालापासून आपण चर्चा करतो परंतू सीसी टिव्हीची योजना अजुनपर्यंत कार्यान्वित झालेली नाही. ठाणे महापालिकेमध्ये जे एजंट आहेत ते सर्वात जास्त जकात चोरी करुन माल घेऊन येत असतात.व याबाबतची माहिती मी भट साहेबांना दिलेली होती. यांच्या टेंपोतून जो माल येतो हा जो माल असतो त्याची जी क्वाँटीटी असते ती कधीच पुर्ण दाखविलेली नसते.एखादया वस्तुची किंमत १०० रु.दाखविलेली असते त्याची खरी किंमत असते ५०० रुपये. अशारितीने हा माल चोरीने येत असतो. तशाचप्रकारची दुसरी चोरी होत असते ती भिवंडीहून येत असताना तेथील जकातनाक्यावर. तेथून प्रायव्हेट गाडया येत असतात,त्यामध्ये कांही गाडयांवर नगरसेवकाचा लोगो असलेल्या गाडया असतात. त्या प्रायव्हेट गाडयातून जे कॅमेरे असतात तसेच निरनिराळया ज्या उपयोगी वस्तु असतात त्या वस्तु ठाणे महापालिका हद्दीतून मुंबई येथे जात असतात,आणि त्याची चोरी ही त्या जकात नाक्यावरुन होत असते. आणि हया चो-या पकडण्यासाठी आपले जे दक्षता पथक असते त्यांना एखादया गाडीचा क्रमांक माहित पडला की ते त्या गाडीच्या मागे

धावत असतात. दक्षता पथकाचे काम असते. जकात व दक्षता पथक हे दुसरे काम कधीही करत नसतात फक्त जकातीवर ते त्यांचे लक्ष कॉंसनटेंट करतात व बाकी इतर ठिकाणी ते दुर्लक्ष करतात. त्यामुळे आपल्याला जकातीतून जे उत्पन्न मिळते तो आणखीन जास्त प्रमाणात वाढला जाईल याकडे कटाक्षाने लक्ष देणे गरजेचे आहे.

महापौर महोदय, दुसरा जो उत्पन्नाचा भाग आहे तो म्हणजे मालमत्ता कर. मालमत्ता कर हा प्रभाग समितीवाईज अजूनपर्यंत चांगल्याप्रकारे नोंद झालेली नाही. आपण याबाबत जर कॉलेजचे विदयार्थी यांचे पथक तयार केले आणि त्यांनाच जर जणगणना करायला सांगितली तर ते शकतील. आज आपला अधिकारी जर एखादी इमारत होते. आज समजा अनधिकृत इमारत बांधली जाते तर अनधिकृत इमारत जेव्हा बांधली जाते तेव्हा ती तीन महिन्यांत पुर्ण होते परंतू त्यांचा कर लावण्यासाठी तीन ते चार वर्ष घालविली जातात. मग तो अधिकारी त्यांचेशी कांहीतरी साटेलोटे करतो आणि मग त्यातून मालमत्ता कराचा नोंदणी झाली नसल्यामुळे आज हा जो प्रकार होतो व कमी उत्पन्न मालमत्ता करातून येते तरी या सूचनेची अंमलबजावणी तांतडीने याच सभागृहामध्ये विरोधी पक्षनेते आणि सभागृह नेते यांनी करावी कारण याप्रकारचा आपण जर सर्व्हे केला तर नक्की मालमत्ता करामध्ये चांगल्याप्रकारे उत्पन्न वाढेल व ते दोनशे करोडपर्यंत जाऊ शकेल. आणि त्यासाठी आपण कमिटी जरी नियुक्त केली तरी त्याचा फायदा होईल.

महापौर महोदय,तिसरी गोष्ट म्हणजे आपल्याकडे अग्निशमन दलामार्फत जे उत्पन्न येते त्याबाबत.आज संपूर्ण ठाणे महापालिका हद्दीमध्ये तळ+चार मजले हया अनधिकृत इमारती व्हायच्या परंतू आता ज्या झाल्या आहेत दहा माळे आठ माळे अशा झालेल्या आहेत अशा इमारतींना जेव्हा लिफ्ट लावली जाते तेव्हा त्याला कोणतीही एनओसी नाही आणि एनओसी नसल्याकारणाने हा जो भुर्दंड आपल्याला पडत आहे त्यामुळे आपले नाहक नुकसान होत आहे,व आपल्याला उत्पन्न मिळत नाही तरी याकडे सुध्दा प्रशासनोन लक्ष देणे गरजेचे आहे. आज अनधिकृत इमारतींमधून जे टॅक्स गोळा केला जातो यासाठी आपण दुप्पट कर आकारणी करतो. परंतू आपण जेव्हा दुप्पट कर आकारणी करतो तेव्हा कोठेतरी अनधिकृत बांधकामांना चालना दिली जाते अशाप्रकारचा मेसेज याठिकाणी जातो. आणि त्यामुळे ठाणे महापालिका अशाप्रकारचे अनधिकृत बांधकाम वाढविण्यासाठी डबल टॅक्स आकारते तो डबल टॅक्स आकारण्यासाठी प्रयत्न करता आणि तीच मालमत्ता लिगल केली जाते अशाप्रकारचा मेसेज लोकांमध्ये जातो. माझा असा उद्देश आहे त्याठिकाणी जो कोणी ब्लॉक घेईल त्याच्यावर सुध्दा एमआरटीपी कायदयाअंतर्गत कारवाई होणे गरजेचे आहे,मालकावर सुध्दा होणे गरजेचे आहे आणि जो बांधकाम करतो त्याच्यावरसुध्दा होणे गरजेचे आहे, आपल्याला माहित असेल की,जेव्हा अनधिकृत इमारती बांधतात तेव्हा मृत माणसाच्या नावाने तो प्लॅन मंजूर केलेला असतो व एमआरटीपी केस दाखल झाल्यावर तो जो माणुस मेलेला असतो त्याच्या नावाने केस दाखल होते तेव्हा दुसरा कोणीतरी डमी त्याच्या नावाने उपस्थित केला जातो. आणि त्यामुळे या अनधिकृत बांधकामाचे पेव फुटलेले आहे.आयुक्त महोदय आपणच अशाप्रकारचे स्टेटमेंट केलेले आहे की,भूमाफीया या ठाणे नगरामध्ये कोणीतरी आहे. जरी भूमाफीया हा बिल्डर असेल तर आपले अधिकारी यात सर्वात मोठा भूमाफीया आहे कारण तो अधिकारी त्या लोकांना सांगत असतो की, त्या जुन्या लोकांचे सेटलमेंट करा जुन्या लोकांचे तुम्ही बांधकाम करा तुमच्यामध्ये कांही तडजोड होत नसेल तर माझ्याकडे या मी तुम्हाला त्याबाबत तडजोडी करुन देईन आणि मग कांय असेल ते माझे दया तुमचे करा अशाप्रकारचे साटेलोटे होत आहे आणि त्यामुळे हा अनधिकृत बांधकामाचा जो पेव सुटलेला आहे तो वाढत जाणार आहे.

भविष्यात जर आपल्याला हया अनधिकृत बांधकामावर कंट्रोल करायचा असेल तर हे जे मुद्दे मी सांगितले आहे त्याचा उपयोग करुन घ्यावा जेणेकरुन आपण कुठेतरी डबल कर लावून नाहक त्या लोकांना त्रास देण्यापेक्षा त्यांच्याकडून जास्त पटीने पैसे घेण्यापेक्षा आपण तो बिल्डर किंवा जो मालक असेल त्याचेवर अशाप्रकारची कारवाई केली आणि अशाप्रकारचे जर प्रत्येक प्रभाग समितीच्या माध्यमातून मोक्याच्याठिकाणी जर आपण फलक लावले तर घेणारे जे ब्लॉकधारक असतात ते व्यवस्थित चौकशी करुन नक्की आपला प्लॅन मंजूर आहे का,मंजूर प्लॅन असेल तरच तो ब्लॉक घेईल नाहीतर त्याठिकाणी घेणार नाही. महापौर महोदय, विकास कर व इतर जो आकार आहे त्याबाबत सहा.संचालक नगररचना हयांनी चांगल्याप्रकारे दोन वर्षामध्ये उत्पन्न मिळविलेले आहे. परंतू जे रस्ते फोड आहे याबाबत निरनिराळयाठिकाणी ब-याचवेळा एमटीएनएल,एअरटेल,वोडाफोन असे निरनिराळया फोनचे जाळे पसरलेले आहे.व हे रस्ते फोडत असतात व हे रस्ते फोडल्यानंतर ते एकाबाजुची एनओसी आपल्याकडून घेतात परंतू नंतरच्या कामाकरीता ते कधीच आपल्याकडून एनओसी घेत नाहीत.आणि पूढील काम ते अशाप्रकारे करतात की त्यांची ती मक्तेदारी आहे. आमच्या महापालिकेचा अधिकारी त्याठिकाणी कधी पोहचत नाही आणि त्यामुळे हे जे कांही नुकसान होते ते नुकसान सर्वात जास्त प्रमाणात हया पध्दतीने होते. सीएनजी गॅस ,किवां महानगर गॅस असुदया किंवा इलेक्ट्रीक केबल असुदया याबाबतीत जे कांही प्रश्न आहेत ते प्रश्न जर उत्पन्नाच्याबाबतीत विचार केला नक्कीच उत्पन्नामध्ये चांगल्याप्रकारची भर होईल.

तसेच महसुली खर्चाकडे वळत असताना आपण सिमेंटचे आपण जे रस्ते बांधतो परंतू त्याचे कधीही आपण चांगल्याप्रकारे नियोजन करत नाही.केबल टाकण्यासाठी डक्ट पाहिजेत ,गॅस लाईन टाकण्यासाठी डक्ट पाहिजेत याचे कधीही नियोजन करीत नाही. भुयारी मार्गाचे आपण कधी नियोजन करीत नाही. आता सिमेंटचे रस्ते झाले परंतू माणसांना क्रॉस करण्याकरीता ,विदयार्थ्यांना रस्ता क्रॉस करण्याकरीता भुयारी मार्ग नसल्यामुळे किंवा त्यावरुन जे पादचारी मार्ग पाहिजे ते नसल्याकारणाने पुन्हा

जर ते काम करायचे झाल्यास पुन्हा सिमेंटचे रस्ते खोदावे लागणार आहेत.आणि याचा नाहक भुर्दंड आपण ठाणेकर नागरीकावर देणार आहोत. त्यामुळे सिमेंटचे रस्ते जेव्हा आपण करतो त्यावेळी नियोजन हे महत्वाचे असते.दोन्ही बाजुला डक्ट पाहिजेत व त्याच्यातून नळाचे क्रॉस कनेक्शन झाले पाहिजे आणि त्यानंतर भुयारी मार्गाचा जो प्रस्ताव आहे तो करण्यांत यावा. दिड वर्षापुर्वी कळव्यातील सहा भुयारी मार्गाची प्रस्तावाची सूचना मंजूर करण्यांत आली होती परंतू आज दिडवर्षामध्ये कळवा नाक्यापासून ते खारीगांवपर्यंत या सहा मार्गाचे कोणीही प्रस्ताव बनविलेला नाही. हे प्रस्ताव नगरसेवकांनी अधिका-यांकडे येऊन बनवायला पाहिजेत कां? आज कळव्यामध्ये ब-याचप्रमाणात अपघात झालेले आहेत,ब-याचवेळेला रस्तारोको झालेली आहेत. व त्यात्यावेळी आश्वासन दिलेली आहेत परंतू त्याबाबत कार्यवाही अदयाप झालेली नाही.सन्मा.सदस्या सौ.प्रमिला केणी यांच्या वॉर्डात वरुन पादचारी पुल घेतलेला आहे परंतू अदयाप तो बनविण्यांत आलेला नाही,उद्घाटन मात्र करण्यांत आलेले आहे,डावखरे साहेबांनी त्याचे उद्घाटन केलेले आहे.परंतू कामास अदयाप सुरुवात करण्यांत आलेली नाही. तरी माझी सभागृह नेते व विरोधी पक्ष नेते यांना विनंती आहे की,आपण अशाप्रकारचा ठराव पारित करावा की, ज्या ज्याठिकाणी सिमेंटचे रस्ते घेऊ त्यावेळी त्याच्या दोन्ही बाजुला डक्ट आणि मेनरोडला जर असतील तर भुयारी मार्ग व पादचारी मार्ग करण्यात यावा,अशाप्रकारची सूचना करीत आहे.

महापौर महोदय,आपण डांबरीकरण करतो,मलनि:स्सारणाच्या वाहिन्या हया आमच्या कळवा,खारेगावं,विटावा व मुंब्रा याठिकाणी चाललेल्या आहेत या वाहिन्याचें काम एवढया खालच्या लेवलचे असुन आतापर्यंत दहा टक्के काम सुध्दा झालेले नाही. पूढच्या दिडवर्षामध्ये निवडणुका आलेल्या आहेत.या निवडणुकीमध्ये आम्ही जेव्हा खड्डे खोदणार तेव्हा नागरीक नक्कीच आम्हाला त्या खड्डयामध्ये टाकतील कारण निवडणुकीमध्ये नागरीक म्हणतील तुम्ही या पाच वर्षामध्ये कांही करु शकले नाही, कारण ही शोकांतिका आहे. कारण गेल्यावर्षीपासुन आम्ही त्याठिकाणी काम करण्याचा प्रयत्न केला आणि यावर्षीपर्यंत फक्त दहा टक्के काम चालू झालेले आहे, तरी नागरीक आम्हाला मताच्यारुपाने नक्कीच त्या खड्डयामध्ये टाकतील. त्यामुळे प्रशासनाला आमची विनंती आहे की, हया ज्या मलनि:स्सारणाच्या वाहिन्या टाकण्याचे काम चालू आहे त्या तांतडीने आणि चांगल्या पध्दतीने कशा होतील यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्याठिकाणी स्वत: मा.आयुक्तांनी तसेच मा.नगर अभियंता यांनी सुध्दा पाहणी करणे गरजेचे आहे. त्याठिकाणी जे छोटे छोटे कॉंट्रॅक्टर आहेत त्यांना नियुक्त करण्यांत आलेले आहे. व त्यांना कामे देण्यांत आलेली आहेत.कोठेही काम चालू करतात याबाबत नगरसेवकांना काहीच कल्पना नसते आणि लोकांनी अडविले मग त्याठिकाणी ओरडा होतो आणि नंतर नगरसेवकांची आठवण होते मग नगरसेवक लोकांना सांगतात.आपल्याला सांगू इच्छितो की मिलिंद पाटील यांच्या वॉर्डामध्ये भुसार आळीमध्ये जेव्हा काम चालू होते तेथेजुनी घरे आहेत तेथे त्यांनी व्हायब्रेटर कटींग मशिन त्यांनी आणले नव्हते. तेथे काम करीत असताना एका झाडाचा भाग खचला गेला,अशावेळी तेथील नगरसेवकांना गृहीत धरणे गरजेचे आहे त्यांना बोलाविणे गरजेचे आहे. परंतू त्यांना बोलाविल जात नाही त्यामुळे मलनि:स्सारणाचे काम हे सर्वात धिम्या गतीने चाललेले आहे.तसेच खारेगांव याठिकाणी नविन कांहीतरी प्लॅन तयार करण्यांत आलेला आहे. दत्तवाडी येथील मागच्या बाजुला कळवा परिसर आहे त्याठिकाणी मलनि:स्सारण वाहून जाण्यासाठी काम करणार आहेत. त्यामुळे गटाराची जी लेवल खाली गेली होती ती वर येणार आहे तरी माझे असे म्हणणे आहे की हया सर्व गोष्टी करताना आपण एकत्र बसले पाहिजे व याबाबतचा निर्णय घेण्यांत आला पाहिजे. तरी याबाबत आयुक्त महोदय आपण लक्ष दयावे.

महापौर महोदय,महसुली खर्चावर विचार करीत असताना रेल्वे हा सर्वात मोठा प्रश्न आहे. रेल्वे म्हटले की त्याची एनओसी मिळतच नाही,गेल्या तीन वर्षापासुन सातत्याने पाठपुरावा करीत आहे व याबाबत लाला साहेबांशी सुध्दा बोललो आहे. रेल्वेबाबत आमच्या वॉर्डामध्ये ज्या ज्या कांही गोष्टी आहेत.एक साधे गटार रेल्वेच्या कॉलनीमधून जात आहे त्याठिकाणी असलेले गटार खाडीकडे जायचे आहे त्याकरीता एनओसी गेल्या तीन वर्षापासुन मिळत नाही ही शोकांतिका आहे. तरी रेल्वेसाठी सक्त नियम असणे आवश्यक आहे. रेल्वेच्या बाजुची जी जागा असते ती सर्व आपली असते. रेल्वेची जी पाण्याची लाईन असते ती सुध्दा आपल्या जागेतून गेलेली असते. तरी आपण त्यांना पत्र दयावे की जर तुम्ही अशाप्रकारच्या एनओसी आम्हाला दिली नाही तर तुमच्या ज्या पाण्याचे जे कनेक्शन गेलेले आहेत त्या लाईन बंद करण्यांत येईल. चंद्रशेखर आयुक्त असताना त्यांनी रेल्वेमधून रस्ता काढण्याचे ठरविले होते त्यावेळी रेल्वेच्या अधिका-यांनी त्यांना विरोध केला त्यावेळी सर्व हत्यारे त्यांनी आणुन ठेवले व त्यांनी सांगितले मी येथे रस्ता करीत आहे तुम्हाला कांय करायचे ते करा. आणि एका दिवसांत त्यांनी संपूर्ण रस्ता केला. आयुक्त महोदय आपण चांगले काम करीत आहात,जर रेल्वेने एनओसी नाही तरी आपण आपले काम चालू करायला पाहिजे.

महापौर महोदय, सुलभ शौचालय निर्मल अभियानामार्फत करत होतो परंतू प्लॅटफॉर्म नं.२वर नाहीत.मग अशावेळी प्रवासी कोठेही शौचालयाकरीता जातात. तसेच रेल्वे कॉलनीपासुन सम्राटनगर,शिवाजीनगर याठिकाणी जाणा-या लोकांना रेल्वेचा पादचारी ब्रिज मंजूर आहे गेल्या दहा वर्षापासुन याकरीता तरतुद आहे परंतू आजच्या घडीला सुध्दा त्याठिकाणी पादचारी पुल होत नाही.गेल्यावर्षी २९ प्रवाशांचा रेल्वे रुळ क्रॉस करताना मृत्यु झालेला आहे. तरी यास रेल्वे जबाबदार रहात नसुन आपणच जबाबदार रहात आहेत. आज तेथील रुळ क्रॉस करताना महिला व विदयार्थ्यांचे खुप हाल होत आहेत. तरी याकडे सुध्दा तांतडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे टीआर स्टीलच्या मागुन पुर्वी आमचे ट्रक शिवाजीनगर याठिकाणी जायचे आता रेल्वेने तो गेट बंद केलेला आहे.त्याठिकाणी आरओबी करणे गरजेचे आहे.याकरीता खासदार मा.श्री.आनंद परांजपे यांनी सुध्दा याबाबत सूचना केलेली आहे. तसेच मी व सन्मा.सदस्या प्रमिला केणी यांनीसुध्दा सूचना केलेली आहे तरीसुध्दा हा प्रश्न तसाच पडलेला आहे. आज तेथून रहिवाशांना येण्याजाण्यासाठी पुष्कळ त्रास होत आहे.

आपल्याकडे कांही अधिकृत इमारती आहेत परंतू त्यांना ओसी मिळत नाही.आज जवळजवळ दोनशे करोडचा निधी या ओसीला घेतला असल्यामुळे हा निधी बाजुला होत आहे.मी याठिकाणी सूचना करीत आहे ज्यांनी ज्याज्यावेळी आपल्याकडे ओसीकरीता अर्ज केला असेल त्यात्यावेळेला ओसीची मंजुरी दयावी त्यांना दंडात्मक कारवाई करु नका,कारण त्यांचे कांहीच चुकलेले नसते.तरी त्यांना लगेच ओसी दयावी जेणेकरुन दोनशे करोडचे आपले बजेट वाढेल.व त्यातून विकासाची चांगली कामे होतील आणि आपण जे कर्ज घेतो त्याचे ओझे कमी होईल.

याठिकाणी आगरी समाज भवन म्हणून मंजूर करण्यांत आलेले आहे. तरी महापौर महोदय आपल्याला विनंती आहे की,याचे भूमीपुजन तांतडीने करण्यांत यावे जेणेकरुन हे स्थानिक भूमिपुत्र यांच्या माध्यमातून तेथे समाज भवन होत आहे त्याला आपण चांगल्याप्रकारची चालना दयावी.

महापौर महोदय,याठिकाणी परिवहनबाबत विचार करीत असताना मी नऊ वर्ष परिवहन समिती सदस्य व एक वर्ष सभापती होतो. महापौर महोदय,त्यावेळी करारनामा चालू होता.बाराशे रुपयाच्या करारनाम्यामध्ये वाढ करावी अशाप्रकारची युनियनतर्फे मागणी आली आणि व्यवस्थापकांकडून ती आठशे रुपये व्हावी अशाप्रकारची तडजोड चालू होती व त्याचवेळेला एक प्रस्ताव आला की पाचवा वेतन आयोग त्यांना लावण्यांत यावा. धर्मवीर आनंद दिघे साहेब यांनी ते लावलेले रोपटे आहे,आणि त्याचे रुपांतर हे वटवृक्षामध्ये होत असताना कोठेतरी तो डबघाईला आलेला आहे त्यासाठी याचे विश्लेषण होणे गरजेचे आहे. त्यावेळी पाचवा वेतन आयोग लावण्यासाठीच आमच्याच अधिका-यांनी याठिकाणी शिफारस केली व त्यावेळी चंद्रशेखर आयुक्त यांच्या डोक्यामध्ये अशी कल्पना दिली की,पाचवा वेतन आयोग लागल्यावर या कर्मचा-यांना एवढया मोठया प्रमाणात वाढ होणार नाही,त्यांनी सांगितले की,पाचशे रुपयांची वाढ होईल,आणि आम्ही त्यावेळी पाचव्या वेतन आयोगाला विरोध केला होता,कारण परिवहन सेवेची ती जी बाब आहे परिवहन सेवेला पाचवा वेतन आयोग लावू नका कारण परिवहन सेवेचे जे उत्पन्न आहे व महापालिका जे देत होते त्यामध्ये ते भागत नव्हते.आणि म्हणून आम्ही त्यास नकार देत होतो,व सभागृहात सुध्दा आम्ही त्यास विरोध केला होता.परंतू नाईलाजास्तव सभागृहामध्ये कर्मचा-यांना जास्त कांही मिळेल याउद्देशाने आम्ही तो मंजूर केला परंतू हे मंजूर करीत असताना पाचवा वेतन आपल्या महापालिकेस सुध्दा लागले नव्हते व त्यावेळी महाराष्ट्रातील एकमेव परिवहन सेवा पांचवा वेतन आयोग लागणारी ही एकमेव परिवहन सेवा होती

आणि कर्मचा-यांचे भले होत आहे म्हणून आम्ही सुध्दा त्या पाचव्या वेतन आयोगाच्या मागे वहात गेलो आणि ख-याअर्थाने जो पगार त्यावेळी होता त्याच्या दुप्पट तो केला गेला आणि ख-याअर्थाने परिस्थिती बिकट झाली.

महापौर महोदय,याठिकाणी सर्वात महत्वाची बाब म्हणजे सिक्युरिटी आहे,आपल्याकडे सिक्युरिटीवर अंकुश नाही.असाच प्रकार तेथे सुध्दा आहे,कोणीही कर्मचारी कधीही येतो कधीही जातो,त्याठिकाणी थंबपंचिंग चालू होते ती बंद करण्यंात आली, कार्यशाळेमध्ये चांगला कर्मचारी नाही. निर्णय घेण्याची क्षमता असते ती घेण्याची क्षमता जर असेल तर नक्कीच परिवहनचा विकास चांगल्याप्रकारे होईल. गेल्या दोन वर्षापासुन बसेस घेण्याचे प्रस्तावित केलेले आहे परंतू अदयाप त्या बसेस आलेल्या नाहीत.व बसेस नसल्यामुळे उत्पन्नामध्ये घट होत आहे.आणि त्याचाच भुर्दंड आपल्या परिवहन सेवेवर होत आहे.त्यामुळे येणा-या बसेस या तांतडीने कशा येतील याचा नक्की विचार करणे गरजेचे आहे, अधिका-यांमध्ये समन्वय असणे गरजेचे आहे.मागच्यावेळी खतगांवकर हे परिवहन व्यवस्थापक होते आता त्यांचेवर घनकचरा विभाग दिलेला आहे. तरी त्यांचेकडे जर ही जबाबदारी दिली तर ते चांगल्याप्रकारे काम करतील अशी मी सभागृहाला विनंती करीत आहे. आणि मी ज्या ज्या कांही सूचना केल्या आहेत त्या सूचनांची अंमलबजावणी व्हावी अशी मी विनंती करतो आणि त्याचप्रमाणे माझ्या प्रभागामध्ये युटीडब्ल्युटीचे रस्ते मंजूर करण्यांत आले आहे त्याकरीता बजेट ठेवण्यात यावे,डांबरीकरणाकरीता जे बजेट आहे ते सुध्दा राखून ठेवण्यात यावे अशाप्रकारची विनंती करीत आहे.

सौ.प्रमिला केणी :

मा.महापौर महोदय,सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पाचे स्वागत करते.शाळेसंदर्भात कांही सूचना करावयाच्या आहेत. सर्वशिक्षा अभियान या योजनेअंतर्गत ठाणे महापालिका हद्दीमध्ये वर्गखोल्या बांधण्याचे प्रस्तावित आहे.खारेगाव,विटावा,पारसिक रेतीबंदर येथे शाळेकरीता नविन इमारत बांधण्याचे काम प्रस्तावित आहे. यासाठी आपण रेनवॉटर हॉर्वेस्टींग प्रकल्प पाणी अडवा पाणी वाचवा या योजनेनुसार जर या इमारतीच्या छतावरील पाणी आपण रेनवॉटर हार्वेस्टींगच्या सहाय्याने वाचवू शकतो तर भविष्यात त्याचा निश्चितच फायदा होईल.या दहा हजार लिटरच्या पांच टाक्या प्लंबिग उंचवटे असे सर्वसाहित्याकरीता पाच लाखाचा खर्च होणार आहे.प्रति दिवस वापर याप्रमाणे नव्वद दिवस म्हणजे एक तृतीयांश पाण्यचा भार हलका होऊ शकतो कारण याचा फायदा भविष्यात निश्चितच होईल. दुसरे म्हणजे शाळेमध्ये अल्पोपहारामध्ये खिचडी मुलांना देण्यांत येते त्या खिचडीचा चार्ट पाहिला तर एक दिवस खिचडी एक दिवस अंड आणि एक दिवस केळं असे देण्याचे आहे परंतू ते दिले जात नाही असे असताना त्यातील कांही मुले खिचडी घेतच नाही.त्याचा फायदा बचत गटांना होतो व कांही महिला उरलेले तांदूळ काळया बाजाराने विकतात हा माझा आरोप आहे. सर्व पालकांचे असे म्हणणे आहे की,खिचडी देण्यापेक्षा आमच्या मुलांना दोन किलो तांदुळ मिळाले तर सर्व कुटुंब एकत्र बसुन खाऊ शकतो.दुसरे म्हणजे वॉचमन असतात परंतू ज्यावेळी शाळा सुटते त्यावेळी तेथे वॉचमन हजर नसतात तरी त्यावर आपला अंकुश असावा.तसेच युटीडब्ल्युटी पध्दतीने रस्ते कॉंक्रिटीकरण २०१०-२०११ या आर्थिक वर्षामध्ये १४ कोटीची तरतुद करण्यंात आलेली आहे परंतू या रस्त्यांचा तपशिल कांय असणार आहे. त्या तपशिलाचा उलगडा व्हावा. तसेच विविध योजनेअंतर्गत रस्ते खोदले जातात पुनर्बांधणी त्या खर्चाचे प्रयोजन कांय असणार आहे. तसेच अपंगांसाठी जी योजना आहे आपण जे स्टॉल देतो.स्टॉल देताना त्यांना आपण अगोदर प्लान काढुन देत

होतो आता तसे न होता त्यांच्या मनाप्रमाणे ते जेथे जागा मागतील तेथे आपण दयावे असे त्यांचे म्हणणे आहे.आणि ते स्थानिक नगरसेवकांकडे आल्यानंतर सांगतात की,अमुक ठिकाणी जागा आहे तेथे आम्हाला पाहिजे. परंतू ट्रॅफिकला जर तेथे अडथळा होत असेल तर आम्ही कशीकाय त्यांना परवानगी दयावी.याच्यावर सुध्दा विचारविनिमय व्हावा. तसेच बालकल्याण समिती योजनेअंतर्गत ब-याच योजना महिलांकरीता असतात परंतू त्याचा फायदा गरजू व गरीब महिलांपर्यंत पोहचत नाही. एवढे दोन शब्द बोलून माझे भाषण संपविते.

श्री.शैलेश सावंत :

महापौर महोदय,सन्मा.आयुक्त महोदय,सन्मा.स्थायी समिती सभापती,सन्मा.सभागृह, दक्ष नागरीक आणि पत्रकार बंधू,

सन २०१०-२०११अर्थसंकल्प चर्चेसाठी आज सभागृहामध्ये दाखल झालेला आहे आणि त्यानुषंगाने बोलत असताना आयुक्त महोदय आपले अभिनंदन करावेसे वाटते कारण ठाण्याच्या वैभवामध्ये आणि सौंदर्यांध्ये भर टाकणारे असे प्रकल्प आज आपण लोकार्पण केलेले आहेत. आणि पुर्ण होण्याच्या मार्गावर बहुतांशी आहेत. जेएनएनयुआरएमअंतर्गत आपण असे महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत परंतू हे प्रकल्प राबवित असताना सर्वसामान्य नागरीकांकडून जी विचारणा केली जाते की सर्वसामान्य नागरीकांना हयापासून कितीसा दिलासा मिळत आहे. आज परिस्थिती अशी आहे,आज आपण महत्वाकांक्षी प्रकल्प राबवित असतानासुध्दा नाले विकास असो,बीएसयुपी असो,किंवा भुयारी गटार योजना असो याची आपण आज प्रत्येक टप्प्यानुसार जर टक्केवारी पाहिली तर एवढी विक जाणवते फक्त एकात्मिक नाले विकास जास्त प्रमाणात आपण पोहोचलो आहेत. भुयारी मार्ग तर जवळपास ४० ते ५० टक्क्याच्या आसपास,शेवटचा टप्पा तर १५ टक्के असा आहे. तर अशास्थितीमध्ये सर्वसामान्य नागरीकांचा विचार केला तर त्यांना भेडसावणा-या ज्या समस्या आहेत उदाः आज ठिकठिकाणी आपण रस्त्याची दुर्देशा पाहतो,आज रस्त्यांबाबत आपणसुध्दा कितीसे गांभिर्य आणि जागरुक आहोत हा सुध्दा आपल्याला प्रश्न पडतो की,आपण येथून मुख्यालयापासून ज्या ज्या सर्व्हीस लाईन टाकण्यासंदर्भामध्ये ज्या परमिशन दिली जातात ती प्रत्यक्ष जागेवर कोठल्या लोकेशनने तो मागत आहे तसेच किती लांबीचा तो फोड करु इच्छित आहे याची आपल्याकडे जजमेंट नसते शिवाय प्रभाग समितीच्या कार्यालयामध्ये सुध्दा त्यासंबंधी पुरेशी माहिती नसते. ऑफीसमध्ये बसुन जर आपण त्यांना परमिशन देत गेलो आणि तो त्या रस्त्याची दुर्दशा कशापध्दतीने करत आहे हे जर आपण पाहिले नाही तर आज सर्वसामान्य नागरीक येता जाता त्यांना जो त्रास होत आहे,तरी याकडे गांभियनि पाहणे गरजेचे आहे. कधीतरी वाटते आपण रस्ता फोड फीच्या माध्यमातून जे कांही त्यांच्याकडून वसुली करतो हे करीत असताना सर्वस्वी जबाबदारी आपल्याकडे असते की ते रस्ते व्यवस्थित पुन्हा फिलिंग करुन घेणे परंतू हे करीत असताना आपण टेंडर काढणे किंवा प्रत्यक्षात ते अंमलात आणणे याला दोन तीन महिन्याचा पिरियड जातो आणि तशा व्यवस्थेमध्ये खाचखळगे असो दगड असो त्याच्यातून सर्वसामान्य नागरीकांना जावे लागते. त्याचप्रमाणे फुटपाथची सुध्दा परिस्थिती तीच आहे. आज फुटपाथसुध्दा भयानक अवस्थेमध्ये जेथे जेथे दिसून येतात.कांहीतर असे रॅकेट आहे की तेथील झाकणे चोरणे,तेथील फ्रेम उचलून नेणे,व याला महापालिका सुध्दा किती पुरेशी पडणार हा सुध्दा प्रश्न पडतो. आज त्या फुटपाथवरुन चालत असताना शाळेतील मुले पडणे,जेष्ठ नागरीकांना इजा होणे हे प्रकार होत असतात.

महापौर महोदयांनी आता हातगाडयांबाबत जे आंदोलन हाती घेतलेले आहे त्याबाबत मी निश्‍चितच तुमचे अभिनंदन करेन की,अशापध्दतीचा प्रत्येक महासभेमध्ये आपल्या चर्चेचा विषय असतो.कुठली फुटपाथ खाली नसते,अतिक्रमण मोठया प्रमाणावर असते,सर्व्हीस रोड खाली नसतात हे जर सर्वसामान्य नागरीकांची रहदारीची ही ठिकाणे आहेत.याकडे जर आपण लक्ष नाही दिले तर त्यांच्यातला रोष हा लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून आमच्यापर्यंत येऊन पोहचतो,तरी याबाबत विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. आपण अपंगांना स्टॉल देतो,त्यांचे स्टॉल हे अवघड ठिकाणी असतात एकतर फुटपाथ अरुंद असते तेथेच त्यांचा स्टॉल असतो.तरी अशाठिकाणी तो न देता त्यांना वेगळया मार्केट किंवा अशाठिकाणी जेथे त्यांचे चांगले पुनर्वसन होऊ शकेल अशाठिकाणी देणे गरजेचे आहे. आज इमारतींचा प्रश्न सुध्दा आज सर्वसामान्य नागरीक साध्या इमारतीमध्ये राहतो तर अशास्थितीमध्ये जो कांही धोकादायक इमारतींचा प्रश्न आहे तो फार भेडसावणारा प्रश्न आहे त्याच्या जिवावर टांगती तलवार आहे,दिवसेंदिवस ही बांधकामे जीर्ण होत चाललेली आहेत,त्याबाबत आपण वेळीच जर लक्ष दिले नाही तर खरोखरच त्यांना सुखाने झोपसुध्दा येणार नाही अशी परिस्थिती आहे. आपण हे सर्व करीत असतानासुध्दा जर त्यांच्या प्राथमिक गोष्टींकडे लक्ष दिले उदा: पाणी यामध्ये गळतीचे प्रमाण मोठे आहे,चोरीचे प्रमाण मोठे आहे की आपण एवढा पैसे खर्च करुन जे पाणी विकत घेत आहोत परंतू ते नागरीकांपेक्षाही गळतीच्या माध्यमातून जमिनीमध्ये त्याचा जास्त प्रमाणात निचरा होत आहे,तरी याबाबत आपण सर्व्हे केला तर पुरेसा आपण करु शकत नाही,तरी याकडे गांभिर्याने पाहणे फार गरजेचे आहे कारण हे पाणी लोकांना मिळाले पाहिजे. आज आपण गृहसंकुलामध्ये पिण्याचे पाणी देत आहोत परंतू यामध्ये कांही संकुलातील असतील तर कांही इमारती असतील परंतू ते प्लशकरीता पिण्याचे पाणी वापर करतात.आज प्लॅटरेटने आपण त्यांना जे पाणी देतो त्यामध्ये त्यांना त्याची किंमत जाणुन येत नाही. तर अशास्थितीमध्ये आपण जी मिटर पध्दत ठेवलेली आहे,परंतू ती सुध्दा आपण कार्यान्वित करु शकलो नाही. आज ज्या भागामध्ये जास्त पाणी मिळते त्याला त्याचे गांभिर्य कळत नाही,तो हवे तसे पाणी वापरतो. आणि कांहींना दोन दोन दिवस पाणी मिळत नाही.तरी याबाबत कोठेतरी समतोल ठेवणे फार गरजेचे आहे. तरी यासाठी जी मिटर पध्दत आहे ती लवकरात लवकर कशी अंमलात येईल जेणेकरुन त्याचे बिलाप्रमाणे जर पाणी मिळाले तर नागरीक हा निश्‍चित त्याची जाणिव ठेऊन पाण्याचा वापर करेल आणि सोसायटी किंवा इमारती म्हणा हे पाणी देताना कंपलसरी बोअरवेलचे जे पाणी आहे ते टॉयलेटसाठी वापरणे बंधनकारक राहील अशापध्दतीची कार्यवाही करणे फार गरजेचे आहे असे मला वाटते.

महापौर महोदय,आपण हे जे प्रकल्प राबवितो त्याची कांही कालमर्यादा म्हणा किंवा त्याचा दर्जा याबाबत कुठेतरी आपल्याकडे प्रमाण नाही तरी त्या त्या कामाचे ऑडीट होणे गरजेचे आहे जेणेकरुन जो कोणी विकासक असेल किंवा जो काम करणारा ठेकेदार असेल त्याचेवर एक भिती राहते की याचे ऑडीट होत आहे. मी देत असलेला दर्जा हा नोंद केला जात आहे आणि मला दिलेला कालावधी जो आहे ते त्या कालावधीतच पुर्ण करावयाचे आहे या सगळया गोष्टीचा तो गांभिर्याने विचार करेल आणि त्या त्या कालावधीत पुर्ण करण्याचा प्रयत्न करेल. आणि त्या कालावधीमध्ये कांही चुका नसताना म्हणजे नैसर्गिक घटना घडलेल्या नसताना सुध्दा तो दिरंगाई करीत असेल केवळ निधी वाढविण्याच्या उद्देशाने तर त्याच्यावर दंड आकारणे ही सुध्दा प्रोव्हीजन करणे फार गरजेचे आहे असे मला वाटते. जेणेकरुन आपण जे कामे राबवित असतो ती सिस्टिमॅटीक होतील. त्यामुळे ऑडीट रिपोर्ट ठेवणे व ते मेंटेन करणे हा आमच्यामधूनच नव्हेतर सर्वसामान्य नागरीकांकडून सुध्दा ही मागणी येते की

आम्हाला ते कळणे गरजेचे आहे.जेणेकरुन असे हे प्रकल्प रेंगाळणार नाहीत आणि आपण जे कांही शेडयुलप्रमाणे आखु त्यापध्दतीने कामे होत जातील आणि मगाशी म्हटल्याप्रमाणे रस्त्याचे जसे माजी उपमहापौर म्हणाले रस्ते फोड करीत असताना सुध्दा त्याला कोठेतरी कंट्रोल असणे गरजेचे आहे. ज्यावेळी सिमेंट कॉंक्रिटीकरण आपण करतो त्यात डक्ट असणे,प्रत्येक सर्व्हीस लाईन ही त्या मार्गाने गेली पाहिजे. आज एमटीएनएलचे काम झाले की नंतर महानगर गॅस चे काम चालू होते म्हणजे कोणावर कोणाचा अंकुश नाही,आणि त्या रस्त्याची दुर्देशा होत राहते आणि त्याचा सर्वसामान्य नागरीकाला ताण सहन करावा लागतो.

आयुक्त महोदय आपण सांगितल्याप्रमाणे अर्थसंकल्पाच्यावेळी आपण एक आंखणी करतो. जकात माध्यम हे ५० टक्क्याहुनही आपल्याकडे उत्पन्नाचे साधन आहे,ज्य गोष्टीकडे आपल्याला गांभियर्नि लक्ष देणे गरजेचे होते तसे ते दिले गेले पाहिजे. आपण पाहिले तर जकात दंड हा सहा कोटीचा कां दाखविण्यांत आला आहे हे मला समजले नाही. आज हा महत्वाचा सोर्स आहे अशावेळेला गेल्यावेळी आपण ज्या कांही सूचना केल्या होत्या की त्याला जे जे आवश्यक आहे त्याची अंमलबजावणी ताबडतोब हाणे गरजेचे असते. आज अद्ययावत बाजार सूची ही आपण अदयापही करु शकलो नाही,मागच्यावेळी सुध्दा आपण प्रस्तावित केले होते ती करणे आवश्यक होते. स्कॅनर्स,वजनकाटा,संगणीकरण आहे हया गोष्टींकडे प्रामुख्याने लक्ष देणे गरजेचे आहे. कारण जेणेकरुन हे जास्तीत जास्त आपल्याला कसे मिळू शकेल. तसेच पेट्रोल डिझेलबाबत प्रशासनाने जो निर्णय घेतलेला आहे. मालमत्ता कराबाबत मध्यतंरी निवासी वापराकरीता आपण दिडटक्का वाढ करीत आहोत आणि बिगर निवासी यांना अर्धा तर निश्चित निवासीचा जो आहे तो पुन्हा अर्धा टक्क्याने कमी करुन दोघांना एक एक करावा जेणेकरुन निवासी लोकांना जास्त प्रमाणात भुर्दंड असु नये. मालमत्ता जमा करणे याबाबत जर एखादा टॅक्स डीफॉल्डर असेल तर मालमत्ता जप्त करण्याची नोटीस लावतो परंतू ती कधी अंमलात येतच नाही.त्याने थोडे कांही पैसे दिले ते आपण स्विकारतो परंतू ती जर मालमत्ता आपण जप्तच केली आणि महापालिकेच्या ताब्यात घेतली तर निश्चितच त्याचा इफेक्ट त्याचा जो कांही भरणा असेल तो तात्काळ करण्यासाठीतरी होईल.

महापौर महोदय,निर्मल अभियानअंतर्गत आपण साधारणत: नऊ हजार सातशे पन्नास सिटचे बांधकाम आपण आयोजित केले होते.त्यातील दोन हजार सिटचे बांधकाम झालेले आहे.ही कामे अतिशय रेंगाळत आहेत. मी माझ्या प्रभागात सहा कामे सजेस्ट केली होती त्यातील तीन कामाचे उद्घाटन करण्यांत आलेले आहे व तीन कामे रखडली आहेत.आपण अर्थसंकल्पामध्ये दाखवितो की,हे सर्व अनुदान आपल्याला निर्मल अभियानअंतर्गत मिळते आणि ते एनजीओ त्याची व्यवस्था पाहणार आहेत.त्याच्या व्यवस्थेपोटी प्रत्येक झोपडीधारकाकडून दहा रुपये वसुल करणार आहोत.परंतू हे करीत असताना जी वस्ती शौचालये आपण म्हणतो ती जेथे दिडशे ते पावणेदोनशे झोपडीधारक आहेत,त्यांच्याकडून दहा दहा रुपये घ्यायचे म्हटले तर तो हजार ते पंधराशेमध्ये ते युनिट कसे चालवू शकेल. कारण त्या शौचालयामध्ये रस्त्यावरुन येजा करणारी नागरीक नसणार आहेत की जेणेकरुन त्याला उत्पन्नामध्ये वाढ होईल. कारण तेथे येणारे लाईट बिल,शौचालय साफ करण्यासाठी तो माणुस ठेवणार तसेच त्यासाठी लागणारे साहित्य या सगळयाचा जर आढावा घेंतला तर ती शौचालये चालविण्यास कोणी माणुस मिळणार नाही.किंवा कोणत्या संस्था चालविणार नाहीत. तरी अशावेळी महापालिकेअंतर्गत त्याकडे लक्ष देणे किंवा साफसफाई करण्याकरीता तरतुद करुन ठेवणे फार गरजेचे आहे असे मला वाटते.

महापौर महोदय, जाहिरात माध्यमातून आपल्याला जे उत्पन्न मिळते त्यामध्ये आज अवैध असे खुपशे फलक दिसतात त्यावर आपण फक्त दोन लाखाची फी वसुली म्हणून दिलेली आहे.परंतू त्यावर दंड आकारणी म्हणा  जाहिरातीच्या माध्यमातून खुपशा प्रमाणामध्ये अवैध असे होर्डींग्ज आहेत तिकडे प्रामुख्याने लक्ष देणे गरजेचे आहे असे मला वाटते.

तरण तलावाबाबत म्हटले तर आज रायलादेवी येथील जो तलाव आहे आज तेथील जी दुरावस्था आहे ती पाहता सर्वसामान्य नागरीकांना फार चर्चेचा विषय झालेला आहे आणि लोकप्रतिनिधींच्या नावाने ते सतत शिवीगाळ करीत असतात. तरी याकडे प्रामुख्याने लक्ष देऊन किंवा तो जो मौसम रिसोर्टवाला आहे त्याला बोलावून घ्या व त्याला जर शक्य नसेल तर जे कांही आवश्यक निर्णय आपल्याला घ्यायचे आहेत किंवा ठाणे महापालिकेमार्फत सुशोभिकरण करुन लोकार्पित करायचे असेल तर ते करणे फार गरजेचे आहे असे मला वाटते.

कत्तलखाने,अनधिकृत मटणशॉप जी आहेत याबाबत मागच्या महासभेत सुध्दा झालेले आहे.त्याचा सर्व्हे होणे फार गरजेचे आहे जेणेकरुन तो एक निधी आपल्याला उत्पन्नाच्या माध्यमातून निश्चितच त्यामधून आपल्याला वाढ होईल.

वृक्षप्राधिकरणाच्या माध्यमातून उत्पन्न म्हटले तर फार कमी दाखवित आहे.  आज वृक्षतोडी मोठया प्रमाणावर होत असते.कुठल्या कंपन्या असो,आय.टी.पार्क असो येथे जी वृक्षतोड होते ती परवानगी घेऊन केली जाते. परंतू कांही शक्ती अशा आहेत की परमिशन दहा झाडांचे घेतले तर वीस झाडे तोडणारी आहेत जेणेकरुन महापालिकेचे नुकसान करणारी आहेत.विकासकाकडून पैसे घेतात परंतू ते आपल्यापर्यंत पोहचत नाहीत.तरी त्यावर मॉनेटरींग असणे गरजेचे आहे असे मला वाटते.आणि जे कांही उत्पन्नाचे साधन आहे ते क्लिअर दिसत नाही.कारण ते कांही वेगळया हेडखाली आले आहे का हे मला माहित नाही. परंतू याकरीता एक लाख दाखविलेले मला दिसले.

मा.महापौर महोदय, शिक्षणमंडळाची सध्याची स्थिती पाहीली तर जे सदस्य आहेत ते जागृतपणे त्या त्या भागातील शाळांमध्ये जाऊन  त्या ठिकाणी असलेल्या समस्या जाणून घेत असतात. त्यांच्याकडे निधी अपुरा असतो. वेळोवेळी आम्हा नगरसेवक स्वत:चा निधी टाकून विदयार्थांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही यासाठी सतत प्रयत्नशिल असतो. त्यामुळे यापुढे सुध्दा शाळेचे पट वाढावेत, शाळा व्यवस्थित चालाव्यात, शाळांची दुरुस्ती वेळेवर व्हावी, साफ-सफाई व्यवस्थित राहवी या सर्व गोंष्टीसाठी प्रामुख्याने आपल्या महापालिकेचे लक्ष असणे फार गरजेचे आहे असे मला वाटते. जेणेकरुन त्यांनी जो दहा कोटीचा निधी मागितला होता त्यातील आपण एक कोटी कमी केलेले आहेत. माझ्या अंदाजाने विदयार्थांच्या भवितव्याचा जर विचार केलातर ते एक कोटी मंजूर करुन देण्यास हरकत नसावी असे मला वाटते जेणेकरुन हया शाळा व्यवस्थित चालतील आणि कोणत्याही गैरसोयी होणार नाहीत.

मा.महापौर महोदय, भुयारी गटार योजनेबाबत मला थोडं बोलायचे आहे.  कारण अजूनही माझ्या प्रभागात ज्या मोक्याच्या जागा आहेत, म्हणजे जिथे अजूनही हया योजनेचे अर्धवट टाकलेले काम आहे. गेल्या तीन महिन्यांपासून तो ठेकेदार परत त्या ठिकाणी आलेला नाही. त्यामुळे रस्ते दिवसेंदिवस दबत असतात आणि आपल्याला खड्डे भरुन त्याला पॅचवर्क करावे लागते.  ज्ञानसाधना कॉलेजजवळ झालेल्या कामाच्या ठिकाणी मोठा पाईप टाकण्यासाठी ते खोदायचे आहे. आज त्या रोडची अतिशय भयाण परिस्थिती आहे. त्यामुळे त्या ठेकेदारावर आपला अंकूश असणे किंवा ते काम कसे चालले आहे त्यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. कारण दिवसेंदिवस जर हे असेल चालू राहिले तर आणखीन दोन-तीन वर्ष अशीच निघून जातील आणि रोडचे खड्डे

कमी होणार नाहीत त्यामुळे लोक फार हैराण होतील तरी मी ज्या काही ठराविक सूचना केलेल्या आहेत. त्या निश्चितच आपण लक्षात घ्याल आणि त्या अंतर्भूत कराल असा विश्वास बाळगतो आणि आपल्याला पुन्हा एकदा धन्यवाद देतो. जय हिंद जय महाराष्ट्र .

मा.महापौर :

जेवणाची सुट्टी जाहिर करण्यांत येत आहे.

**श्री. संजय वाघुले :-**

मा. महापौर महोदय, सन २०१०-२०११च्या मुळ अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे. जकातीचे उत्पन्न हे आपले उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. ठाणे शहराचा विकास पाहता, ठाणे परिसरात होत असलेली विकासाची कामे व बांधकामे यामुळे जकातीच्या उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित आहे. जकातीचे उत्पन्न ४०५ कोटीवरुन आपण ३८५ कोटी रुपये अपक्षित धरले आहे. २० कोटी रुपये उत्पन्न आपण कमी अपेक्षित धरले आहे. ठाणे शहरातील विकासाचा वेग पाहता, या ठिकाणी एक सूचना आहे की, ४०५ कोटीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अत्यावश्यक सर्वतोपरि प्रयत्न करणे आणि पुढील वर्षासाठी ४३५ कोटीचे उत्पन्न जकात विभागातील कर्मचारी यांच्या प्रयत्नांनी ४३५ कोटीचे जकातीचे उद्दिष्ट अपेक्षित ठेवावे. जकात विभागातील कर्मचा-यांसाठी उत्तेजनार्थ योजना आखाव्यात जेणेकरुन हयावर्षी आर्थिक असतानांही जकातीच्या उत्पन्नामध्ये जी वाढ झालेली आहे त्याप्रमाणात जकात कर्मचा-यांसाठी उत्तेजनार्थ योजना राबविल्यातर जकातीचे उत्पन्न ४३० ते ४३५ कोटी रुपये व्हायला काहीच हरकत नाही.

मालमत्ता कराच्या बाबतीत ठाणे महापालिका हद्दीमध्ये अनेक कंपन्या बंद होऊन त्या ठिकाणी इमारती उभ्या राहत आहेत. त्याप्रमाणांत महसूलामध्ये वाढ होणेही अपेक्षित आहे. पान क्रमांक ८९ वर १६४ कोटीच्या ऐवजी १७० कोटी सुधारीत अंदाज सन २००९-२०१० करीता तसेच सन २०२०-२०११ करीता महसूलीमध्ये २०० कोटीचे लक्ष महसूल विभागाला देण्यांत यावे जेणेकरुन पाणीपट्टी व मालमत्ता करात ज्यावेगाने घोडबंदर,वागळेइस्टेट परिसर, कळवा-मुंब्रा परिसराचा विकास होतोय त्याप्रमाणात मालमत्ता करामध्ये वाढ होणे अपेक्षित आहे.

मा.महापौर महोदय, परिवहन सेवेच्याबाबत गेल्या महासभेत अनेक सूचना केलेल्या आहेत. परंतू परिवहन सेवेच्याबाबतीत ठाणेकर नागरिकांचा जो अनुभव आहे, परिवहन सेवेमध्ये बसेसचा जो तुटवडा आहे. परिवहन सेवेला अनुदान मिळण्यासाठी या ठिकाणी मा.महापौर, मा.आयुक्त, मा. विरोधी पक्षनेते, मा.सभागृह नेते,यांच्या माध्यमातून लवकरांत लवकर २०० बसेस परिवहन सेवेमध्ये कशा समाविष्ठ होतील यासाठी प्रयत्न करावा जेणेकरुन ठाणेकर नागरिकांना खाजगी वाहनांचा जो वापर करावा लागतो त्यावर निर्बंध येतील आणि परिवहन सेवेचे उत्पन्न वाढीसाठी २०० बसेस परिवहनसेवेकडे कशा येतील यासाठी मा. महापौर,मा.आयुक्त,मा.सभागृह नेते मा.विरोधी पक्ष नेते यांनी त्यासाठी पाठपुरावा करावा अशी या ठिकाणी सूचना करतो.

मा. महापौर महोदय, अतिक्रमण विभागाच्या बाबतीत दोन-तीन दिवसांपूर्वी पेपरमध्ये आलेल्या बातमीनुसार ठाणे स्टेशन परिसरामध्ये जो आपण सॅटीस प्रकल्प उभा केला आहे. त्या सॅटीस प्रकल्पाच्या खाली फेरीवाल्यांनी जो धुमाकूळ घातला आहे. बातम्या ठाणे स्टेशन परिसरातील येतात. परंतू अनेक प्रभाग समितीमध्ये अनेक रस्ते फेरीवाल्यांनी व्याप्त केलेले आहेत. तरी फेरीवाल्यांसाठी हॉकर्स झोन त्या ठिकाणी लवकरांत लवकर निर्माण करावा जेणेकरुन फेरीवाले त्या हॉकर्स झोन आपला व्यवसाय करतील. हायकोर्टाच्या निर्देषानुसार रेल्वेस्टेशनच्या बाहेर १०० मीटरच्या आंत एकही फेरीवाला बसता कामा नये. परंतू स्टेशनच्या बाहेर खंडेलवालपासून ते अलोक हॉटेलपर्यंत फेरीवाल्यांनी सॅटीस खाली जो कब्जा केलेला आहे. तरी त्या ठिकाणी कठोर कारवाई करण्यांत यावी जेणेकरुन आपला जो सॅटीस प्रकल्प उभा राहिला आहे त्याला बाधा येणार नाही अशी या ठिकाणी सूचना करतो.

मा.महापौर महोदय, अतिक्रमण विभागातील अधिका-यांनी न्याय व्यवस्थेबाबत कोर्टामध्ये आपली बाजू मांडली होती की, अनधिकृत बांधकामे जी ठाणे शहरामध्ये चालू आहेत त्यावर तात्काळ कार्यवाही करु.

परंतू कोर्टात बाजू मांडल्यानंतरही ठाणे शहरामध्ये अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट चालूच आहे. त्या इमारतींवर कारवाई केल्यानंतर महसूली उत्पन्नामध्ये किती वाढ झाली याची माहिती सुध्दा सभागृहाला मिळणे आवश्यक आहे.

मा.महापौर महोदय, गेल्या सात वर्षापूर्वी आपण महासभेमध्ये पाणी बिलाबाबत स्लॅब पध्दतीने आकारणी करावी असा ठराव केला होता. त्यानुसार पाणी बिलामध्ये वाढ झालेली नाही. त्यामुळे स्लॅब पध्दत बंद करुन लवकरांत लवकर मीटर पध्दत अवलंबी जावी जेणेकरुन पाण्याचा दुरुपयोग होणार नाही आणि पाणीपट्टी वसूलीमध्ये जास्त प्रमाणांत वाढ होईल अशी या ठिकाणी सूचना करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**(ठाणे महानगरपालिका शिक्षणमंडळाच्या प्राथमिक शाळेतील शाळा क्रमांक ७१ कळवा येथील इयत्ता ७ वी मध्ये शिकणा-या कुमारी ज्योती शेजराव आदाळे या विदयार्थीनीचा मुंबई हिंदी सभेमार्फत घेतल्या जाणा-या शाळा बाहय परिक्षांमधून महाराष्ट्र राज्यातून हिंदी दुस-या परिक्षेत प्रथम क्रमांक आलेला आहे त्याबद्दल तिचा कौतुक समारंभ व मा.महापौर यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन मा.उप महापौर, मा.आयुक्त,मा.विरोधी पक्ष नेते,मा.सभागृह नेते व सर्व सन्मा. पदाधिकारी गटनेते यांच्या उपस्थित अभिनंदन करुन कु. ज्योती अदाळे हिला शिक्षणमंडळ सदस्य यांचेतर्फे रक्कम रुपये ५,०००/-चे बक्षिस देण्यात येते.)**

**श्री. मिलींद साळवी :-**

मा.महापौर महोदय, सन २०१०-२०११ च्या मुळ अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी आपण सर्वजण येथे जमलो आहोत. अर्थसंकल्पावर मा.आयुक्त महोदयांचे मनोगत वाचत असताना अचानकपणे झोप लागली.झोप लागल्यानंतर रात्री स्वप्नात असे दिसले की, आपण कुठेतरी इग्लंड किंवा युरोपियन कंट्रीजमध्ये आहोत की, काय? कारण साफ स्वच्छ रस्ते, मोठ-मोठे बगीचे,मोठ-मोठी क्रिडासंकुल आणि अशा अनेक नाटयमय गोष्टी या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाल्या त्यामुळे फार आनंद झाला. पण सकाळी झोपेतून उठलो तेंव्हा कळले ते झोपेतील स्वप्न होते. म्हणून मा.आयुक्त महोदय, हे आमच्या ठाणेकर नागरिकांसाठी स्वप्न न राहता प्रत्यक्षात उतरणारी बाब व्हावी मी माझी मनापासून अपेक्षा आहे आणि सर्वसामान्य ठाणेकर जनतेला सुध्दा आपल्या आकडेवारीच्या खेळापुढे काही घेणेदेणे नाही. तुमचा अर्थसंकल्प १३२९ कोटीचा असू दया. १५०० कोटीचा होऊ दया. २००० कोटीचा होऊ दया. सर्व सामान्य नागरिकांना त्याच्याशी काही देणे-घेणे नाही. त्यांना सर्वसामान्य भेडसावणा-या समस्या म्हणजे रस्ते,फुटपाथ,रस्त्यावरील दिवे,पाणी समस्या या समस्या त्यांना रोजच्या दैनंदिन जीवनामध्ये भेडसावणा-या असतात. इथे उपस्थित असलेला महिला वर्ग या गोष्टीशी सहमत असेल. मा.महापौर महोदय, आपल्याकडील उत्पन्नाचे स्त्रोत बघताना जकातीचे उत्पन्न आपल्या महापालिकेसाठी सर्वात जास्त असते. परंतू आपण जकात नाक्यांसाठी काय करतो? या जकात नाक्यांसाठी आपण १ कोटीची तरतूद ठेवलेली आहे. मा.आयुक्त महोदय, १ कोटीमध्ये जकात नाक्यांची सुधारणा होणार नाही. कधी-कधी आपला कर्मचारी वर्ग एक शिफ्ट नाही तर तीन-तीन शिफ्टमध्ये काम करत असतो.परंतू तीन शिफ्टमध्ये काम करत असताना, त्यांना तिथे थोडा वेळ आराम करण्याची साधी तजवीज आपण केलेली नाही. मा.आयुक्त महोदय, या छोटया-छोटया गोष्टी आहेत. आपण त्यांना पाणी पिण्यासाठी ॲक्वागार्ड देऊ शकतो, झोपण्यासाठी त्यांना छोटीशी रेस्ट रुम बांधून देऊ शकतो. यासर्व सुविधा आपण छोटया माध्यमातून करु शकतो. म्हणून या सर्व गोंष्टींचा उहापोह या ठिकाणी झाला पाहिजे. या अर्थसंकल्पामध्ये आपण जकात नाक्यांच्या सुधारणांसाठी सन

२०१०-२०११ साठी जो संकल्प सोडलेला आहे. हीच तरतूद सन २००९-२०१०साठी सुध्दा आपण ठेवली होती. जकात नाक्यांसाठी सी.सी.कॅमेरे ठेवले होते पण प्रत्यक्ष त्यासाठी खर्च झालेला नाही आणि म्हणून आपण सन २०१०-२०११ ला या गोष्टी करायला घेतलेल्या आहेत. जकात चोरी हा अतिशय गंभीर विषय मा.आयुक्त महोदय, आजही जकात चोरी वेगवेगळया मार्गाने होते. रिक्षा वाहनांच्या सिटस् उघडून त्यातून बराचसा माल जकात चुकवून ठाणे शहरात आणला जातो. बसेसमधून माल आणला जातो. या सर्व गोष्टीवर आपल्या महानगरपालिकेचे नियंत्रण नाही. त्यासाठी आपल्याकडे भरारी पथक असायला पाहिजे. मी दरवर्षी मागणी करतो की, प्रभाग समिती निहाय भरारीपथक असली पाहिजेत आणि या भरारी पथकावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक सक्षम यंत्रणा असायला हवी. दरवर्षी आपले जकातीचे उत्पन्न थोडया-थोडया प्रमाणांत वाढते आहे. ३२५ कोटी, त्यानंतर ३७५ कोटी, नंतर ४०५ कोटी तुम्ही तर ५०० कोटीचे उद्दिष्ट दिले तर तेही उद्दिष्ट आपले जकात खाते पूर्ण करेल. कारण या सर्वांना माहिती आहे, जकातीची चोरी कुठून होते, जकातीचे गळती कुठून होते हे माहित असून सुध्दा त्याकडे दुर्लक्ष केले जाते त्यामुळे नुकसान महापालिकेचे होते. मा.आयुक्त महोदय, यासर्व गोष्टीचा आपण विचार केला पाहिजे. आजच्या वर्तमानपत्रात एक बातमी वाचली की, जकात चोरी पकडतांना मोठ-मोठी अवजड वाहने आपल्या महापालिकेच्या हद्दीमध्ये आणि हद्दीबाहेर उभी केली जातात आणि त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना वाहतुक कोंडीतून सहन करावा लागतो. मा.आयुक्त साहेब, तुमचा आदेश असताना सुध्दा या गाडया इथे आणल्या जातात. या सभागृहात असलेल्या सर्व सदस्यांना एक गोष्ट माहिती आहे की, इथे बोलण्याने काहीही होत नाही. तीन वर्ष अशीच गेली आणखीन दोन वर्ष अशीच जातील. पुन्हा निवडणूका येतील आपण परत निवडणूकांना समोरे जाऊ अशी सर्वसामान्य नागरिकांची आणि इथे बसलेल्या सर्व नगरसेवकांची भावना आहे. म्हणून या सभागृहात कोणी बसायला तयार होत नाही. याची परिणीती म्हणून परवाची सभा आपल्याला गणपूर्वी अभावी तहकूब करावी लागली होती. ही आपल्या सर्वासाठी शरमेची गोष्टी आहे. मा.आयुक्त महोदय, याबाबत आपण लक्ष घालावे.

दुसरा उत्पन्नाचा स्त्रोत आहे मालमत्ता कर. मा.महापौर महोदय, मालमत्ता करात आपण वेगवेगळे कर आकारतो. उदा,सामान्य कर,शिक्षणकर पण यासर्व सुविधा आपण सर्व सामान्य नागरिकांना देतो का? हा मोठा प्रश्न आहे. ठाणे महानगरपालिकेची आपण दोन हिस्स्यामध्ये वाटणी करु शकतो. एक झोपडपट्टीमध्ये राहणारा गरीब दुर्लक्षित वर्ग, आणि शहरी भागात राहणारा शहरी वर्ग. या शहरी वर्गासाठी आपण सॅटीस प्रकल्प दिला. त्यांच्या सुविधेसाठी आपण गार्डन देतो, नाटयसंकूल देतो. एखादया झोपडपट्टीमध्ये राहणा-या लोकांसाठी आपण काय सुविधा देतो हा विचार केलातर विश्वस्त म्हणून आपण या गुन्हामध्ये सामील होतोय असे कधी कधी वाटते. मा.महापौर महोदय, आमच्या कळव्यातील काही उदाहरणे देतो, वाघोबानगर,आतकोनेश्वरनगर या भागातील लोकसंख्या जवळ जवळ लाखाच्या घरात असेल. लाखाच्या घरात लोकसंख्या असूनही त्यांच्यासाठी सुलभ शौचालय नसतील, त्यांना पिण्याचे पाणी नसेल, चालण्यासाठी रस्ते नसतील अशा परिस्थितीत त्यांनी ठाणे महानगरपालिकेचा नागरिक म्हणून आपल्याबरोबर रहावे का? मा.महापौर महोदय, १३०० कोटीचे बजेट असताना, या छोटया-छोटया गोष्टी सामान्य नागरिकांना आणि गरीब दुर्लक्षित जनतेला आपण पोहचवू शकत नाही.

मा.महापौर महोदय, काही इमारतींना आणि घरांना तीन-चार वर्ष कर आकारणी केली जात नाही. त्यामुळे शेवटी महापालिकेचे नुकसान होते. बाजूच्या झोपडीला टॅक्स लागतो पण तिच्या बाजूच्या झोपडीला टॅक्स लावला जात नाही. आपले कर्मचारी-अधिकारी त्यांना काहीही कारण सांगून पिटाळून लावतात. अशाप्रकारच्या ब-याच तक्रारी नगरसेवक या नात्याने आमच्या कार्यालयात येतात. ज्या भागात १०० झोपडया आहेत त्यापैकी २०झोपडयांना टॅक्स लागला नाही तर त्यामुळे महापालिकेचे नुकसान आहे. कारण

महानगरपालिकेच्या जेवढया सुविधा आहेत त्या हे नागरिक वापरत असतात. उदा.पाणी घ्या, रस्त्यावरची वीज,गटारे, पायवाटा, सार्व.रस्ते यासर्व गोष्टी ते वापरतात. मग त्यांच्याकडून टॅक्स नको का घ्यायला. म्हणून आपल्या या कर प्रणालीमध्ये अमुलाग्र बदल करुन ताबडतोब टॅक्स कसा लावता येईल या गोष्टीचा विचार केला पाहिजे. मा.महापौर महोदय, अनधिकृत इमारतींना टॅक्स लावला तर अनधिकृत इमारतींना आपण संरक्षण देतोय असे होईल.

मा.महापौर महोदय, पाणी पुरवठा आकार आपण ८० कोटी रुपये अपेक्षित धरली होती पण फक्त ६५ कोटी उत्पन्न मिळालेले आहे. आपण कधी विचार केला आहे की, यामध्ये टेक्नीकल्स लॉस किती आहे. आपले टेक्नीकल्स लॉसेस २५ ते ३० % निघतील. मनिषनगर भागात सहा इंची लाईन सहा महिने झाले लिकेज आहे. महानगरपालिकेला सांगितलेतर ते एमआयडीसीची लाईन आहे असे सांगून त्यांच्याकडे पाठवितात. एमआयडीसीकडे संपर्क साधल्यावर ते महापालिकेची लाईन आहे असे सांगतात. मा.महापौर महोदय, जबाबदारी घ्यायला कोणी तयार होत नाही आणि पाणी मात्र वाया जात आहे. आज अशी परिस्थिती आहे की, पाण्यासाठी कधीही युध्द होऊ शकते. आपल्याकडे एवढे मुबलक पाणी आहे की, आपण पाणी वाया घालवू शकतो. सहा इंची लाईन बदलून किंवा दुरुस्त करुन जर पाणी वाचत असेलतर आपण पाणी का वाचवत नाही. या सर्व गोष्टीचा विचार व्हायला पाहिजे. अशाप्रकारे अनेक ठिकाणी लिकेजेस असण्याची शक्यता असून मोठया प्रमाणावर पाणी वाया जात असेल. आपण घरगुती वापरासाठी पाणी देतो तरी पाणी कमी वापरा किंवा मुंबई महानगरपालिकेमार्फत पाणी वाचविण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. अलिकडे सचिन तेंडुलकरने पाणी कमी वापरा म्हणून त्यांची जाहिरात केली होती. पाणी वाचविण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने आतापर्यंत काय केले आहे. मा.महापौर महोदय, ठाणे महापालिकेने सुध्दा असा आतापर्यंत ॲम्बेसेडर नेमून त्याच्यामार्फत जाहिरात करुन पाणी कमी वापरावे म्हणून लोकांचे प्रबोधन करायला पाहिजे होते. शॉवरने पाणी वापरु नका दोन वर्षापूर्वी ठाणे महानगरपालिकेने असा उपक्रम केली होता त्यावेळी हँडबील दिसले, ठाणे महापालिकेचे पोस्टर्स दिसले. पण आता तसे दिसत नाही हा मार्च महिना या महिन्यात आपण ३०% पाण्याची कपात करतोय. यावेळी जून महिन्यात पाऊस पडेल की नाही शंक आहे. त्यामुळे अजून आपल्याला चार महिने आहे ते पाणी आपल्याला पुरेल का? आपल्याला याची शाश्वती आहे का? म्हणून जे पाण्याचा स्त्रोत आपल्याकडे आहे ते आपण वाचवले पाहिजेत आणि ते पाणी कसे वाचवता येईल याचा आपण विचार केला पाहिजे. मा.महापौर महोदय, आणखीन काही ठिकाणचा नैसर्गिक जलस्त्रोताचा विचार या अर्थसंकल्पात आपण केलेला दिसत नाही. मागे सहा महिन्यांपूर्वी वर्तमानपत्रात चर्चा चालू होती की, येऊरच्या धबधब्याचे पाणी ठाणे करांना वापरायला मिळणार याचा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये व्हायला पाहिजे. तसेच पारसिक डोंगराच्या पलिकडे एक बंधारा आहे त्या पाण्याचा स्त्रोत आपल्याला कळव्यासाठी वापरता येईल. पाणी पुरवठयाबाबत बोलायचे झाले तर जवाहरलाल नेहरु योजने अंतर्गत आपण ११० दशलक्ष लिटर पाणी प्रकल्प नियोजित वेळेपेक्षा सहा महिने आगोदर पूर्ण केला आहे.

त्याबद्दल मा.आयुक्त साहेब व प्रशासनाचे अभिनंदन करण्यासारखे आहे. कारण सहा महिने अगोदर ठाणे महानगरपालिकेचे काम पूर्ण होणे म्हणजे खरोखर मोठी बाब आहे. कारण आपल्या माहितीप्रमाणे महापालिकेचे काम पंचवार्षिक योजनेप्रमाणे चालते.पण हे सहा महिने अगोदर झाले म्हणजे आमच्यासाठी खरोखर अभिनंदनाची गोष्ट आहे. मीटरपध्दतीची आपण सुरुवात केलेली आहे मा.आयुक्त साहेब, याबाबतीत सुध्दा तुमचे अभिनंदन करतो. मा.आयुक्त महोदय, आपण वितरण व्यवस्थेवर २३ कोटी रुपये खर्च केले आहेत ही सुध्दा एक चांगली गोष्ट आहे. पण नागरिकांचे प्रबोधन होणे सुध्दा तेवढेच गरजेचे आहे.

शहर विकास कर व तत्सम करातून मा.महापौर महोदय आपण जवळ जवळ ८५ कोटी रुपयांचे उत्पन्न आपण घेतो. त्याला आपण डेव्हलपमेंट चार्जेस म्हणतो. पण डेव्हलपमेंट चार्जेस आपण विकासकाकडून घेता परंतू त्या विकासकाला आपण काय सोयी देतो. आपण त्यांना कुठल्याच सोयी देत नाहीत. रस्ते देत नाही, पाणी देत नाही काहीच आपण देत नाही. मा.आयुक्त महोदय, अधिकृतपणे तो विकासक काम करतोय याचा काहीतरी फायदा त्याला व्हायला पाहिजे. विकास करात काहीतरी सूट दयायला हवी परंतू आपण तसे न करता विकास कर वाढवतोय. यामुळे आपण अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन देत आहोत असे होत नाही का? तसेच आपल्याकडे एखादा प्लॅन मंजूर व्हायला सहा-सहा महिने जातात.पण मुंबई महापालिका असेल किंवा पुणे महानगरपालिका असेल त्यांच्याकडे तीन-चार दिवसांत प्लॅन पास होतात. मग आपल्याकडेच सहा-सहा महिने प्लॅन व्हायला लागतात आणि म्हणून विकासकाचा कल अनधिकृत बांधकामावर असतो. तीन-चार महिन्यात अनधिकृत इमारत तयार होते. मा.महापौर महोदय, आज आपल्याकडे अशी जवळ जवळ ८०० आरक्षण आहेत, ओपन स्पॉटस् आहेत, ते आपल्या ताब्यात घ्यायला ८०० कोटी रुपये लागतील. आज अशी परिस्थिती आहे की, ८०० कोटी रुपये आपण खर्च करु शकत नाही. यासाठी आपण पाच कोटीची तरतूद केलेली आहे. ही आरक्षणे आपण टप्प्या टप्प्याने ताब्यात घ्यायला पाहिजेत. त्यासाठी २० कोटीची तरतूद आपल्याला दरवर्षी करावी लागणार आहे. आपल्याला त्यासाठी ठाणे महानगरपालिकेचा स्वतंत्र सेल तयार करावा लागेल. कारण आपल्याला ॲक्वीशनचा हक्क नाही. म्हणून प्रत्येक वेळी ही कामे शहर विकास विभागामार्फत केली जातात आणि शहर विकास विभागातर्फे केली जातात. शहर विकास हे पैसे कलेक्टर ऑफिसला भरणार त्यानंतर ती लॅण्ड ॲक्वीशन प्रोसिजर आपल्याकडे येणार मा.आयुक्त साहेब, ही सगळी यंत्रणा आपण राबवू शकतो आपल्याकडे ठेवू शकतो त्यामुळे याचा आपण विचार केला पाहिजे. कारण याच आरक्षित भूखंडावर अनधिकृत बांधकाम होतात. आताच हया ८०० भूखंडापैकी १५०ते २०० भूखंड अनधिकृत चाळींनी, अनधिकृत इमारतींनी व्याप्त झाले असतील. राहता राहिला प्रश्न ६०० भूखंडाचा त्यातील बरेच भूखंड या अर्थसंकल्पात नमूद केल्याप्रमाणे टी.डी.आर. मार्फत वगैरे आपल्या ताब्यात घेतलेले आहेत. इतर बरेच आपल्या ताब्यात यायचे आहेत. मा.आयुक्त महोदय, ज्यावेळी विकास नियंत्रण नियमावलीचा प्रश्न येतो त्यावेळी एखादी गोष्ट आपण अधिकृतपणे मान्य केलेली असताना किंवा एखादी गोष्टी मंजूर केलेली असताना त्यामध्ये फेरबदल केले जातात आणि विकास नियमावलीनुसार शहर विकासाचा कारभार म्हणजे उदा.बेसमेंटस् घ्या, शहरामध्ये ६५ बेसमेंटस् अनधिकृत आहेत. अधिकृत आणि अनधिकृत बेसमेंटस् आहेत की, त्याचा वापर विकास नियमावलीच्या पलिकडे जातो. आपल्याकडे पार्किंग प्लाझा नाही, आपल्याकडे पार्किंग प्लेसेस नाहीत. आपला राम मारुती रोड घ्या किंवा गोखले रोड घ्या या रस्त्यावर संध्याकाळच्या वेळी गाडया लावलेल्या असल्यामुळे लोकांना चालण्यास त्रास होतो. अशावेळी जर बेसमेंटस्मध्ये महानगरपालिकेला कारपार्किंग मिळाली तर चांगले होईल. हे सगळे प्राईम लोकेशनला आहेत. आपल्या शहर विकास विभागाकडे किती ठिकाणी अधिकृत व अनधिकृत बेसमेंटस् आहेत याची नोद आहे. दोन वर्षापूर्वी एक महिन्यात कारवाई करतो असे उत्तर शहर विकास विभागाने दिले होते. पण अजूनपर्यंत त्याबाबत कारवाई झालेली नाही. फक्त सर्व्हे झाला एवढी समाधानाची बाब आमच्यापुढे आहे.

मा.आयुक्त महोदय, अनधिकृत बांधकामासंदर्भात आणखीन एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणायची आहे. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत अंदाजे सव्वा लाख अनधिकृत बांधकामे आहेत. पण जेंव्हा कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर सारखी परिस्थिती आपल्यावर सुध्दा ओढवेल. माझ्या माहितीप्रमाणे अनधिकृत बांधकामासंदर्भात संपूर्ण ठाणे जिल्हाचे सर्व्हेक्षण होऊन आता हायकोर्टात हे प्रकरण प्रलंबित आहे.

तरी याबाबतीत कोर्टाचे आदेश येण्यापूर्वी आपण काहीतरी कालमर्यादा ठरवून शासनाकडे परवानगी मागू शकतो का? ज्याप्रमाणे सन१९९५ पूर्वीच्या झोपडपट्टी आपण नियमित करुन घेतो असे काही प्रस्ताव आपण शासनाकडे पाठवू शकतो का? मा.आयुक्त महोदय, आपण जिल्हाधिकारी असताना शासनाकडून एन.ए. करण्यासंदर्भात अशी एक ऑर्डर झाली होती की, सगळयांनी दंड भरुन एन.ए. करुन घ्या. त्याप्रमाणे एन.ए. आता नियमित केले जातात. तशाप्रकारे दंड आकारुन जर अनधिकृत बांधकाम आपल्याला अधिकृत करता आलीतर त्यातून आपल्याला ४०० ते ५०० कोटी रुपये आर्थिक फायदा होईल. आपण एक पाऊल आधी उचलून म्हणजे कोर्टाचे आदेश येण्याच्या आधी शासनाकडे तशी मागणी केली पाहिजे. कारण उल्हासनगरला कल्याण-डोंबिवलीसाठी शासनाने तसे आदेश दिलेले आहेत. त्याचा फायदा आपण आपल्यासाठी करुन घ्यावा.

मा.महापौर महोदय, घनकचरा व्यवस्थापनाबाबत बोलायचे झाले तर १५२ किलोमीटर रस्त्यांची साफ-सफाई आपण खाजगी ठेकेदारांमार्फत करतो मात्र होणारी साफ-सफाई अत्यंत असमाधानकारकरित्या होते. रस्त्या-रस्त्याला आजही कच-याची ढिग पडलेले असतात कोणही वेळेवर सफाई क रत नाही. तयामुळे यासाठी जी ८ कोटीची तरतूद केली आहे ती अतिशय जास्त आहे असे वाटते. त्यामुळे हे खाजगी ठेकेदाराला पोसण्याचे साधन तर नाही असा संशय कधी-कधी आपल्या मनात येतो. सर्वसामान्य जनताही संशयाच्या नजरेने बघते. त्यामुळे मा.आयुक्त महोदय, याचा पुर्नविचार करावा. त्याचप्रमाणे मागच्या वर्षी आपण डायघर प्रकल्प कार्यान्वित करणार होतो. परंतू अजूनही झालेला नाही तरी या डायघर प्रकल्पाबाबत मा.आयुक्त महोदय, या सभागृहाला माहिती दयावी अशी विनंती करतो.

सार्व.प्रसाधनगृहाची साफ-सफाई महिला बचत गटांना किंवा सामाजिक संस्थांना दयावी असे म्हटले आहे. पंरतू शौचालयाची सफाई वाल्मिकी समाजाला दयावी अशी विनंती करतो कारण ही काम फक्त तीच लोक चांगल्याप्रकारे करतात दुसर कुणीही त्यांच्यासारखी करणार नाही तरी याचा अंतर्भाव करावा.

आपण अनधिकृत बांधकामावर नियंत्रण आणणार आहोत. पण आपल्या महानगरपालिकेची सक्षम यंत्रणा असून सुध्दा अनधिकृत बांधकामे होत असतात. आपले अधिकारी आणि तोडणारा कर्मचारी वर्ग इतका कुशल आहे की, फक्त भिंतीच पाडल्या जातात. बाकीची इमारत तशीच ठेवतात. मा. आयुक्त महोदय, एखादी इमारत एका दिवसांत किंवा एका रात्रीच होऊ शकत नाही. एक अनधिकृत इमारत पूर्ण होण्यास दोन-तीन महिन्याचा कालावधी लागतोच आणि या दोन-तीन महिन्यात कार्यवाहीच फक्त नाटक केल जात. पोलीस यंत्रणा देऊन त्यासाठी पैसा खर्च करुन मग फायदा काय? आपल्या अतिक्रमण विभागाच्या कर्मचा-यां- व्यतिरिक्त ७० पोलिसांची फौज, आपले प्रशासकिय अधिकारी असताना ही अनधिकृत बांधकामे होतातच कशी हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे संशयाला कुठेना कुठेतरी जागा आहे. अनधिकृत बांधकाम करणा-यांवर कारवाई करण्यासाठी आपण लोक न्यायालयाची मागणी केलेली आहे. मा.महापौर महोदय, आतापर्यंत आपण किती लोकांवर कारवाई केली आहे? आतापर्यंत कोणावरही कारवाई होऊन शिक्षा झाली नाही. मग हया सर्व नाटकाचा फायदा काय? अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करत असताना, त्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे गरजेचे आहे.

निर्मल अभियाना अंतर्गत जवळ जवळ ९७०० सिटींगज् आपण १०० % अनुदानातून बांधत आहोत. पण आतापर्यंत फक्त २० ते २५% काम झालेले आहे हया कामाला एवढी दिरंगाई का होत आहे. एमएमआरडीएनी आपल्याला सगळे पैसे दिलेले आहेत. मागे याबाबत भ्रष्ट्राचाराचे प्रकरण चर्चेला आले होते. तरी सुध्दा का कामाला वेग का येत नाही? ब-याच ठिकाणी अर्धवट अवस्थेत कामे आहेत, मा.महापौर महोदय, ज्या ठिकाणी कामे चालू आहेत त्या ठिकाणी कामाचा दर्जा अतिशय निकृष्ठ आहे. आणखीन दोन-

तीन महिन्यांनी जर झालेल्या कामाची आपण पाहणी केली तर ती पुन्हा दुरुस्तीला येतील. मग पुन्हा आपण ही शौचालय एमएमआरडीएला दुरुस्त करायला सांगणार का? मा.महापौर महोदय, आपल्या मालकीच्या प्रत्येक इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट व्हायलाच पाहिजे. दर पाच वर्षानी त्या इमारतींची रंगरंगोटी, दुरुस्ती होणे गरजेचे असते.परंतू आतापर्यंत कळव्याचे यशवंत रामा साळवी तरण तलाव असू दया, दादोजी कोंडदेव स्टेडीयम असो हया व अशा किती वास्तूंची आतापर्यंत रंगरंगोटी केली आहे, किती वेळा रंगरंगोटी,दुरुस्ती केली आहे, किती वेळा स्ट्रक्चरल ऑडीट केले आहे? याचा ताळमेळ नाही मग आपण ज्या नविन वास्तू बनविणार आहोत त्या नविन वास्तूंची सुध्दा हीच अवस्था होणार असेलतर त्या नविन वास्तू तुम्ही बनवूच नका. जुन्या वास्तूच्या रंगरंगोटीचा, दुरुस्तीचा विचार होणे गरजेचे आहे. वेळेवर ही कामे न झाल्यामुळे आपल्याच वास्तूचे नुकसान होते. ज्या इमारतीचे आयुष्य ५० वर्ष असेल ते पाच वर्षावर येऊन थांबते. आपल्या यशवंत रामा साळवी तरण तलावाचे उदाहरण घेतले तर त्या ठिकाणी वरुन संपूर्ण लिकेज आहे. पावासाळा आला की, आपले प्रभाग समिती कार्यालय पावसाचे पाण्याने भरलेले असत. याबाबतगेली तीन वर्ष वारंवार आम्ही पाठपुरावा करुन सुध्दा काहीच सुधारणा आतापर्यंत झालेली नाही ही खेदाची बाब आहे.

मा.आयुक्त महोदय, आपण कावेसर येथे ६०० एकर जमिनीवर आंतर राष्ट्रीय पर्यटन स्थळ बनविण्याचा आपण प्रस्ताव करतोय याबद्दल तुमचे अभिनंदन. परंतू याबाबत येऊरचा सुध्दा विचार करावा कारण येऊर म्हणजे ठाण्याचे माथेरान आहे. या ठिकाणी आपण एक अतिशय उत्तम असा पक्षी संग्रहालय कमी खर्चात निर्माण करु शकतो. संजय गांधी उदयानाच्या निमित्ताने आपण हे करु शकतो. याबाबत मी मागच्या वर्षी सुध्दा मागणी केली होती.

अविकास नागरी दलित वस्ती सुधारणा :- मा.महापौर महोदय, नागरी दलित वस्तीत जेंव्हा आपण जातो तेंव्हा एखादया सोमालीया किंवा कुठल्यातरी दुर्गम देशामध्ये आलोत असे वाटते. अविकसित गांव कार्यक्रमासाठी आपण ६.५ कोटी रुपये यावेळी मंजूर केलेले आहेत. परंतू ही ६.५ कोटी रुपयांची तरतूद फार कमी वाटते. कारण ३२ गांव ही अविकसित ग्रामपंचायत म्हणून आपण सन १९८४ ला महापालिकेत विलीन केली होती. आता ३२ गांवापैकी काही गांव सुधारलेली आहेत. काही गांव अजूनही दुर्गम राहिलेली आहेत.मा.महापौर महोदय, या अविकसित गांवातील रस्ते, पाणी,वीज,फुटपाथ हया सर्व बाबींसाठी जास्त पैसे दिले पाहिजेत.

सांडपाण्याची पुर्नप्रक्रिया व वापर प्रकल्प येता वर्षात मा.आयुक्त महोदय आपण पूर्ण कराल असे दिलेले आहे. परंतू सांडपाणी पुनप्रक्रिया प्रकल्पाचे काम ५% सुध्दा मा.महापौर महोदय, पूर्ण झालेले नाही.

तसेच आपण या येत्या वर्षात केंद्र सरकारकडून कार्बन क्रेडीट घेत आहात आणि ठाणे महानगरपालिका ही कार्बन क्रेडीट घेणारी जगातील पहिलीच आणि एकमेव महानगरपालिका असणार आहे. पण आपण आपल्या अंतर्गत प्रदुषणाकडे मा. महापौर महोदय,र्दुलक्ष करतोय. आपल्याकडे जलप्रदुषण,ध्वनीप्रदुषण आणि वायू प्रदुषण आहे. ज्या ठिकाणी सायलेन्स झोन आहे त्या ठिकाणी अजूनही कर्कशः हॉर्न वाजविले जातात हा ध्वनीप्रदुषणाचा भाग आहे. मगे गणपतीच्या वेळी आपण कृत्रिम तलावाच्या संदर्भात चर्चा केली होती त्याप्रमाणे महापालिकेने कृत्रिम तलाव बनविले होते. त्यावेळी आपल्या जनसंपर्क विभागाचे अधिकारी श्री. माळवी यांना विचारले की, कृत्रिम तलावामध्ये जी माती जमते ती तुम्ही काय करता? त्यावेळी त्यांनी सांगितले की, ती परत खाडीत फेकतो. म्हणजे खाडीचे प्रदुषण आपण आणखीन वाढवतोय. याचा अर्थ तलाव साफ ठेवण्यासाठी आपण खाडीचे प्रदुषण करतोय. परंतू मा.महापौर महोदय, कृत्रिम तलावातील माती आय.आय.टी. पवई घेते हे आपल्या प्रशासनाला माहिती आहे का? त्या मातीच्या विटा बनवून विकल्या जातात. मा.महापौर महोदय, आपण पक्त पर्यावरण विषयक अहवाल देतो. परंतू

लोकजागृती-प्रबोधन करणे असे कुठलेच कार्यक्रम पर्यावरणाविभागाकडून होताना दिसत नाही. हया सर्व गोष्टींची आपल्या पृथ्वीला नितांत गरज आहे. ग्लोबल वॉर्मिंगचा सर्वात जास्त फटका आपल्या भारताला बसत आहे. ज्यावेळी आपली पृथवी वाचेल त्याचवेळी तुम्ही-आम्ही सगळे अर्थसंकल्पावर वर्षानुवर्ष चर्चा करणार आहोत. त्यामुळे पर्यावरण विभागाचा काहीतरी अंकूश या सर्व बाबींवर असला पाहिजे.

मा.महापौर महोदय, अग्निशमन सेवेचा विस्तार आणि अधुनिकीकरण होणे गरजेचे आहे. परंतू त्याला टेंडर सिस्टीम लावू नका कारण टेंडर सिस्टीम लागू केलीतर त्यांना ज्या वस्तू देतो त्या वस्तूंचा दर्जा खालावला जातो. मागे तारांगण दुर्घटनेमध्ये आपले सहा जवान शहिद झाले. अग्निशमन दलातील कर्मचा-यांना अग्निशमन सेवा देत असताना त्यांच्या जिवाशी त्यांना खेळावे लागते. त्यामुळे त्यांना अतिशय चांगल्या दर्जाचे साहित्य पुरवावे अशी माझी अपेक्षा आहे.

मा.सभापती,स्थायी समिती श्री. मिलींदजी पाटणकर साहेब, यांनी त्यांच्या भाषणामध्ये सांगितल्याप्रमाणे दादोजी कोंडदेव स्टेडीयमचे खाजगीकरण होणार असेलतर अतिशय चांगली गोष्ट आहे.

मा.महापौर महोदय, अजूनही सुरक्षा रक्षक तैनात झालेले नाहीत. कुणीही कधीही येत-कधीही जात. आपले हे कार्यालय सर्व सामान्य जनेतेसाठीच आहे पण कमित-कमी येणा-या लोकांना चेक करुन आतमध्ये पाठविले पाहिजे. मागे महासभा चालू असताना अपंगाचा मोर्चा सभागृहाबाहेर येऊन घोषणा देऊ लागला.

मा.महापौर महोदय, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पोस्टमार्टेमची सेवा २४ तास उपलब्ध असण्याची सुविधा उपलब्ध करुन दयावी. कारण आठ तास आपण करतो मात्र आपले डॉक्टर्स सकाळी १०.३० चे वेळ असतानाही ११.३०-१२.००वाजेपर्यंत येत नाहीत. हया ठिकाणी सेवा घेणारी गरीब जनता जी आहे ती ठाण्यातील वेगवेळया कोप-यातून आलेली असते किवा रात्री उशिरा कोणाचा मृत्यू झाल्यातर दुस-या दिवशी दुपारपर्यंत त्यांना तितका वेळ तातकळत उभे रहावे लागते. मा.महापौर महोदय, ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. आरोग्याधिकारी श्री.केंद्रे साहेबांनी मागच्या वर्षी अर्थसंकल्पाच्या वेळी सांगितले होते की, महिनाभरात आपण २४ तास सेवा उपलब्ध करुन देऊ असे आम्हाला या सभागृहात सांगितले होते. मात्र अजूनही त्यांनी हया गोष्टीकडे लक्ष दिलेले नाही. शिक्षण मंडळ आणि परिवहन समिती या दोन गोष्टींवर बोलायला गेलोतर ते आपल्या राशीला लागलेले राहू-केतू आहेत. मा.महापौर महोदय, शिक्षण व्यवस्थेच्या केंद्रस्थायी एखादया मुलाचा सर्वागीण बौध्दीक आणि शारिरीक विकास होण हे शिक्षणमंडळाचे ध्येय असले पाहिजे. आज आपल्याकडे जी मुलगी आली होती तिचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. पण मा.महापौर महोदय, चौथी-पाचवीच्या एका मुलाचे डोळे बंद करुन आपल्याकडे आणाआणि इथे उभे करा म्हणजे शिक्षण मंडळाच्या भ्रष्टाचाराबद्दल कुठल्याच पुराव्याची गरज लागणार नाही. इयत्ता चौथी-पाचवीमध्ये शिकणा-या मुलाला जर त्योच नांव लिहायला येत नसेल तर आपण ७५ कोटी रुपये खर्च करुन जर त्या मुलांना आपण शिक्षण देत नसू तर फायदा काय? यामध्ये ढोकाळी-बाळकूम हया शाळा अपवाद असतील. मा.आयुक्त महोदय, हा अतिशय
गंभीर विषय आहे. कारण आपण एक नविन पिढी तयार करतोय हीच मुल १५ वर्षांनी भावी नागरिक ठरणार आहेत आणि भारतीय समाजावर हेच विचार करणार आहे.

यानंतर परिवहन समितीबाबत थोड बोलणार आहे. परिवहन सेवेच्या ३५० बसेस आपण गृहित धरलेल्या आहेत आणि १९० किलोमीटर ऐवजी २५० किलोमीटर त्या चालणार आहेत. हा शोध कुठचा लावला ते मला कळले नाही. त्या कशा काय ६० किलोमीटर एका दिवसांत धावणार आहेत? मा.महापौर महोदय, त्या नुसत्या रस्त्यावर चालणे कठीण असताना त्या २५० किलोमीटर कशा चालणार आहेत? मा.महापौर महोदय, हा एकंदरीत संशोधनाचा विषय आहे. परिवहन सेवेच्या अर्थसंकल्पामध्ये त्यांनी म्हटले

आहे भाववाढ नाही. परंतू भाववाढ मागण्याचा त्यांना मुळात नैतिक अधिकारच नाही. कारण ही बस सेवा सर्वसामान्य जनतेसाठी आहे. सर्वसामान्य कोणत्या सुविधा ते देतात याचा त्यांनी विचार करायला पाहिजे. सन २००८-०९ साठी पाच कोटी रुपये कोलशेत आगाराच्या डेव्हलपमेंटसाठी मंजूर करण्यात आले होते आणि त्याप्रमाणे पाच कोटी रुपये परिवहन सेवेला दिले होते. त्यातील १ कोटी ३ लाख रुपये भरणी आणि सपाटी करणासाठी खर्च केले उर्वरित ४ कोटी रुपये त्यांनी कोलशेत आगारासाठी खर्च केले नाहीत. असे असताना आता परत १६ कोटी रुपये मागताहेत. मा.महापौर महोदय,परिवहन सेवा व्यवस्थापक यांनी तयार केलेले अर्थ संकल्पीय अंदाज परिवहन भू-संपान बांधकाम इत्यादी साठी पाच कोटी आणि परिवहन समितीसाठी १३ कोटी ८६ लाख सांगतात. म्हणजे तिथे सोन्याचे वगैरे बांधकाम करतात की, काय ते कळायला मार्ग नाही. पाच कोटी रुपये सन २००८-०९ ला परिवहन सेवेला दिले होते ते कोणाला विचारुन खर्च केले. मा.महापौर महोदय, कोलशेत आगार होणे महत्वाचे आहे पण न विचारता पैसे का खर्च केले? मा.आयुक्त महोदय,तुम्हाला विचारले,सभागृहाला विचारले की, मा.महापौरांना विचारले? कोणाला विचारुन पैसे खर्च केले? मा.महापौरा महोदय, त्यांचे बजेट हस्यास्पद आहे.

मा.महापौर महोदय, डिझेल खरेदीमध्ये जवळ जवळ एका टँकरमध्ये कमितकमी ५०० ते १००० लीटर डिझेल उतरविले जात नाही. हे डिझेल त्याच्यातच राहते त्याची सिस्टीमच तशी आहे. मा.महापौर महोदय, हे सगळे तिथला अधिका-यांना माहिती आहे पण कोणीही काहीही करत नाही. त्यामुळे महासभा म्हणून आम्हाला काहीतरी करणे गरजेचे आहे. मा.महापौर महोदय, हे सर्व अधिकार तुमचे सभागृहाचे आहेत. सभागृहाने याबाबत विचार करावा. जेंव्हा आपण शिक्षणमंडळ किंवा परिवहन सेवेवर करोडो रुपये खर्च करतो ते सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी खर्च करतो त्यांना प्राधान्य देऊन खर्च करतो. आपण करत असलेला खर्च योग्य कामासाठी खर्च होत नसेल तर सर्व सभागृहानी मिळून विचार केला पाहिजे की, यांना पैसे दयायचे की नाही.

**श्री. देवराम भोईर :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी सन्मा. सदस्य बजेटच्या अनुषंगाने परिवहन सेवे संदर्भात पोटतिडकीने बोलत आहेत. परिवहनचे अधिकारी ऐकायला आहेत का? म्हणजे याचा अर्थ असा होतो की, सदस्य या ठिकाणी परिवहन सेवेबाबत जे वक्तव्य करत आहेत त्यामध्ये तथ्य आहे असे या ठिकाणी दिसुन येते. ज्या अर्थी परिवहन सेवेचा अर्थसंकल्प मा.महासभेसमोर मांडला आहे त्यामुळे परिवहन सेवेमध्ये ज्या त्रृटी आहेत त्या भरुन काढण्यासाठी सभागृहातील सदस्य त्याबाबत चर्चा करत असताना,त्याबाबतची टिपण्णी या ठिकाणी झाली पाहिजे.

**श्री. मिलींद साळवी :-**

मा.महापौर महोदय, आपल्या परिवहन सेवेचे दोन आगार असताना आपल्या बसेस बाहेरुन दुरुस्ती हा काय प्रकार आहे मला कळत नाही. मा.महापौर महोदय, व्यवस्थापक आणि प्रशासन यामध्ये एवढी तफावत कशी काय असू शकते. मा.महापौर महोदय, प्रत्येक हेडखाली तफावत आहे. जमेच्या बाजूमध्ये तफावत आहे खर्चाच्या बाजूमध्ये तफावर आहे आणि खर्चाची बाजू बरीच वाढवून मागितल्या सारखे वाटते.

मा.महापौर महोदय, ब-याच विषयांवर चर्चा झाली. शेवटची पाच मिनीटे घेतो. मा.महापौर महोदय, खालून वर येताना कुणीतरी लिहीले होते थकू नये. हे आपल्या सभागृहातील सर्व नगरसवेकांसाठी होत. खरतर जेष्ठ नगरसेवकांना मानले पाहिजे कारण पाच-पाच वर्ष झाली किंवा पाच-पाच टर्म झाल्या तरी हे लोक थकत नाहीत. आम्ही लोक तीन वर्षात थकलो. मा.महापौर महोदय, बोलून-बोलून थकलो पण अजून

काहीही  सुधारणा होत नाही. तरी मा.महापौर महोदय, मी केलेल्या सूचनांचा विचार व्हावा अशी छोटीशी आशा बाळगतो. जय हिंद जय महाराष्ट्र.. ..

**श्रीमती छाया राव :-**

मा.महापौर महोदय, महिला बालकल्याण समितीचे सन २००९-२०१० चे बजेट ७.५ कोटीचे होते. आता ८ कोटी रुपये झाले आहे. पण दुःख एवढेच आहे की, हा संपूर्ण निधी वापरला जात नाही. कारण यासाठी इतक्या जाचक अटी-शर्ती आहेत की, आमची महिला त्याची पूर्तता करु शकत नाही. मा. महापौर महोदय, या अटी-शर्ती थोडयाशा शितील केल्यातर हे बजेट नक्कीच संपूर्ण वापरले जाईल. उदा. विधवेच्या मुलीच्या लग्नाला आपण दहा हजार रुपये देतो. त्यामध्ये मॅरेज सर्टिफिकेट सांगितले आहे. बिचारी ती विधवा महिला मॅरेज सर्टिफिकेट कुठून आणणार? ही अट जर नगरसेवकांच्या लेटरहेडवर पत्र आणून पूर्ण केली तर ब-याच विधवा महिलांचा त्याचा फायदा होईल. त्याच प्रमाणे ब्युटीपार्लरच्या  कोर्ससाठी १२वी पास सक्तीचे आहे. त्या ऐवजी सातवी-आठवीच्या मुलींसाठी केला तर ब-याच मुलींना त्याचा फायदा होऊ शकतो. मा.महापौर महोदय, यामधील ब-याच अटी-शर्ती शिथिल केल्यातर या निधीचा उपयोग जास्तीतजास्त होऊ शकतो. तसेच यावर्षी आचारसंहिता असल्यामुळे माझे सहा महिने आचारसंहितेमध्ये गेले. त्यामुळे टेंडर काढणे इत्यादी प्रोसिजर होण्यास भरपूर लेट झालाय आणि आता आपण संपूर्ण निधीचे वाटप करणार आहोत. आपण दोन वेळा जाहिरात दिल्यानंतर घरघंटी आणि शिलाई मशिनला आपल्याला जास्तीत जास्त प्रतिसाद मिळालेला आहे आणि हया वस्तू आपण मा.महापौरांच्या अनुमतीने लवकरच त्याचे वाटप करणार आहोत. मा.महापौरांनी सुध्दा मला माझ्या कामात बरीच मदत केली. वारंवार अधिकारी वर्गाला त्यांच्या दालनात बोलावून सूचना केलेल्या आहेत. मा.आयुक्त साहेबांनी सुध्दा बरीच मदत केली त्यामुळे चार-पाच महिन्यात मी ब-याचशा योजना राबविण्याचा प्रयत्न केला आहे आणि आता लवकरच हया वस्तूचे वाटप होईल ज्या दिवशी हया वस्तूंचे वाटप होईल त्या दिवशी मी केलेल्या कामाचे चीज होईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते धन्यवाद.. जय हिंद जय महाराष्ट्र .. ..

**सौ. महेश्वरी तरे :-**

ठाणे महानगरपालिकेचे सन २००९-२०१० चे सुधारीत आणि सन २०१०-२०११ चे मुळ अर्थसंकल्पावर आज चर्चा करताना ब-याच सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. तरी महापालिकेच्या स्वतःच्या महसूलावर जागतिक आर्थिक मंदीमुळे सर्व महानगरपालिकेंचे उत्पन्न घटले असले तरी आपल्या ठाणे महापालिकेचे उत्पन्न निश्चितच चांगले आहे ही गोष्ट भुषणावह आहे. प्रशासन आपले कार्य अतिशय गतिमान करुन कार्यशिल करेल.आणि आपले जे उत्पन्नाचे स्त्रोत आहे ते वाढविण्याचा प्रयत्न करेल अशी मी सुरुवातीलाच आशा करते. परवा आपली जी मिटींग तहकूब झाली ते सर्वच पेपरमध्ये आले होते की, सभागृहात सर्वच नगरसेवकांची उदासिनता. ही उदासिनता का दिसून येते याचा देखिल प्रत्येकाने विचार करणे गरजेचे आहे. कारण आता सातत्याने तीन वर्ष आम्ही या बोर्डात बोलतोय ज्या अतिशय महत्वाच्या सुचना मी असे म्हणत नाही की, सन्मा.नगरसेवक आपल्या सूचना मांडतात त्या सगळयाच प्रशासनाने कार्यान्वित कराव्यात परंतू ज्या सूचना आपम्ही अतिशय पोटतिडकीने मांडतो त्याचा कुठेतरी उपयोग झाला पाहिजे. कारण सगळया महिला नगरसेविकांची असे मत आहे की, तुम्ही बोलून काय उपयोग झाली की,आम्ही बोलावे. तरी असे होता कामा नये. आमची महिला नगरसेविका अशरिन एकदा बोलायला उभी राहिली असताना ती शाळा बोलत असताना कोणीतरी मध्येच नाला असे बोलले. मी मुस्लीम असल्यामुळे ती शाला म्हणाली होती.कुणीतरी नाला बोलल्यामुळे तिचे मनोधैर्य  खचल्यामुळे त्यानंतर तीने सभागृहात तोंड उघडले नाही. आता सुध्दा म्हणाल की, ३३% टक्के असले तरी सगळयांनी बोलावे का? महिलांना

खाली बसविले जाते बोलून दिले जात नाही. आमचे सुध्दा महत्वाचे थोडे मुद्दे आहेत ते आम्हाला बोलू दयावेत नाहीतर आमचे पत्रकार बंधू असतात ते म्हणतात नगरसेविका मौन धारण करुन बसल्या आहेत अशी ही टिका आमच्यावर होते. बोलण्याचा उद्देश एवढाचा आहे की, आमच्यापेक्षा जेष्ठ बोलणार आहेत. आमच्यापेक्षा चांगले विचार या सभागृहात मांडणारी लोक आहेत. माझे महत्वाचे विचार या ठिकाणी मी मांडणार आहे.

मा.महापौर महोदय, जकात हे आपले उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे. गेल्या महिन्यात आपण बघितले असेल की, मुबईच महापौर सौ.श्रध्दा जाधव यांना खबर मिळाली. सगळीकडे जकात चोरी होत नाही असा मुद्दा डावलला जातो.परंतू आपण बघितले तर आपल्या महानगरपालिकेच्या कर्मचा-याला बदली हवी असते पण इतर कोणत्या खात्यात नको फक्त जकात विभागातच त्यांना बदली पाहिजे असते. हे आपल्या सर्व नगरसेवकांनाही माहित आहे. तो बदली फक्त जकात विभागातच का मागतो? मा.महापौर महोदय, हा प्रश्न देखिल अतिशय महत्वाचा आहे. आपल्याकडे निरनिराळे दुसरे विभाग असताना त्यांना तिथे बदली नको, काम नको पण उत्पन्न मिळण्याची आशा जास्त असते. म्हणून हे सुध्दा तपासून बघितले पाहिजे कारण जकात चोरी आहे आणि जकात विभागात भ्रष्टाचार आहे हे यावरुन सिध्द होते. मा.आयुक्त महोदय, जकातीसाठी जे उद्दिष्ट दिले जाते. आपण त्याच्या आसपास पोहचतो किंवा त्या उद्दिष्टापर्यंत पोहचतो. त्यापेक्षा जास्त वसुली का होत नाही? हा देखिल एक मुद्दा गौण आहे. ११ दिवसांपूर्वी श्री. भट, साहेबांनी सांगितले होते की, आतापर्यंत ३५६ कोटी रुपये जकात वसूली झालेली आहे. उर्वरित वसूली ११ दिवसांत होईल म्हणजे आम्ही दिलेले उद्दिष्ट साध्य करु. आपण दिलेल्या उद्दिष्टापर्यंत जातो त्यापेक्षा जास्त वसूली काय होत नाही हा विचार करण्याचा भागा आहे. मा.महापौर महोदय, प्रायव्हेटस् कारमधून प्रवासी बॅगेतून जकात चोरी होते.मात्र आपल्याला वाटते हे कुठेतरी बाहेर जाणारे कुटूंब आहे. त्यानंतर काही गाडयांवर आपल्या महापालिकेचा लोगो लावला जातो त्या माध्यमातून जकात चोरी होते. मुंबईच्या महापौर स्वतः महिला असून देखिल रात्री तीन वाजता दोन जकात चोरी उघडकीस आणून त्याचे उत्पन्न महापालिकेला मिळवून दिले. माझी मा.महापौर महोदयांना अशी विनंती आहे की, आपणही आपल्या जकात विभागात डिटेक्टीव्हज् ठेवावेत, सी.सी. कॅमेरे लावले तरी आपण म्हणतो त्याप्रमाणे उंदराला मांजर साक्ष त्याप्रमाणे. तरी जकात विभागासाठी डिटेक्टीव्हज् नेमावेत जेणेकरुन आपल्यालाही अशा खबरी मिळाल्यातर निश्चितच आपले जकातीचे उत्पन्न वाढू शकते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे जकातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्याकडे दक्षता विभाग आहे का असा मी प्रश्न विचारला होता. याबाबत मला कोणीही माहिती देत नाही किंवा सांगण्याचा प्रयत्नही करत नाही. प्रश्न विचारला तर त्याचे उत्तरही येत नाही. मा.महापौर महोदय, महापालिकेचा लोगो लावून जी जकात चोरी करतात त्यांच्यावर दंडात्मक कठोर कारवाई केली तर निश्चितच याला आळा बसेल.

मा.महापौर महोदय, मालमत्ता कराची वसूली करताना आपण लिलाव करतो किंवा जंगम मालमत्ता जप्त करणे अशा अनेक प्रकारे मालमत्ता वसूली करण्यांत येते. मालमत्ता वसूली थकबाकीवर प्रशासकिय आकारात सवलत देऊन मालमत्ता वसूली वाढविता येते हे आपल्याला माहिती आहे. परंतू बहूतेक नागरिक आम्हाला मालमत्ता कर लावण्यांत यावा यासाठी प्रभाग समिती कार्यालयात फे-या मारतात. परतू कर्मचा-यांच्या काम न करण्याच्या भूमिकेमुळे सामान्य नागरिक शेवटी कंटाळून जातो आणि मालमत्ता कर लावता गप्प बसून राहतो. यामुळे सुध्दा आपल्या मालमत्ता कर बुडत आहे. मालमत्ताधारकांसाठी आपण इंटानेट द्वारे मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे आपण सुरु केलेली ही सुविधा निश्चितच चांगली आहे. त्यामुळे जो नोकरदार वर्ग आहे ज्यांना वेळ मिळत नाही.

त्या लोकांचा मालमत्ता कर वेळेत भरला जाणार आहे. मा.महापौर महोदय, आपल्याकडे कौतुकास्पद बाबी सुध्दा आहेत आणि टीका करण्यासारख्या सुध्दा बाबी आहेत. काही कर्मचारी असे आहेत की, कर लावताना सामान्य नागरिक असेल ज्याला काही कळत नसेल त्याला जास्तीचा मालमत्ता कर किंवा कुठला इतर कर लावून तो घाबरल्यावर तू नंतर येऊन भेट असे सांगितले जाते ही वस्तुस्थिती आहे. साठ-सत्तर हजार भरावे लागतील त्यापेक्षा दोन-चार हजार मला दया मी तुम्हाला टॅक्स कमी करुन देतो असे सांगितले जाते. तो नागरिक त्या कर्मचा-यांला पैसे देऊन मोकळा होतो आणि प्रत्यक्षात मात्र त्याचा मालमत्ता कर तेवढा नसतो. ज्यावेळी हे प्रकरण त्यांच्या अंगाशी येते तेंव्हा मात्र प्रिटींग मिस्टेक आहे असे सांगून हे प्रकरण दडपले जाते. याबाबतही नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. मा.महापौर महोदय, असे प्रकार प्रभाग समितीत होतात. मी प्रभाग समिती अध्यक्ष असताना एक-दोघांना दम देऊन सांगितले होते असे पुन्हा होता कामा नये.

अनधिकृत बांधकामावर मालमत्ता कर आकारणी करताना आपण नियमित कराच्या दुप्पट कर आकारणी करतो. त्यामुळे आपल्या महसूलात वाढ होतो. परंतू सामान्य नागरिकांवर एखादी दंडात्मक कारवाई केली आणि त्यांना अधिकृत करुन घेण्यात आले तर त्यांनाही दिलासा मिळेल आणि आपल्या मालमत्ता कराची वसूलीत वाढ होईल असे मला वाटते.

गेले तीन वर्ष मी सतत बोलत आहे की, उथळसर प्रभाग समितीत जे गाळे आहेत.ते बांधून बरीच वर्ष तसेच बंद असल्यामुळे आपला महसूल बुडत आहे. तरी हे गाळे वाजवीदरात आपल्या महिला बचत गटांना दया जेणेकरुन अगदी काहीच उत्पन्न न मिळण्यापेक्षा काहीतरी उत्पन्न मिळू शकेल. याबाबत तीन वर्ष बोलून झालेले आहे पण कोणी काहीच विचार केलेला दिसत नाही. महिला बचत गटांना वाजवी दरात गाळे दिल्यामुळे त्यांच्या सक्षमीकरणास आपल्याकडून मदत होईल आणि स्वार्थ परमार्थ दोन्ही साधता येईल.

पाणी पट्टीकर :- ठाणे महानगरपालकेची पाणी पुरवठयाची आपली १०० दशलक्ष लीटर पाणी योजना महापालिकेने कर्ज न घेता स्वतःच्या निधीतून नियोजित वेळेपेक्षा सहा महिने अगोदर पूर्ण केली त्याबद्दल मी प्रशासनाचे अभिनंदन करत आहे. ज्या गोष्टीबाबत अभिनंदन करावे त्याबद्दल अभिनंदन करावे पण जिथे चूक आहे ती निदर्शनास आणणे हे आमचे कर्तव्य आहे. पाणीपट्टीत करात अनधिकृत नळ जोडण्या, गळतीचे प्रमाण,चोरीचे प्रमाण अशा खूप समस्या आहेत. परंतू आतापर्यंत उथळसर प्रभाग समितीची पाणीपट्टीची वसुली ६५% झाली आहे आणि ती कौतुकास्पद आहे. पण त्याचबरोबर पाणीपट्टी कर वाढविण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी बहुतेक स्लम एरियातील नागरिकांची अशी तक्रार आहे की, आम्हाला पाणी बिले वेळेवर
येत नाहीत. त्यामुळे आम्ही वेळेवर बिले भरु शकत नाही. जर आपल्याकडे कर्मचारी वर्ग अपुरा असेलतर अशाप्रकारची बिले वाटप करण्यास एखादया सामाजिक संस्थेला किंवा महिला बचत गटाला ही कामे देण्यात यावी जेणेकरुन नागरिकांना वेळेवर पाणी बिले मिळतील आणि आपली थकबाकी राहणार नाही. कारण थकबाकीमुळे त्याचे महिन्याचे एक-दोन हजार रुपयांचे जे बजेट असते ते कोलमडते आणि आपले पाणी बिल भरले जात नाही तरी याबाबत काहीतरी विचार व्हायला पाहजे.

अनधिकृत नळ कनेक्शन घेतल्यास विशिष्ट दंड आकारुन ते नियमित करण्याचा आपण ठराव केलेला आहे. परंतू दंडाची रक्कम जास्त असल्यामुळे झोपडपट्टीतील नागरिक दंड भरुन अनधिकृत नळ कनेक्शन नियमित करत नाहीत. त्यामुळे दंडात्मक आकारामुळे मिळणा-या उत्पन्नाला आपल्याला मुकावे लागते. ही दंडाची रक्कम जर कमी केलीतर पाणी पुरवठा करात आपले उत्पन्न चांगले वाढू शकते. त्याचप्रमाणे सभागृहास ही गोष्ट निदर्शनास आणावीशी वाटते ज्याप्रमाणे मी उथळसर प्रभाग समितीची

कौतुक केले त्याप्रमाणे वेळ आली तरी कान उघडणी करण्याचा अधिकार आम्हा नगरसेवकांचा आहे. सोमवार दिनांक २२ मार्च २०१० रोजी पुढारी पेपरच्या पुरवणीत एक बातमी आली होती की, ८.५० कोटीचा टँकर घोटाळा.ती बातमी वाचल्यानंतर मला कळले की, ठाण्यातील दोन बंधू राजीव आणि संजीव दत्ता. त्या बातमीमध्ये लिहीले होते की, अधिकारी आणि कर्मचा-यांचया लॉबीनी बिल्डर पाणी माफियांशी संगनमत करुन पालिकेला कोटयावधीचा महसूल बुडविला आहे. या आर्थिक वर्षात ६५ कोटी पाणीपट्टी वसूलीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे आणि सामान्य नागरिकांचे थकबाकी पोटी नळ कनेक्शन खंडीत केले जाते. परंतू या ठिकाणी टॅकरद्वारे जो घोटाळा झालेला आहे त्यात असे दिले आहे की, खाजगी टँकरद्वारे अल्पदरात राजरोसपणे पाण्याचा अपहार होत आहे. उथळसर प्रभाग समितीतील जेल टाकीवरुन आणि साकेत येथील जलवाहिनीच्या फिलींग स्टेशनवरुन दररोज ७० टँकर पाणी भरुन नेतात. मात्र करदात्यांना कधी कमी दबाने किंवा सक्तीने ते पाणी पुरवठा बंद केला जातो. परंतू या टँकर लॉबीला मात्र महिन्याचे तीसही दिवस मुबलक पाणी पुरवठा होतो आणि टँकर नागरी वस्तीत किंवा झोपडपट्टीत जाण्याचे भासवून सर्रास ते इमारत बांधकामासाठी वापरले जाते. बाजारभावानुसार १० ते ११ रुपये लिटर पाणी पालिका कवडीमोल भावाने विक्री करते या मोठयाप्रमाणावर तफावत असल्याचे या बंधूनी जाहिर केले आहे. मला वाटते आपण हा बातमी अंक वाचावा. या घडामोडीवर पालिका प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याची लेखी कबूली त्यांनी दिली आहे. कारण घरगुती वापरासाठी आपण ४५० रुपये भावाने टँकर मागवतो तो व्यापारी वापरासाठी ८५० रुपये प्रति टँकर असा भाव लावताना त्यांनी त्यांचा हिशोब देताना १ जानेवारी २००९ ते ५ डिसेंबर २००९ अवघे १०,९५०/- रुपये महापालिकेच्या तिजोरीत जमा केलेले आहेत आणि पालिका प्रशासनाने यापूर्वी माहितीच्या अधिकारात त्यांनी अशी माहिती दिली आहे की, १ जानेवारी २००९ ते १५ जून २००९ या कालावधीत ९३५०/-रुपये इतके उत्पन्न दाखविले आहे इथे आपल्याला नक्कीच तफावत दिसून येते. याचा अर्थ यात नक्कीच भ्रष्टाचार झालेला आहे आणि याची पालमुळे खोदण्याचे काम प्रशासनाने करावे. गेल्या नऊ वर्षात केलेला पाणी पुरवठा ८,१४,५६,०००/- रुपये होतो. परंतू व्यावसायिक व्यापारानुसार आपण आकडेमोड केल्यास हीच रक्कम साडे पंधरा कोटीच्या वर जाते. जर इथे जाणीवपूर्वक लक्ष घातले तर पाणीपट्टी करातील आपले महसूल नक्कीच वाढेल. त्याचप्रमाणे आपण पाणी बचतीसाठी प्रसिध्दपत्रक काढतो आणि लाखो रुपये या पत्रकासाठी खर्च करतो मात्र अग्निशमन दलाच्या बंबाना, नालेसफाई, गटार सफाईच्या जेटींग मशीनसाठी पिण्याचे पाणी वापरले जाते अशी माहिती इथे उपलब्ध झालेली आहे. मा.महापौरांचे मी अभिनंदन करेन की, पाणी टंचाईसाठी विहीरींचा प्रशासन अहवाल मागविला आहे. आपल्या संपूर्ण ठाणे महापालिका क्षेत्रात असणा-या ९५१ विहीरी व कुपनलिकांचा पाणी वापरात आणणार अशी ग्वाही स्वतः मा.महापौरांनी दिलेली आहे आणि हा अतिशय कौतुकास्पद निर्णय आहे. कारण ग्लोंबल वॉर्मिंगमुळे अनियमित होणा-या पावसामुळे आगामी वर्षात होणा-या पाणी टंचाईसाठी हा निर्णय घेणे अतिशय आवश्यक आहे. आपल्याकडे विहीरी पुर्नजिवीत करणे हयासाठी स्वत्रंत हेड आहे. पण दरवर्षी हया विहीरी साफ केल्या जातात का ? दोन वर्ष सतत पाठपुरावा केल्यावर माझ्या प्रभागातील दोन विहीरी साफ झाल्या असे न होता संपूर्ण विहीरी साफ झाल्या पाहिजेत. यात विहीरींवर जाळी बसविणे, विहीरीची साफ -सफाई करणे, जंतु नाशकींची मात्रा टाकणे यासाठी ५० लखाची तरतुद करण्यांत आली आहे. मात्र ९५१ विहीरी लक्षात घेता ही तरतुद वाढवली पाहिजे. ३६३ विहीरी व २२५ कुपनलिकांतून मिळणा-या ४५ दशलक्ष लीटर पाण्याचा वापर पिण्या व्यतिरिक्त कामासाठी केला जात आहे आणि २१२ विहीरी आणि १३१ कुपनलिकांमध्ये सुमारे ३५ दशलक्ष लीटर पाणी वापराशिवाय पडून आहे. हा मुद्दा आपण लक्षात घेतला पाहिजे. विहीरी साफसफाईचे काम बचत

गटांना देण्यात येणार आहे असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे विहीरींमध्ये पोटॅशियम परमॅगनेट टाकून पाण्याची दुर्गंधी नाहीशी करण्याचा प्रयत्न करणार आहोत आणि वापरात नसलेल्या विहीरींची सुध्दा साफ-सफाई करणार आहोत परंतू या कामासाठी निधीची तरतूद झाल्यानंतर ह कामे सुरु होतील आपल्या अधिकारी सौ. मनिषा प्रधान यांनी सांगितले आहे. तरी अशा कामांसाठी निधीची तरतुद करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे हया विहीरीच्या पाण्याची तपासणी करण्यांत आली असून ते पाणी पिण्यासाठी योग्य आहे की नाही याची देखिल या अहवालात माहिती आहे. जडत्व, लेड, कॅडमियम असे जड धातू या पाण्यात असल्यामुळे हे पाणी पिण्यासाठी योग्य नाही असा अहवाल आहे तरी हे पाणी टॉयलेट-बाथरुम, झाडांसाठी इतर वापरासाठी आपण वापरु शकतो. जेणेकरुन येणा-या पाणी टंचाईला आपण तोंड देऊ शकतो.त्याचप्रमाणे कुपनलिकेच्या आवारातील जमिनी खालच्या पाण्याची पातळी वाढवली तर आपल्याला तिथे नियमित पाणी मिळू शकेल. तसेच रेन हार्व्हेस्टिंग-वॉटर हार्व्हेस्टिंग करण्याचे पालिकेने ठरविले आहे. त्याचप्रमाणे कुपनलिकेच्या हातपंपाच्या दुरुस्तीची कामे देखिल लवकर सुरु करण्यांत येत आहेत. सौर उर्जा आणि रेन वॉटर हार्व्हेस्टिंग प्रकल्प राबविणारी आपली देशातील ही पहिली महानगरपालिका आहे. बहुतेक बाबतीत आपण असे सांगतो की, ही आमची पहिली महानगरपालिका आहे पण एवढे बोलून चालणार नाही. कारण आपण जे प्रकल्प हातात घेतो ते चांगल्याप्रकारे कार्यान्वित करणे हे देखिल प्रशासनाचे आणि आमच्या लोकप्रतिनिधीचे काम आहे. जर कुठे वावगे वाटत असेल तर ती चुक प्रशासनाच्या लक्षात आणून देणे हे आमचे कर्तव्य आहे. यानंतर ब-याच खाजगी सोसायटयांमधील सुजाण नागरिक रेन वॉटर हार्व्हेस्टिंग प्रकल्प आमच्या इथे राबविण्यात यावा अशी मागणी आमच्याकडे येतात. ज्या भागामध्ये अशा खाजगी सोसायटया आहेत तिथे महापालिकेच्या कुठल्याच सुविधा आपण देऊ शकत नाहीत. तरी रेन वॉटर हार्व्हेस्टिंगसाठी हया सोसायटयांना महापालिकेतर्फे थोडीशी सवलत देऊन अशाप्रकारचे प्रकल्प आपण राबविले तर त्या सोसायटयांमधील नागरिक खुश होतील की, आमच्यासाठी देखिल महानगरपालिका काहीतरी प्रकल्प राबवित आहे. याबाबत माझी मैत्रिण सन्मा.सदस्य सौ‍त्र कविता पाटील हिचे अभिनंदन करेन की, तिच्या भागातील ब्रम्हांड येथील एका सोसायटीमध्ये कुपनलिकेचे पाणी यंत्राद्वारे स्वच्छ करुन ते पाणी पिण्यासाठी वापरण्यांत आलेले आहे. सर्वच नगरसेवकांच्या भागात हे व्हायला हरकत नाही. त्यासाठी कुपनलिका खोदणे यासाठी स्वतंत्र हेड असणे आवश्यक आहे. मला वाटते मुंबई महापालिकेत देखिल सन्मा.नगरसेवकांनी ही मागणी केलेली आहे. तरी आपण आपल्या महापालिकेमध्ये सुध्दा हे एक स्वतंत्र हेड ठेवून आपण येणा-या पाणी टंचाईला तोंड देऊ शकतो. त्याचप्रमाणे आपण वर्षासंचयन प्रकल्प तयार करण्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ती तरतूद सुध्दा आपण वाढवली पाहिजे आणि पाण्याची चोरी आणि पाण्याचा अनावश्यक वापर यासाठी आपण मीटर लावून पाण्याची मोजणी करणार आहोत हा अतिशय चांगला उपक्रम आहे. परंतू मीटरमध्ये पाणी चोरी झाली नाही तर आपल्या महसूलात निश्चितच वाढ होईल. परंतू मीटरमध्ये काही घोटाळा असेल कारण आपण बघतो एमएसईबीने जे नविन मीटर लावले आहेत त्याबाबत नागरिकांच्या तक्रारी आहेत की हे मीटर खूपच फास्ट धावतात. ज्यांच्याकडे एक बल्ब, एक लाईट त्यांना देखिल पंचवीस हजार रुपये लाईट बील येत आहे. तरी हा मुद्दा देखिल आपण मीटर लावताना लक्षात घेतला पाहिजे.

रस्ता फोड फी यातून आपण २२ कोटीची जमा अपेक्षित धरलेली आहे. परंतू आपण कुठल्याही प्रभागात रस्ता केला की, महानगर गॅस लिमिटेड,वोडाफोन ,एअरटेल हे त्यांची कामे करण्यासाठी रस्ता खोदतात त्यांना रस्ता दुरुस्ती कोण करुन देणार असे विचारले तर ते सांगतात की, आम्ही महानगरपालिकेला फी भरलेली आहे. पण महानगरपालिका त्यांचे काम झाल्यावर हया रस्त्यांचे काम नीट

होते की, नाही हे पाहत नाही. माझ्या माहितीप्रमाणे बहुतेक वेळा त्यांच्याकडून रस्ता व्यवस्थित दुरुस्त होत नाही. हयाबाबत सर्व नगरसेवक माझ्या मताशी सहमत असतील. याबाबत नागरिकांची आमच्या पाठीशी बोंब असते की, हा रस्ता खोदला आहे तो नीट करुन घ्या, मग डांबर कमी पडले आहे. मग ही रस्ता फोड फी जी आकारली जाते ती कुठे जाते? मला वाटते रस्ता फोड फी जर आपण आकारतो तर मग हे रस्ते नीट व्हायला पाहिजेत अशी मी या ठिकाणी मागणी करते.

यानंतर आपली एक सेवा आहे अग्निशमन सेवा :- महापालिका अस्तित्वात हद्दीतील इमारतींना पूर्वी कॅपीटेशन फी आकारली जात होती. ती आता अग्निशमन फी म्हणून आकारण्यांत येत आहे आणि यातून आपण १२.४१ कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित धरले आहे. याबाबत मा.आयुक्त साहेबांच्या निवेदनात माहिती दिलेली आहे की, पाच फायरस्टेशन आपल्याकडे आहेत. आणि अजून तीन ठिकाणी फायरस्टेशन आपण सुरु करणार आहोत. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत उत्तुंग इमारती,शॉपिंग मॉल्स्,मल्टीप्लेक्स चिटपट गृह अशा बांधकामात अतिशय मोठया प्रमाणावर वाढ होत आहे आणि त्यामुळे धोक्याचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे. त्यामुळे आपल्या अग्निशमन दलाकडे असलेल्या साधन सामुग्रीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तसेच आपल्या अग्निशमन दलाचे अधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. एखादया वेळी पूर परिस्थिती निर्माण झाल्यावर रॅकेट लॉंच सारख्या साधनांची आपल्याला गरज आहे आणि ती साधने आपण खरेदी करणार आहोत. आधुनिक आग विमोचन वाहने, साधनसामुग्री खरेदी करणे गरजेचे आहे. तारांगण दुर्घटनेबाबत या सभागृहात बरीच चर्चा, बरीच उहापोह झालेला आहे. पण त्याच वेळी आपल्याला समजून आले की, आपल्याकडील अग्निशमन दल किती सक्षम आहे किंवा किती प्रशिक्षित आहे. सामान्य माणसांना सुध्दा माहिती असते लिफ्ट शेजारी सूचना लिहीलेली असते आग लागलेल असतांना लिफ्टचा वापर करु नये परतू आपले सहा कर्मचारी मात्र लिफ्टने वर गेले यावरुन ते किती प्रशिक्षित होते याचा आपल्याला अंदाज येतो.आपण माहिती मागितली असता कुठलीही प्रकारची माहीती दिली जात नाही. त्यामुळे सर्वप्रथम आपल्या अग्निशमन दलाना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे आणि या धर्तीवर नव्याने होणा-या इमारतींना N.O.C. देताना तिथे फायर लिफ्ट लावण्याची सक्ती करण्यांत यावी अशी मा.आयुक्तांना विनंती करते.त्याचप्रमाणे एकमेकांशी ंवाद साधण्यासाठी वॉकीटॉकीची गरज आहे. जे सहा कर्मचारी लिफ्टमधून वर गेले ते खालच्या कोणाशीही संवाद साधू शकले नाहीत. जर त्यांच्याकडे वॉकीटॉकीची सोय असती तर त्यांना एकमेकांशी संवाद साधता आला असता तर ही दुर्घटना टळली असती. तरी वॉकीटॉकीसारखी साधने अग्निशमन दलाच्या ताफात असणे अतिशय गरजेचे आहे.

आपण आपल्या अर्थसंकल्पात नमूद केले आहे की, २५ मीटर लॅडर आणि ५५ मीटर एरियल लॅडर खरेदी करणे. मी मुंबई महापालिकेची माहिती काढली आहे त्यांच्याकडे अतिशय उत्तुंग इमारत आहेत. त्यांच्याकडे ६८ मीटर उंच एरियल लॅडर आणि ६४ मीटर हायड्रोक्लेरिक लॅडा आहेत. त्यामुळे त्यांची उंची २२ ते २३ मजल्यापर्यंत जाऊ शकते. त्यांच्याकडे स्कायलिफ्ट आहेत. तशाप्रकारची साधनसामुंग्री आपल्याकडे सुध्दा असणे गरजेचे आहे. कारण प्रत्येक वर्दीच्या वेळी अग्निशमन दलातील कर्मचा-यांच्या जिवाला धोका असतो. मी असे म्हणत नाही की ते प्रशिक्षित असतील तर दुर्घटना होऊ शकत नाही. दुर्घटनेशी त्यांचे नाते असते असे म्हणालात तरी चालेल. तरी अग्निशमन विभागातील कर्मचा-यांचा विमा काढला पाहिजे. त्यांचा विमा काढला तर निश्चितच त्यांना देखिल दिलासा मिळेल की, आपण आगीशी दोन हात करत असताना आपला देखिल महानगरपालिका विचार करते.

आताच महिला बालकल्याण समितीच्या सन्मा.सभापती श्रीमती छायाताई राव बोलल्या. सकाळी सन्मा.सदस्य श्री. राजेश ठाकूर बोलले की, साडे सात कोटीची बजेटमध्ये तरतूद करण्यांत आली होती

आणि अतिशय अल्प खर्च त्याच्यावर झालेला आहे. याबाबत मी सभागृहाला सांगू इच्छिते की, जे अधिकार सभापतींना हवेत तेवढे अधिकार सभापतींकडे नाहीत आणि या समितीच्या माध्यमातून ज्या योजना राबवायच्या आहेत त्या योजनांसाठी अतिशय जाचक अशा अटी-शर्तींमुळे आपण या योजना चांगल्याप्रकारे राबवू शकत नाही. तरी सुध्दा घरघंटी आणि शिलाई मशिन यासाठी ज्या जाचक अटी होत्या त्या आम्ही कमी करण्याचा प्रयत्न केला आणि त्याचमुळे कदाचित पहिल्यांदाच ७.५ कोटी रुपयांचे अनुदान यावर्षी वाटणार आहोत. पुढल्या वर्षीसाठी ८ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. त्याबद्दल मी आभारी आहे. परंतू मा.महापौर महोदयांना विनंती करेन की, ज्या आवश्यक जाचक अटी-शर्ती आहेत ज्यामुळे आपण या योजनांचा लाभ घेऊ शकत नाही. त्यामुळे अटी-शर्ती थोडया शितील करण्यांत याव्यात. जेणेकरुन जास्तीत जास्त रक्कमेचा लाभ आपण लाभार्थिंना देऊ शकू. आपल्याकडे अनेक चांगल्या योजना राबविल्या आहेत. मा.आयुक्त साहेबांनी विकासाची गंगा आपल्या ठाणे शहरात आणलेली आहे. त्यातल्या अनेक योजना आहेत उदा.सॅटीस प्रकल्प, भुयारी गटार योजना,एकात्मिक नाले योजना, अशा अनेक योजना आहेत प्रत्येक योजनेचे नांव घ्यायला नको. सुधारणा कार्यक्रमांत वर्षा सिंचयन,सांडपाण्याचा पुर्नवापर ही देखिल एक चांगली योजना आहे. जेणेकरुन औद्योगिक क्षेत्रांसाठी बाग-बगीच्यांसाठी आपण सांडपाण्याचा पुर्नवापर करु शकतो.

यानंतर आपल्याकडे शहरी गरींबांची अद्यावत सर्वकष माहिती संकलित करण्याकरीता पॉवर्टी मॅपिंग करणे याबाबत माझा आक्षेप आहे की, पॉवर्टी मॅपिंग होताना स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घेतले जात नाही. जर नगरसेवकांना विश्वासात घेतले तर १००% पॉवर्टी मॅपिंग करण्यास अधिकारी/कर्मचा-यांना मदत होईल अशी सूचना आहे. केलेल्या सूचना ऐकून त्या कार्यान्वित करणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, आपल्याकडे घनकच-याची समस्या फार मोठी आहे. आपल्या शहरात दररोज ६५० टन घनकचरा तयार होतो हा कचरा डंपिग करण्यासाठी आपल्याकडे डंपिंग ग्राऊंड नाही. डंपिंग ग्राऊंडची समस्या आणि अशा अनेक समस्या आहेत ज्या महत्वाच्या समस्या आहेत त्याच मी या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बाकीच्या समस्यांवर आमचे जेष्ठ नगरसेवक बोलतीलच.

आपण दत्तक वस्ती योजना सुरु केलेली आहे. तिथे घरोघरी जाऊन गचरा वर्गीकरण ओला कचरा-सुका कचरा या योजनेमार्फत घरोघरी जाऊन कचरा गोळा केला जाणार आहे. परंतू ही योजना आपण किती प्रभावीपणे साकार करु शकू हे मला माहिती नाही. कारण स्लम एरियामध्ये दहा रुपये दयायला सुध्दा महिला कुरबूर करतात. यामुळे जर दोन महिने त्या महिलांना पगार मिळाला नाहीतर ही योजना बंद पडू शकते. कारण गेल्यावेळी सुध्दा अशाप्रकारची योजना राबविण्यांत आली होती. परंतू स्लम एरियातील महिला दहा रुपये दयायला तयार नसतात. या योजनेत एक हजार रुपये महानगरपालिका देणार आहे. तरी दहा रुपये न घेता हीच रक्कम वाढवावी असे मला वाटते. कारण मागच्या वेळी ही योजना बंद पडली आहे याचा देखिल विचार व्हावा.

गांडूळ खत प्रकल्प-ओला कचरा-सुका कचरा. या प्रकल्पासाठी सुध्दा सोसायटयांना जास्तीत जास्त मदत करावी जेणेकरुन आपण घनकच-याची समस्या थोडया प्रमाणांत कमी करु शकू. माझ्या माहितीप्रमाणे सन्मा.जेष्ठ नगरसेवक श्री. विलासजी सामंत यांच्या प्रभागातील २० सोसायटयांनी ही योजना चालू देखिल केली आहे. तरी ज्या खाजगी सोसायटया आहेत तिथे ही योजना चालू करण्यांत यावी.

यानंतर चौक सुशोभिकरण हे हेड आपल्याकडे आहे. आमच्या भागातील मिनाताई ठाकरे चौक ज्या आमच्या मॉ साहेब आहेत. त्यांच्या नांवाने तो चौक आहे.गेले तीन वर्ष मी सातत्याने सांगत आहे की, हा चौक सुशोभित केला जावा.पण आतापर्यंत यात कोणीही लक्ष घातले नाही. मग चौक सुशोभिकरण हा निधी

तुम्ही कुठे वापरता? याची देखिल आम्हाला माहिती मिळत नाही. मा.महापौर महोदय, ही सूचना आहे आमचा मिनाताई ठाकरे चौक जो सेंट्रल चौक आहे तो सुशोभित करण्यांत यावा.

त्याचप्रमाणे मस्यालय बांधणे या हेडसाठी ८० लाखाची तरतूद करण्यांत आली आहे. पण मस्यालीय कुठे बांधणार आहेत, कधी बांधणार आहेत याची काहीही माहिती दिलेली नाही. तरी आम्हाला त्याची माहिती देण्यांत यावी. जेणेकरुन आम्हाला आमच्या सूचना देता येतील. आपल्या अर्थसंकल्पात वस्तू संग्राहालय, वाचनालय,संक्रमण शिबीर, महिला उद्योग केंद्र, वैद्यकिय महाविदयालयीन विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, बहुउद्देशीय हॉल, क्रीडासंकुल, मार्केट बांधणे,आरोग्य सेवा, उदयाने असे अनेक चांगले प्रकल्प आपण महानगरपालिकेच्या माध्यमातून राबविणार आहोत. मार्केट बांधणे हया हेडखाली गांवदेवी मार्केटसाठी एक कोटी वीस लाखाची तरतूद ठेवण्यांत आली आहे. पंरतू मा.महापौर महोदय, आपण जेंव्हा मार्केट बांधतो आणि ज्या लोकांना तिथे गाळे देतो त्या गाळयांचा त्यांना उपयोग होईल की नाही याचा विचार करणे महत्वाचे आहे. कारण आमच्या उथळसर प्रभाग समितीत मचछीमार्केट कोप-यांत बांधलेले आहे.उद्घाटन करुन आपण तिथल्या कोळणींना तिथे बसविले आहे. त्या मार्केटमध्ये एक महिना बसल्या आणि पुन्हा रस्त्यावर बसू लागल्या. मी त्यांच्यातील दोघी-तिघींना विचारले तुम्हाला एवढे चांगले मार्केट बांधून दिले आहे तुम्ही तिथे काबसत नाही. त्यावर त्यांचे साधे उत्तर होते एवढया आत मरायला कोणी येत नाही. आम्ही जी मच्छी एक दिवसांत संपवित होत्या त्याला आठ दिवस लागतात. त्यासाठी बर्फाचा खर्च इतर खर्च आणि त्यातून मच्छी खराब झालीतर ती आम्हाला फेकून दयावी लागते. आम्ही पहाटे सकाळी तीन वाजता उठतो, पोटीसाठी आम्ही जे मरतो त्यातून आम्हाला काहीच मिळत नाही उलट आम्हाला आमच्या पदरचे पैसे जातात. तेंव्हा मार्केट बांधणे हया हेडखाली जेंव्हा मार्केट बांधतो त्यावेळी त्या लोकांचा विचार होणे आवश्यक आहे. अन्यथा आमच्या उथळसर प्रभाग समितीत जसे मच्छीमार्केट वापराशिवाय पडून आहे. त्याचे चक्क गोडाऊन झाले आहे. अतिक्रमणवाले जे काही सामान पकडून आणतात ते तिथे आणून ठेवतात. तरी याचा देखिल विचार करणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, अर्थसंकल्पामध्ये आपण अनेक चांगले प्रस्ताव बघितले उदा. बालभवन, वर्कींग वूमन हॉस्टेल वगैरे. पण आपल्या ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून एक वृध्दाश्रम सुरु करण्यांत यावे अशी सूचना आहे. प्रभागात फिरतांना बरेच वृध्द नागरिक घरातील लोकांनी अपमानीत केल्यामुळे किंवा त्यांना व्यवस्थीत न सांभाळल्यामुळे आम्हाला विचारणा करतात की, कुठे वृध्दाश्रम असेल तर आम्हाला सांगा. आपण बरेच चांगले प्रकल्प राबवितो तरी आपल्या ठाण्यात एक वृध्दाश्रम असणे गरजेचे आहे आणि अतिशय महत्वाची बाब आहे त्या वृध्द लोकांचे आशिर्वाद आपल्या महानगरपालिकेला लाभतील तरी त्यांच्यासाठी निश्‍चित चांगल्या सुखसोईनी युक्त असे वृध्दाश्रम करु या असे मला वाटते.

यानंतर तलाव सुशोभिकरण आणि सौदर्यीकरण जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून आपण करायला घेतले आहे. मा.आयुक्त महोदय, आपण जी कागदपत्र दिलेली आहेत. परंतू या माध्यमातून स्टेट प्रायोरिटी लिस्टवर आपल्या ठाण्याचे नांव नाही. तरी याच्यासाठी आपण विशेष प्रयत्न करावेत. जेणेकरुन आपल्याला तो निधी उपलब्ध होईल आणि ११ तलावांचे संवर्धन करण्यास घेतले आहे निश्‍चितच त्या तलावांना फायदा मिळेल. माझ्या प्रभागातील आंबे घोसाळे तलावाचे संपूर्ण जॉगिंग ट्रॅक आणि रेटनिंग वॉलचे काम चालू झाले आहे परंतू तिथे प्रस्तावित कामे आहेत कारंजा आणि आकर्षित लाईटींग करणे या कामांसाठी मला ७५ लाख रुपये निधीची आवश्यकता आहे. मी माझ्या प्रभागापुरते बोलत नाही. जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून आपण प्रयत्न करत आहात. मा.आयुक्त महोदय, मला सभागृहाला सांगायला आवडेल की, मा.मुख्यमंत्र्याचे पी.ए. श्री. साळी साहेब ते माझे मतदार आहेत. त्यांना मी माझे पत्र दिले आहे.

यानंतर निर्मल स्वच्छता अभियानांअतर्गत शौचालय बांधणे. मला वाटते या विषयावर सगळेच बोलायला तयार असतात. जेंव्हा या योजनेबाबत माहिती आम्हाला रत्नाकर गायकवाड आलेले असताना त्यांनी आम्हाला सांगितली. तेंव्हा ती आम्हाला गोंडस बाळासारखी वाटली आणि नंतर योजना चालू झाल्यानंतर वास्तवतेचे चटके आम्हाला बसले आहेत. प्रथम टप्पा १९९० सिटचा म्हणजे ११३ ठिकाणी शौचालय बांधणे. आणि टप्पा क्र.२ अतर्गत ४६३० सिटस् २४८ ठिकाणी शौचालय बांधण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. आणि त्यांनी लिहीलेले आहे द्वितीय टप्प्यातील ४६३० सिटची कामे २०१० मार्चपर्यंत पूर्ण केली जातील पण दुर्दैव असे की आज दोन अडीच वर्ष झाली प्रथम टप्प्यातील कामे अपुरी आहेत. मला वाटते ही व्यथा माझीच नाही तर संपूर्ण सभागृहाची हीच व्यथा आहे. माझ्या भागातील एक शौचालय तयार झालेले आहे. तिथे आपण माणसी दहा रुपये जमा करुन ते काम बचत गटांना किंवा रजिस्टर संस्थाना देण्यात आलेले आहे. परंतू स्लम भागातील नागरिक दहा रुपये काढण्यास तयार नसतात. त्यांच्या मते आपण ज्याप्रमाणे दुस-या सुविधा देतो त्याप्रमाणे ही सुविधासुध्दा अशीच दिली पाहिजे कारण ही अत्यावश्यक बाब आहे. यामुळे कलेक्शन व्यवस्थित होत नाही. ज्या महिला संस्थांनी हे काम घेतलेले आहे त्या जो माणूस ठेवतात. तो माणूस दिवसभर रहायला तयार नाही कारण त्याला त्या पुरेसा पगार देऊ शकत नाहीत. जो माणूस असतो त्याचे म्हणने असे आहे की, दिवसभर जर दहा टॉयलेटमध्ये गेलोतर आम्हाला जो पगार मिळतो तो एका टॉयलेटमध्ये बसून मिळत नाही. तरी हा देखिल विचार होणे आवश्यक आहे. तो माणूस नसल्यामुळे पाणी टाकीमध्ये चढण्यासाठी जे वॉटर पंप लावले आहेत ते कोणीही येऊन ऑपरेट केल्याने ते पंप बिघडलेले आहेत आणि माणसी जेवढे पैसे जमा करत असाल त्याच्या दुप्पटी तिप्पटीने पंप रिपेअरींग करण्याचा खर्च आहे. तरी मला वाटते की, आपण जेएनएनयूआरएमतर्फे जे बांधलेले आहेत ते महापालिकेने स्वतः चालविण्यासाठी काहीतरी पावले उचलली पाहिजेत. कारण बचत गटांना यातील काहीच मिळत नाही त्या कोणतरी माणूस ठेवतात. त्या निमित्त मात्र असतात. ही योजना कुठेतरी बारगळलेली आहे. तरी याबाबत आपण लक्ष दयावे. त्याचप्रमाणे केंद्रावर विद्युत निर्मिती करणे हा महत्वाचा प्रकल्प आपण हाती घेतलेला आहे. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे विज निर्मितीमुळे जो कार्बन क्रेडीट घेता येईल असे क्रेडीट घेणारी ठाणे महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका असणार आहे याचा निश्चितच आम्हाला अभिमान आहे की, आम्ही ठाणे महानगरपालिकेच्या सभागृहात बसतो आणि प्रत्येक गोष्टीत जेंव्हा पेपरमध्ये येते की, अशाप्रकारचा प्रकल्प राबविणारी ठाणे महानगरपालिका ही पहिलीच महापालिका आहे हे निश्चितच प्रशासनाचे किंवा नगरसेवकांचे क्रेडीट असेल की, त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे किंवा अधिका-यांच्या मेहनतीमुळे हे होते.एवढे ऐकून आपली कॉलर टाईट झाली आपण गप्प बसतो असे न होता. कुठलीही त्रृटी न ठेवता हे प्रकल्प चांगल्याप्रकारे कार्यान्वित करणे हे प्रशासनचे आणि सर्व लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे असे मी समजते. तरी या सूचनेचा देखिल आपण विचार करावा.

क्रीडा संकूल आणि मिनी स्टेडीयम विकसित करण्याचा आपला मानस आहे. परंतू मी असे बघितले आहे की, आंतर राष्ट्रीय दर्जाचे जे क्रिकेट आहे त्याला जेवढे प्राधान्य दिले जाते तेवढे प्राधान्य आमच्या मातीतले खेळ कबड्डी-खे-खो हे आमच्या महाराष्ट्रातील खेळ आहेत. त्यांना डावलले जाते. जर आपण क्रीडा संकूल आणि मिनी स्टेडीयम महानगरपालिका करत असेल तर खो-खो आणि कबड्डीच्या खेळाडूंचा दर्जा वाढविण्यासाठी एक स्वतंत्र हेड ठवणे गरजेचे आहे. कारण हे खेळ आमच्या महाराष्ट्राच्या मातीतील खेळ आहेत आणि त्यांनाही दर्जा मिळाला पाहिजे असे मला वाटते.

यानंतर बागांच्या निगा आणि देखभाल याबाबत मा.सभापती श्री. पाटणकर साहेबांच्या मनोगतात लिहीलेले आहे की, वाढीव निधी एक कोटी पंन्नास लाखाचा बगीचा देखभालीसाठी मिळावा. माझा विरोध

नाही पण हा बगीचा निधी असतो आता या ठिकाणी उपस्थित असलेल्या नगरसेवकांपैकी एकाने तरी सांगावे की, त्यांच्याकडील बगीच्यासाठी  हा निधी कधी वापरला आहे का? असेल तर सांगावे . कारण ही वस्तुस्थिती आहे माझ्या प्रभागात प्रबोधनकार  उदयान आहे. आमचे दादा महापौर असताना त्यांनी ते गार्डन अतिशय सुंदर केले होते. त्या गार्डनचे उद्घाटन मुख्यमंत्राच्या हस्ते झाले होते.परंतू देखभाल व निगा नसल्यामुळे पाच वर्षांनी परत जैसे थे परिस्थिती झाली. माझे पती बोर्डावर आले त्यांनी परत त्या गोर्डनचे नुतनीकरण केले. परत पाच वर्षानी देखभाल निधी नसल्याने म्हणजे वंश परंपरेने ही कामे चाललेली आहेत आणि स्वतंत्र हेड मात्र असतो, बगीचा निधी, देखभाल निधी मग हा निधी जातो कुठे? त्यामुळे हा वाढीव निधी मागितल्यामुळे आपण स्वतः लक्ष घालाल अशी मी आशा करते. त्याचप्रमाणे तुमच्या प्रभागातील वृंदावन गार्डनसाठी माळी नेमणूक करावा यासाठी प्रस्तावाची सूचना दिली होती आणि त्यावेळी मी आक्षेप घेतला होता की, वृंदावन येथील गार्डन खाजगी गार्डन  आहे. खाजगी गार्डनला अशाप्रकारे माळी देता कामा नये. वृंदावन जेष्ठ नागरिक संघटनेने स्वतः मागणी केली होती ही संस्था अतिशय चांगल्याप्रकारे काम करते. अशाप्रकारे जे गार्डन आहे त्याची साफ-सफाईचे काम आम्हाला देण्यात यावे. याबाबत त्यांनी एक पत्र मा.आयुक्तांना दिले होते, एक पत्र मला दिले होते आणि त्याच्यावर मी ही सूचना केली होती त्याबाबतही अजून कुठलाच विचार झाला नाही. तरी आपण आपल्या मनोगतात सांगितले आहे की, अशी कामे बचत गटांना आणि सामाजिक संस्थांना देण्यांत यावी तरी इथे कुठेतरी अशाप्रकारच्या संस्थेचा विचार  केला जावा आणि मला वाटते आता तो विचार होईल. कारण हे मनोगत आपण स्वतःच मांडलेले आहे. आपण ही सूचना ऐकाल असे मला वाटते त्यामुळे मी आगोदरच आपले आभार मानते.  त्याचप्रमाणे ऋतूपार्क जवळील मॉलमधील .सदनिका ज्या आपल्याला उपलब्ध झालेल्या आहेत. मा.आयुक्त महोदय, माझ्याकडील स्थानिक सावली जेष्ठ नागरिक संघटना आणि ऋतूपार्क जेष्ठ नागरिक संघटना यांनी अशी मागणी केली आहे की, वाजवी दरात आम्हाला जेष्ठ नागरिकांच्या कामकाजासाठी हे गाळे उपलबध करुन दयावेत आणि अशाप्रकारचे पत्र मी मा.आयुक्तांना दिलेले आहे. तरी वाजवी दरात त्यांना ते गाळे उपलब्ध करुन देण्यात यावेत अशी मी आपणास विनंती करते. मला वाटते महत्वाच्या सर्वच मुद्दयांवर मी बोलले आहे. राहिले आहेत परिवहन समिती आणि शिक्षणमंडळ. या विषयावर  न बोलणेच उत्तम. तरी सुध्दा ज्या २०० बसेस नवीन येणार आहेत. आमच्या साध्या सुचना असतात पण कुठल्याही सुचनेवर कोणीही विचार करताना दिसत नाही. प्रत्येक नविन सभापती आला की, आम्ही आमच्या कामांच्या सुचनेचे पत्र घेऊन त्यांच्याकडे जातो. पण काम आता होईल नंतर होईल तोपर्यंत सभापतींची टर्म संपलेली असते. ऋतुपार्क ते स्टेशन अशी बस सेवा गेल्या बोर्डामध्ये माझ्या पतीनी सुरु केली होती. त्यावेळी  त्या बसच्या फे-या अतिशय चांगल्याप्रकारची होती. आता तिथे देवश्री गार्डन आणि इतर अनेक संकुले झाली आहेत. लोकवस्ती वाढलेली आहे. लोकवस्तीच्या मानाने आपण हया फे-या वाढविल्या पाहिजे. पण इथे मात्र उलटी गंगा वाहतेय. होत्या त्या फे-या सुध्दा कमी केलेल्या आहेत. ऋतूपार्क ते स्टेशन असे जर रुट असेल तर ती बस येऊन ऋतूपार्क येथे  थांबली पाहिजे. परंतू तिथे न थांबता वृंदावनला थांबते आणि निघून जातो लोकांना कळतही नाही. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी एक बस थांबा उभारण्यांत यावा अशी मी मागणी केली होती. त्याचा देखिल काही पत्ता नाही. मागे वृंदावन येथील नागरिकांचा उद्रेक झाला होता. मा.सभापती, श्री.मिलींद पाटणकर हे उपस्थित होते. मा.श्री.सुधाकरजी चव्हाण हे सुध्दा तिथे आले होते. त्यावेळी त्या लोकांनी सांगितले की, बराच वेळ बस स्टॉपवर एखादी बस येत नाही त्यावेळी सफोकेशनमुळे जेष्ठ नागरिकांना त्रास होतो. त्यामुळे तिथे एखादा फॅन लावण्यात यावा जेणेकरुन आम्हाला त्रास होणार नाही. त्याचप्रमाणे  महिलांची तक्रार असते की, बसच्या पाय-या उंच आहेत आणि पायाच्या दुखण्यामुळे आम्हाला

त्या पाय-यांवर पटकन चढता येत नाही. या अतिशय साध्या सोप्या सूचना घेऊन जर आम्ही परिवहन सभापतींकडे गेलोतर आणि त्या दूर होत नसतील त्यामुळेच या सभागृहात उदासिनता दिसून येते ती याच गोष्टीमुळे होते असे मला वाटते. आपले शिक्षणमंडळ परिवहनचाच भाऊ कामाबद्दल अनास्थाच दिसून येते. आता त्या मुलीचा सत्कार केला तशा हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या चांगल्या गोष्टी सोडल्यातर आपले कितीतर नगरसेवक शाळेला सुरक्षारक्षक मिळावा म्हणून मागणी करतात किंवा शाळेच्या टॉयलेटची साफ-सफाई करणे, मुलांच्या आरोग्याशी निगडीत अतिशय महत्वाच्या बाबींबाबत वारंवार बोलून सुध्दा त्या मागण्या पुर्ण होत नाहीत त्याचप्रमाणे सन्मा.सदस्य श्री.सुरेश कांबळे यांनी काल सूचना केली की, महापालिकेचे एक महाविद्यालय असावे. त्यांच्या या सूचनेला मी अनुमोदन देत आहे. आम्हालाही वाटते आपले स्वतःचे महाविद्यालय असावे. मा.आयुक्त महोदय, मी कोल्हपुरला गेले होते. कोल्हापुरला यशवंतराव चव्हाण कॉलेज आहे आणि ते कोल्हापुर महानगरपालिकेचे आहे आणि त्थिल्या शिक्षण पध्दतीमुळे अतिशय चांगल्याप्रकारे चालू आहे. त्यांच्याकडील कार्यक्रमाची मी चिफ गेस्ट होते त्यामुळे मी ते कॉलेज संपूर्ण फिरुन बघितले, त्यांची कामकाज पध्दती बघितली ती अतिशय चांगल्याप्रकारची होती. त्यामुळे आपण सुध्दा अशाप्रकारचे महाविद्यालय चालवू शकतो. परंतू आता शाळांची अनास्था बघितली तर कुठेतरी उदासिनता वाटते की, आपण असे महाविद्यालय चालू केले आणि शाळांप्रमाणे त्याचीही दुरावस्था झालीतर काय करावे? मा.महापौर महोदय, आता जास्त काही बोलत नाही. पण आपण म्हणतो की, कँसर किंवा एखादा दुर्धर रोग असतो त्याला एखादया चांगल्या जुन्या जाणत्या स्पेशॅलिस्टची गरज असते. त्याला एम.बी.एस.डॉक्टर किंवा फिजिशीयन काही करु शकत नाही. त्याचप्रमाणे परिवहन आणि शिक्षणमंडळाच्या ज्या काही समस्या आहेत. त्याबाबत या सभागृहातील जेष्ठ सदस्य आहेत तेच चांगल्याप्रकारे त्यांची चीरफाड करु शकतील असे मला वाटते. कारण आम्ही त्यांच्या पेक्षा वयानेही खूप लहान आहोत आणि अनुभवानेही खूप लहान आहोत. तेच या विषयावर सविस्तर बोलतील अशी मी अशा करते आणि मला बोलायला संधी दिल्या बद्दल धन्यवाद... जयहिंद जयमहाराष्ट्र ..

**सौ.फातिमा मुल्ला :-**

मा.महापौर महोदया, जुन्या इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी संरचना लेखापरिक्षण व तपासणी हे लेखाशिर्ष ठेवले आहे. माझ्या प्रभागात सन १९८४ पूर्वीच्या जुन्या इमारती आहेत. या इमारतींच्या पुनबांधणीसाठी आपले अधिकारी जास्त एफ.एस.आय. मिळवून देण्यासाठी प्रशासनाची कशी दिशाभूल करतात ते मी तुम्हाला सांगते. सिटी सर्व्हे नं.२००७ साईनाथनगर,कोपरी ठाणे पूर्व या जागेवर प्लॅन मंजूर आराखढा असताना कोणत्या शासकिय नियमानुसार तिथे एस.असा.डी. योजना मंजूर करण्यांत आली आहे. हे मी यापूर्वीही आपल्या लक्षात आणून दिले होते. समाज विकास विभागाने सदर जागेबाबत दि.७/१०/२००८

रोजी सर्व्हेक्षण केले आणि त्या इमारतींबाबत शहर विकास विभागाकडे दि.१३/१०/२००८ रोजी अभिप्राय मागितला.त्याबाबत शहर विकास विभागाने काय अहवाल दिला आहे? व कोणत्या नियमानुसार एल.ओ.आय. मंजूर करण्यांत आला. सदर जागेवर प्लॅन मंजूर असताना अडीच एफ.एस.आय. मिळविण्याकरीता खोटे दस्तऐवज देऊन योजना राबविण्यात येत आहे. मा.आयुक्त महोदय, अशा बिल्डींगला अडीच एफ.उस.आय. देत असाल तर ठाण्यातील किंवा महाराष्ट्रातील सर्वच जुन्या इमारतींना अडीच एफ.एस.आय. आपण दयाल का? अडीच एफ.एस.आय.साठी प्रशासनातर्फे मा.आयुक्त साहेबांची दिशाभूल केली जात आहे. जर आपण अडीच एफ.एस.आय. देऊ शकत असाल तर माझ्या प्रभागात अशा खूप जुन्या इमारती आहेत. आम्हालाही ती संधी उपलब्ध करुन दयावी. आपण जर अडीच

एफ.एस.आय.देऊ शकत नसालतर सिटी सर्व्हे नं.२००७ साईनाथनगर ,कोपरी, ठाणे या जागेवरील झोपडपट्टी पुनवसन योजना रद्द करावी व नियमानुसार ३३/७ यानुसार या बांधकामाला मंजूरी दयावी. साईनाथनगरची इमारत सन १९९४ सालची आहे. अशा इमारतीला झोपडपट्टीमध्ये समाविष्ठ करता येते का? कुठल्या नियमानुसार समाविष्ठ केले आहे? तो नियम आम्हाला सुध्दा सांगा जेणेकरुन आमच्या प्रभागामध्ये तो नियम आम्हाला वापरता येईल व आमच्या नागरिकांचाही फायदा होईल. माझ्या प्रभागातील प्रत्येक इमारत जुनी असून मोडकळीस आलेली आहे. माझ्या प्रभागात चाळी सुध्दा आहेत आणि झोपडया सुध्दा आहेत.अशाप्रकारे इमारती,चाळी आणि झोपडया अशी मिक्स घरे आहेत. या भागाला सुध्दा झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत मंजूरी आणि बी.एस.यु.पी. योजना या ठिकाणी राबविण्यांत यावी.शिवाजीनगर आणि कोळीवाडा हा संपूर्ण भाग साईनाथनगर सारखाच आहे या ठिकाणीही आम्हाला झोपडपट्टी पुर्नवसन योजनेची सोय उपलब्ध करुन दयावी. ज्याअर्थी साईनाथनगरला ही योजना राबवू शकता तर प्रत्येक ठिकाणी ती योजना तुम्ही राबवू शकता. शासकिय नियमांच्या विरुध्द जाऊन ज्या भ्रष्टाचारी अधिका-यांनी प्लॉट नं. २००७ साईनाथनगर या ठिकाणी झापेडपट्टी पुर्नवसन योजनेला मंजूरी दिली आहे त्या सर्व अधिका-यांची चौकशी करुन त्यांना निलंबित करावे.जुन्या इमारती कोसळून दुर्घटना होत आहेत. त्यात काही इमारतींना ग्रामपंचायतीने मंजूरी दिलेली आहे. माझ्या राबोडी प्रभागामध्ये खाडी एरिया आहे आणि तिथे कुळ लागू आहे म्हणून या जागेवर तुम्ही प्लॅन मंजूर करु शकत नाही असे असताना तेथील लोकांनी काय करायचे? या ठिकाणी अनधिकृत बांधकामाला तुम्ही प्रोत्साहन देत आहात. हया जुन्या इमारती पडल्यातर तर त्या लोकांसाठी आपण काय करणार आहात? त्यांना तुम्ही पर्यायी जागा देऊ शकत नाही. त्यांना हया इमारती पुर्नबांधणीसाठी अधिकृत करुन देऊ शकता का? तर नाही करु शकत. ही एक गंभीर बाब आहे. अनधिकृत बांधकाम करण्यास आपलेच अधिकारी जबाबदार आहेत. स्थानिक नगरसेवक आणि नागरिक जाबाबदार नाहीत. अनधिकृत बांधकामाबाबत वारंवार तक्रार करुन .देखिल आपले अधिकारी पेपर वर्कमध्ये भरपूर टाईमपास करुन अनधिकृत बांधकाम करणा-यांना भरपूर वेळ देतात. जेणेकरुन त्याचे काम पूर्ण होते आणि तो ते प्लॅट किंवा घरे विकून मोकळा होतो आणि लोक तिथे रहायला सुध्दा जातात. त्यानंतर आपल्या अधिका-यांना कारण मिळते आता तिथे लोक रहायला गेली आहेत.माणुसकीच्या नात्याने आम्ही त्यांच्यावर कारवाई करु शकत नाही.आणि जेंव्हा हीच इमारत पडायला येते तेंव्हा पंचाईत आम्हा नगरसेवकांची होते. आम्ही त्यांना कसल्याही प्रकारची मदत देऊ शकत नाही. म्हणजे अनधिकृत बांधकामासाठी आपले अधिकारी जाबबदार आहेत. अनधिकृत बांधकामाबाबत गेल्या दोन वर्षात मी अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत. परंतू एकाही अनधिकृत बांधकामावर आतापर्यंत कोणीही कारवाई केली आहे का? कारवाई न करण्याचे प्रत्येक अधिका-याकडे काहीतरी कारण असते. उदा. मी आताच बदली होऊन आलो आहे, काही सांगतात मी आता वैद्यकिय रजेवर आहे. अनधिकृत बांधकामाबाबत तक्रार केली तर अधिकारी रजेवर जातात. अन्यथा त्यांच्या घरी कोणीतरी मयत झालेले असते अशी अनेक कारणे असतात.

गटारांवर नाल्यांवर लोकांनी बाथरुम-टॉयलेट बांधकाम केलेले आहे. आरोग्य विभागाचे आधिकारी हे आमच्या लक्षात आणून देतात की, इथे अशाप्रकारचे अनधिकृत बांधकाम झाल्यामुळे आम्ही हे गटार किंवा नाला साफ करु शकत नाही. या बांधकामांची तक्रार जेंव्हा आम्ही अतिक्रमण विभागास करतो त्यावेळी त्यांचे अजिबात सहकार्य मिळत नाही. मा.आयुक्त महोदय, एका पेक्षा एक चांगले प्रकल्प आपण ठाणे शहरासाठी आणून पूर्ण केले आहेत. पाहून असे वाटते की, आपण अमेरिकेला आला आहोत. तरी सुध्दा ज्या ठिकाणी मध्यमवर्गीय अतिशय गरीब लोक राहतात त्या वस्तींसाठी आपल्या अर्थसंकल्पामध्ये काय तरतूद

केली आहे. टॅक्स तर सगळेच भरतात. आणि सोईसुविधा फक्त उच्च वर्गीयांसाठी मोठ-मोठया वसाहतींमध्ये घोडबंदर भागात राहणा-या लोकांसाठी आहेत. हया गरीब लोकांसाठी काय सुविधा आहेत. उदया जर एखादी इमारत पडली किवा साफ-सफाई न झाल्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरून पावसाळयात पूर परिस्थिती निर्माण झाली तर त्यास आपले अधिकारी जबाबदार असतील कारण त्यांनी वेळेवर योग्य ती पावले उचलली नाहीत. आपल्याकडे महिला नगरसेवकांचे कोण ऐकतो. अधिका-यांकडून महिला नगरसेवकांना अतिशय वाईट वागणूक मिळते. कधी सांगितले जाते मॅडम तुम्हाला काय समजते.तुमची दोन वर्ष काढा आणि गप्प बसा.म्हणजे महिला नगरसेवक सक्षम नाहीत का? प्रत्येक विभागात असेच ऐकायला मिळते. मला वाटते सगळया महिला नगरसेविकांची हीच तक्रार आहे.

सिव्हरेज ट्रीटमेंट प्रोजक्टस् :- मी स्वतः ठाणे महापालिकेची एक्स् कर्मचारी असून सिव्हरेज ट्रिटमेंटबद्दल मी आठ वर्ष अभ्यास केला आहे. कोटयावधी रुपये आपण सिव्हरेज ट्रिटमेंटसाठी वर्षानुवर्षे खर्च करत आहोत. त्याचा आजपर्यंत काय फायदा झाला आहे? आता आपण सिव्हरेज ट्रिटमेंट प्रोजेक्टमध्ये वीज निर्मितीचा प्रकल्प आणतोय ही खूप चांगली गोष्ट आहे. पण प्रॅक्टीकल आहे का त्याचा कोणी विचार केला आहे का? आता आपल्याला जो सिव्हरेज सिव्हेरज ट्रिटमेंट प्लॅटला मिळतोय त्याचे कॉन्सिंट्रेशन किती आहे? त्या कॉन्सिंट्रेशन अनुसार आपण तिथे मिथेन गॅसची निर्मिती सुध्दा करु शकत नाही. जो काही गॅस असतो तो असाच वाया जातो. एवढी उपलब्धा नाही की तो गॅस आपण गॅस सिलेंडरमध्ये भरुन विकू शकतो. असे असताना त्यामधनू आपण वीज निर्मिती कशी काय करु शकणार याचा कोणी विचार केला आहे का? आपले काही पंपिंग स्टेशन कितीतरी वर्षापासून बंद आहेत त्याच्याकडे कोणी लक्ष दिले आहे का? पपिंग स्टेशन नाहीत म्हणून सिव्हेरज डायरेक्ट नाल्यांमध्ये आणि खाडीमध्ये सोडले जाते. त्यावर काहीच प्रक्रिया केली जात नाही. मग पर्यावरण वाचविण्यासाठी आणि ट्रिटमेंट करण्यासाठी आपण जे पैसे खर्च करतो ते कशासाठी? एवढे पैसे खर्च करुन आपल्या वातावरणामध्ये काही फरक पडतोय का? खरतर हा फरक होताना कोणी पाहिले आहे का? आमच्या प्रभागामध्ये ड्रेनेज सिस्टीम नाही तिथे ड्रेनेजची सोय कधी करुन मिळणार हे विचारल्यावर अधिकारी सांगतात तिथे पंपिंग स्टेशन नाही त्यामुळे आम्ही तिकडे ही सोय देऊ शकत नाही. तिथे अतिशय गरीब लोक राहतात म्हणून तुम्ही तिथे ती सोय देऊ शकत नाही? परंतू ज्या ठिकाणी पंपिंग स्टेशन असून ते बंद आहेत म्हणून सिव्हरेज खाडीमध्ये सोडले जाते. त्यामुळे काही फरक पडत नाही का? गरीबांना सोयी देण्यासाठी तुमच्याकडे १० कारणे असतात. मा.आयुक्त महोदय, पर्यावरण चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी आपण कोटयावधी रुपये खर्च करतोय. परंतू एवढा खर्च करुन पर्यावरणावर काही फरक पडला आहे का? हे प्रोजेक्टस् आपण शहराच्या फायदयासाठी करत आहोत की फक्त टक्केवारी कमविण्यासाठी अधिका-यांची लोकांना फसवणूक आहे.

मा.महापौर महोदय, यांनतर मी टॅक्स बाबत बोलेन.प्रत्येक कुटुंबाचा टॅक्स मग तो प्रॉपर्टी टॅक्स असो किंवा पाणीपट्टी असो. ती वैयक्तीक करुन दिलीत तर ही वसूली चांगल्याप्रकारे होईल. लोक टॅक्स भंरायला तयार आहेत. त्यांना त्यांचा टॅक्स क्लीअर पाहिजे. तरी वारंवार महासभेमध्ये याबाबत चर्चा करुन सुध्दा वैयक्तीक बिले देण्याची कार्यवाही अंमलात आणलेली नाही अजूनही आपण एकत्रित विले पाठवतोय. जे इमानदारीने टॅक्स भरणारे आहेत त्यांच्यावर आपण अन्याय करतो. जे वेळेवर बीले भरत नाहीत त्यांचा दंड आपण त्यांच्या डोक्यावर ठेवतो. असे केल्यास त्यांना टॅक्स भरण्यामध्ये इंट्रेस राहिल का? नेहमी टॅक्स वेळेवर भरणारी लोक टॅक्सही भरतात आणि दंडही भरतात. मग तुमची कशी वसूली होणार? मा.महापौर महोदय, झोपडपट्टी भागात टॅक्स लावण्यासाठी आपल्या अधिका-यांना खूप त्रास होतोय. माझ्या प्रभागात एवढी मोठी झोपडपट्टी आहे. पण त्यांना टॅक्स लावण्यासाठी मी गेले वर्षभर प्रयत्न करतेय पण आतापर्यंत

आपल्या अधिका-यांनी ते लक्षात घेतलेले नाही. त्यामुळे आपल्या महापालिकेचे फार मोठे नुकसान होत आहे. ती झोपडपट्टी मोठी आहे आणि एवढया लवकर तिथून हलणार नाही. त्यांच्याकडून टॅक्स वसूली करण्यासाठी तुम्हाला काय अडचण आहे? टॅक्स न लागल्यामुळे त्यांना अधिकृतपणे पाणी सुध्दा मिळू शकत नाही. मा.महापौर महोदय, पाणी तर सर्वांचीच गरज आहे. ते पाणी कुठून आणणार? तलावातून घेणार का? त्यामुळे अनधिकृत नळ जोडणी होत असते. मग त्यांच्यावर कारवाई करा. कारवाई फक्त गरीब लोकांवरच करायची असते. ज्या सोसायटी पाणी चोरी करतात पाणी वाया घालवतात त्यांच्यावर काहीच कारवाई होत नाही. गरीबांच्या बसाहतीत तुम्ही काहीच सुविधा दयायला तयार नाहीत. टॅक्स लावून दयायला तयार नाहीत, पाण्याचे अधिकृत कनेक्शन दयायला तयार नाहीत. परंतू त्यांच्यावर कारवाई करायला पहिला नंबर असतो. मा.महापौर महोदय, टॅक्स विभागाचे क्लार्क कुठल्याही इमारतीला किंवा चाळीला टॅक्स लावण्यासाठी जातात तेव्हा त्यांच्या मागण्या कधी बघितल्या आहेत का? एका घराचे मोजमाप घेण्यासाठी पंधरा हजार रुपये घेतात. दोन-दोन वर्ष एखादया स्ट्रक्चरला टॅक्स लागत नाही. आपल्य कर्मचा-यांना पगार मिळत नाही का? टॅक्स खात्यातील भ्रष्टाचार कधी बंद होणार आहे? जेणेकरुन सर्वसामान्य माणसाला टॅक्स भरणे ओझे वाटणार नाही. माझ्या प्रभागासारख्या प्रभागामध्ये जिथे ७०% झोपडपट्टी आहे. तिथे रस्ते नाहीत, महापालिकेची ड्रेनेज सिस्टीम नाही, कुठलेही मोठे प्रकल्प आपण तिथे राबवू शकत नाही. तिथे फक्त गटारांचे नेटवर्क आहे. नगरसेवक निधी, प्रभाग सुधारणा निधी व मागासवर्गीय निधी हे मिळून सुध्दा वर्षभरात आम्ही ही गटारे व्यवस्थित करु शकत नाही. अशा प्रभागांसाठी आपण अर्थसंकल्पामध्ये काय तरतूद ठेवली आहे?राबोडी प्रभागाच्या आजुबाजूला नव निवन सोसायटया झाल्या आहेत. रुस्तुंजी सारखी सोसायटी आली आहे. त्या लोकांनी खाडीत भरणी करुन त्याची लेव्हल एवढी उंच केली आहे की, आता राबोडीची लेव्हल खाली गेली आहे. त्यामुळे तिथे दरवर्षी नियमित पूर परिस्थितीला सामोरे जावे लागते. त्यामुळे तेथील लोकांची कितीतरी नुकसान होते. दोन मेन नाले संपूर्ण ठाण्याचे पाणी राबोडी जवळच्या खाडीत खाली होतात. अशा राबोडीसाठी एकही प्रकल्प नाही. तिथे पूर परिस्थिती होऊन लोकाचे नुकसान होऊ नये यासाठी आपल्या अर्थसंकल्पामध्ये काय उपाययोजना केली आहे.? टॅक्स वसूली तर प्रत्येक भागातून केली जाते. मग सोयी-सुविधा फक्त उच्चभ्रू विभागातच का? मा.महापौर राबोडी भागात मध्यमवर्गीय गरीब आणि अतिशय गरीब लोक राहतात हया लोकांचा सुध्दा विचार करायला पाहिजे.

मा.महापौर महोदय, महिला व बालकल्याण समितीमार्फत विधवा आणि इतर महिलांसाठी ज्या योजना आपण राबवितो. त्या योजनांसाठी आपल्याला निरनिराळया कागदपत्रांची गरज भासते. विधवा आणि जेष्ठ महिला भगिनी झोपडपट्टी भागात राहतात. त्याच्याकडे कसलेही कागदपत्र उपलब्ध नाहीत. त्यांच्याकडे जन्माचा दाखला नाही, लिव्हींग सर्टीफिकेट नाही, शिक्षणाचा काहीच पुरावा नाही. त्याच्याकडे यापैकी एकही पुरावा नसतो. ती महिला विधवा असते पण त्याकाळी मॅरेज सर्टीफिकेट नव्हते. त्यामंळे नाव बदलल्याचा पुरावा नसतो. या लोकांना योजनेचा लाभ घेता यावा म्हणून आम्ही ही कागदपत्र आणायची कुठून? कागदपत्र नसल्यामुळे आम्ही त्यांना त्या सोयी देऊ शकत नाही. आम्हाला माहिती असते ती विधवा आहे परंतू आम्ही तिला कागदपत्र कुठून आणून दयायची? मा.महापौर महोदय, यासाठी काहीतरी पर्यायी उपाय असायला पाहिजे. जात पडताळणीसाठी जाताना एखादया व्यक्तीकडे काहीच नसेल तर तिकडे पंचनामा केला जातो. गावातील पाच लोकांचे ॲफिडेव्हीड घेतात. त्या पंचानाम्यानुसार त्यांना ती सोय दिली जाते. त्याप्रमाणे आपण हया विधवांना सोयी का देऊ शकत नाही. नगरसेवकांच्या शिफारस पत्राने केले तरी सुध्दा चालू शकते किंवा पंचनामा करुन त्यांना ती सोय उपलब्ध करुन दया. सध्या आपण २०/- किंवा

५०/- रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर प्रतयेक योजनेसाठी स्वतंत्र त्यांचे ॲफिडेव्हीड घेतो. पण २०/- आणि ५०/- रुपयांचे स्टॅम्पपेपर सध्या उपलब्ध नसल्याने ५००/- रुपयाच्या स्किम साठी त्यांना १००/- रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर टायपिंग वगैरे करुन जाण्या-येण्याचा खर्च धरुन ३०० रुपये खर्च करावे लागतात.तसेच आपल्या समाज विकास विभागातील अधिकारी त्यांना कुठलेच काम लगेच करुन देत नाहीत. त्यांच्याकडे लाभार्थिंना दहा फे-या माराव्या लागतात. मग तुम्ही हया योजना का राबवता? फे-या मारुन महिला कंटाळून जातात आणि योजनेचा लाभ घेण्यासाठी येतच नाहीत. आपण आता साडयाचे वाटप करणार आहोत त्याऐवजी माध्यमिक शाळांतील मुलांना युनिफॉर्म दया ते गरजेचे आहे. फक्त ३०-३० साडया वाटप करायला देऊन आम्हाला लोकांच्या शिव्या का ऐकायला लावता? त्याचप्रमाणे महिलांसाठी वेगवेगळे कोर्स देत असतो आणि हे जे कोर्स आपण देतो त्यासाठी शिक्षणाची ,वयाची अट कशाला ठेवली आहे? जर एखादी महिला पंन्नास वर्षाची असेल तिला सांभाळायला नवरा नसेल मुलगा नसेल आणि जर तिला शिवणकाम शिकायचे असेल,ब्युटीपार्लरचा कोर्स करायचा असेल तर आणि त्याचा जर वयाची अट असेल तर तिला तुम्ही या सोय दिली? तुम्ही तिला कशी मदत करणार? तिला जर काहीतरी शिकून पायावर उभी राहण्याची इच्छा आहे तर आपण तिच्यासाठी काय सोय केली? मा.महापौर महोदय, हा मुद्दा मी वारंवार महिला बालकल्याण समिती सदस्य असताना आणि मा.महासभेत वेळोवेळी मांडलेला आहे. परंतू शिक्षणाची आणि वयाची अट अजूनपर्यात सुधारली गेली नाही. महिलांसाठी स्वयंरोजगार कसा उपलब्ध होऊ शकेल यासाठी महिलांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्यांच्या स्केल डेव्हलमेंटसाठी आपण काही कोर्सेस आणायला पाहिजेत. गेल्या तीन वर्षात उथळसर प्रभाग समितीमध्ये बचत गटांना काही प्रशिक्षण देण्यासाठी मला तरी आमंत्रण मिळालेले नाही किंवा असो प्रोग्राम झाल्याचे मी ऐकलेले नाही. मग महिला बचत गटांना प्रशिक्षण देण्यासाठी जो निधी शिल्लक ठेवतो तो निधी जातो कुठे? एखदा कोपरी प्रभाग समितीमध्ये मी एक ट्रेनिंग प्रोग्राम पाहिला होता. बाकीच्या प्रभागामध्ये होतोय का? उभळसर प्रभाग समितीमध्ये आतापर्यंत कधी झाल्याचे आठवत नाही. यानंतर शिक्षण मंडळ शिक्षणासाठी आपण मोठया प्रमाणावर खर्च करतो. फक्त अभ्यास करुन मुल पुढे जाऊ शकत नाही. मुलांमध्ये उपजत काही कला असतात. त्यांच्यामध्ये उपजतच एखादा गुण असतो तो बाहेर काढणे गरजेचे आहे जेणेकरुन त्यांना पुढे जाऊन त्यांच्या भविष्यामध्ये पुढे काय करायचे आहे याचा निर्णय घेणे आता सोपे जाईल आणि त्यांच्याकडे जो गुण आहे त्याचा विकास आताच होऊ शकेल. खेळ,ड्रॉईंग,आर्टस्,हस्तकला,नाटक यासारख्या स्कील्स त्यांच्यामध्ये डेव्हलप करण्यासाठी आपण त्यांना तशाप्रकारचे ट्रेनिंग दयायला पाहिजे. त्यासाठी आपण स्पेशल शिक्षक नेमले पाहिजेत. आणि फक्त या कार्यक्रमांसाठी खर्च करतो. पण त्यांच्या स्किल्स डेव्हलमेंटसाठी आपण आतापर्यात काहीही केलेले नाही. मा.महापौर महोदय, आपल्या ठाणे महापालिकेच्या शाळेतील मुले अतिशय हुशार आहेत. माझ्या माहितीप्रमाणे जर त्यांना थोडीशी ट्रेनिंग मिळाली तर ते अजून. पुढे जाऊ शकतात. इटरमिजेट एलिमेंटरी एक्झाम सारखे

कोर्सेस ठाणे महापालिका शाळांमध्ये सुरु केले पाहिजेत. जेणोकरुन पुढे त्यांना कर्मशियल आर्टस् ,फाईन आर्टस् आर्किटेक्चर या फिल्डमध्ये जण्याची संधी मिळेल. शाळेनंतर ते हया परिक्षा देऊ शकत नाही. त्याचप्रमाणे आजच्या काळात मुलांना खेळालाही प्राध्यान्य दिले पाहिजे.आपल्या शाळेतील मुले वेगवेगळया खेळांमधून पुढे गेली पाहिजेत. त्यासाठी त्यांना स्पेशल शिक्षण दिले पाहिजे. आपल्याकडे दादोजी कोडदेव स्टेडीयम सारखे मोठे स्टेडीयम आहे. आपल्या मुलांना तिथे आपण स्पेशल ट्रेनिंग दिले पाहिजे. मुलांचा कल पाहून त्यांना त्या त्या खेळासाठी आपण प्रोत्साहित त्यांना त्याचे ट्रेनिंग दिले गेले पाहिजे. महापालिका शाळांतील शिक्षकांबाबत मी वारंवार सागत असते. आपच्या राबोडी शाळेत जेवढे शिक्षक आहेत ते सगळे

राबोडीमध्येच निवास करतात. त्यामुळे त्यांचे लक्ष शाळेपेक्षा घराकडेच जास्त असते आणि वर्गावर कमी लक्ष असते.यामुळे मुलांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे ज्या ठिकाणी शिक्षक राहतात तिथून थोडया दूरवरच्या शाळेत त्यांची नेमणूक करावी. जेणेकरुन मुलांच्या शिक्षणावर त्यांचे जास्त लक्ष राहिल. तसेच शाळांमध्ये सुध्दा बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी सुरु करावी. जेणे करुन शिक्षक शाळेमध्ये त्यांचे जे तास ठरलेले आहेत त्या तासात शिकवतील. इकडे-तिकडे जाऊन टाईमपास करणार नाहीत. आपण पुरविलेले सुरक्षा रक्षक शाळांमध्ये फक्त बसण्यासाठी असतात का? शाळा सुटल्यावर देण्यात आलेले सुरक्षा रक्षक एका ठिकाणीच बसलेले असतात. त्यामुळे शाळेला सुरक्षा रक्षक पुरविल्याचा हेतू सिध्द होत नाही. ज्यावेळी आपण सुरक्षा रक्षक शळेसाठी पाठवितो त्यांची तिकडे काय जबाबदारी असणार आहे ते त्यांना सांगून मग त्या ठिकाणी पाठवावे. शाळांमध्ये आपण संगणक शिक्षणासाठी संगणक उपलब्ध करुन दिले आहेत. किती शाळांमध्ये हे संगणक चालू स्थितीत आहेत. मागे मी शाळांमध्ये राऊंड घेतला त्यावेळी लक्षात आले की, संगणक निगा व देखभालीसाठी वार्षिक ठेका दिलेला नाही म्हणून सगळेच्यासगळे संगणक बंद पडलेले आहेत. एखादया शिक्षकाला जर संगणक ऑपरेट करता येत असेलतर किंवा थोडया फार प्रमाणांत हार्डवेअरचे ज्ञान असेल तर एखादा संगणक तो चालवतो. मात्र बाकीचे सगळे बंद पडलेले आहेत. आपल्या शाळांमध्ये दिलेले संगणक फक्त देखाव्यासाठी आहेत का? तरी त्याकडे लक्ष देण्यात यावे. मा.महापौर महोदय, सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शिक्षकांना लिखाणाचे काम खूप जास्त वाटले आहे. प्रत्येक पत्र त्यांना हाताने लिहून दयावे लागते. त्यामुळे त्यांचे मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष राहत नाही. लिखाण कामात त्यांचा जास्त वेळ जातो. तरी जो काही डेटा त्यांना वारंवार दयावा लागतो. त्याचा संगणकावर नमूना तयार करुन दयावा जेणेकरुन त्यांचा वेळ वाचेल आणि मुलांच्या शिक्षणाकडे ते लक्ष देऊ शकतील. आपल्या शाळांतील मुलांसाठी जो नाष्टा येतो त्याच्या क्वॉलिटीवर आणि काँटीटीवर लक्ष देणे गरजेचे आहे. ठाणे महापालिका शाळांमध्ये गरीब लोकांचीच मुले शिक्षण घेतात. शाळेत जर पाचशे मुल असतील तर फक्त दोनशे मुलांचाच नाष्टा येतो. उरलेली ३०० मुल काय तोंड बघणार का? मा.महापौर महोदय, अधिका-यांनी जे मार्गदर्शन केले त्याप्रमाणे दुसरी राबोडी या ठिकाणीच्या शाळेत शाळा क्रमांक ११,१४ आणि ३७ हया तिन्ही शाळा आम्ही चालवितो. या शाळेच्या दुरुस्तीबाबत मी वारंवार मा.आयुक्त साहेबांबरोबर चर्चा केली आहे आणि गेले एक वर्ष ही फाईल मंजूर करुन घेण्यासाठी मी धावपळ करत आहे. अधिका-यांनी दिलेल्या सल्यानुसार मी करता आले आहे. माझा हेतू हाच होता की, उन्हाळी सुट्टीमध्ये हया रिपेअरींगचे काम चालू व्हावे आणि शाळा सुरु होण्यापूर्वी पूर्ण व्हावे जेणेकरुन या दुरुस्तीचा मुलांच्या शिक्षणावर परिणाम होणार नाही. तरी सुध्दा माझी फाईल अजूनही पेंडीग आहे.आणि या सुट्टीमध्ये दुरुस्तीचे काम सुरु होईल असे लक्षण दिसत नाही. कृपया हया सुट्टीमध्ये हे काम करण्यांत यावे याकडे मा.आयुक्त साहेबांनी लक्ष देऊन तातडीने माझी ही फाईल मंजूर करुन दयावी हि विनंती.

त्यानंतर आपण पुलांसाठी सुध्दा हेड ठेवला आहे. तरी सरस्वती शाळेजवळील जो नाला आहे त्यावरील पुलाचे रुंदीकरण होणे खूप गरजेचे आहे. कारण सरस्वती शाळेमुळे तिथे ट्रॅफिक फार वाढलेले आहे आणि या पुलाची परिस्थिती अतिशय धोकादायक आहे. अंधार असताना कुठलीही गाडी नाल्यात पडण्याची शक्यता आहे.

फायलेरिया विभागासाठी आपण भरपूर खर्च करतो. विभागासाठी जंतूनाशके खरेदी करतो. लाखो रुपये यासाठी खर्च करतो. तरी सुध्दा वेळोवेळी औषध फवारणी होत नाही. धूर फवारणी जी कधी-कधी केली जाते त्याच्यात ९०% धूर असतो आणि फक्त १०% औषध असते.त्यामुळे डास मरत नाहीत. एखादया खोलीत धूर फवारणी करुन घेतली तर डास तसेच्या तसे असतील. मग ही औषधे जातात कुठे?

आपल्या ठाणे महापालिका मुख्यालयाच्या मेन गेटवर जे सुक्षा रक्षक आहेत. ते फक्त गेटवर बघत असतात. मगे पार्किंगमध्ये काय चालले आहे याकडे त्यांचे कधी लक्षच नसते. कोणीही मनाला वाटेल तशी कुठेही गाडी पार्क करुन जातात. ते इतर कोणालाही अडवत नाहीत मात्र नगरसेवकांना अडवतात. मॅडम इथे गाडी लावू नका. इतके स्मार्ट आपले सुरक्षारक्षक आहेत. जर आपल्या पार्किंग भागात एखादया गाडीत काहीही ठेवून उभी करुन गेलतर आणि एखादी दुंघटना झालीतर ही जबाबदारी कोणाची?

आता इर्न्फमेशन टेक्नॉलॉजीबाबत- ई गर्व्हनन्ससाठी आपण इर्न्फमेशन कीऑस मॉडेल ठेवले आहे. असा एक कीऑस मॉडेल मी उथळसर प्रभाग समितीत बघितला आहे. आमच्या प्रभाग समितीतील इतर सदस्यांनी सुध्दा बघितला असेल. न वापरता त्याची दशा अतिशय खराब झाली आहे. जर सर्व सामान्य नागरिकांनी त्याचा वापर सुरु केल्यास त्याची काय परिस्थित होईल ते किती दिवस चालू राहिल. अशा वस्तू आपल्या महापालिकेसाठी खरेदी करतांना त्याची क्वॉलिटी तपासून घ्यावी. नव-नविन वस्तू उपलब्ध करुन देणे हे काळाची गरज आहे. परंतू प्रत्यक्ष वापरण्यासाठी उपलब्ध करुन देताना, त्या सिस्टीमची क्वॉलिटी अतिशय उत्तम असणे गरजेचे आहे. जेणेकरुन ही सुविधा लोकांना जास्त काळ वापरता येईल.. ही उपकरणे फक्त शो-पीस म्हणून ठाणे महापालिकेच्या कार्यालयात दिसणार नाहीत असे आम्हाला आश्वासन दया. उदाहरण दयायचे झाले तर आपल्या मुख्यालयात नागरी सुविधा केंद्रात स्कीऑस ठेवलेले आहेत. मी नगरसेवक म्हणून आल्यापासून मला हे कीऑस नेहमी बंदच दिसले. कुणाला ते चालू दिसले आहेत का? असतील तर सांगा.

यानंतर मोकट कुत्र्यांबाबत- मा.महापौर महोदय, मोकाट कुत्र्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आपण लाखो रुपये खर्च करतो तरी सुध्दा प्रत्येक गल्ली आपल्याला कुत्र्याची पिल्ले दिसतातच. मग हया अशा शस्त्रक्रिया कोणावर आणि कधी करतात? एखाद वेळेस तक्रार केली तर प्रभागात डॉग व्हॅन दिसते. व्हॅन कुत्रे प्रभागात सोडताना मात्र नेहमी दिसते. मुंबई महापालिकेची डॉन व्हॅन सुध्दा ठाण्यात कुत्रे सोडताना दिसते. असे असताना अशा गाडयांवर बंदी आणण्यासाठी आपण काय प्रयत्न केले आहेत? बाहेरचे कुत्रे ठाण्यात आणून सोडतात त्यांच्यावर आपण आतापर्यंत काय कारवाई केली आहे.

यानंतर अग्निमशन विभाग- एखादया मोठया गृहसंकुलामध्ये आग लागून दुंघटना झाली तर मोठा आवाज होतो. परंतू आमच्या राबोडी सारख्या भागात रस्ते नाहीत गल्ल्या आहेत. तिथे फक्त रिक्षा जाण्यासारखे रस्ते आहेत. अशा प्रभागामध्ये जर एखादी दुंघटना झाली तर आपला अग्निशमन दल कशी मदत करु शकेल. अशाप्रकारच्या गल्ल्यांमध्ये जाण्यासाठी आपल्या अग्निशमन दलाकडी गाडी आहे का?

घनकचरा व्यवस्थापन विभाग- गटारातील गाळ काढून रस्त्याच्याकडेला ठेवण्यासाठी जागा नाही व लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून ते बरोबरही नाही. हा गाळ लगेच टेंम्पोमध्ये भरुन घेऊन जाणे आवश्यक आहे. तरी असा गाळ लगेच उचलून नेण्यासाठी आम्हाला वाहन उपलब्ध करुन देण्यात यावे. रस्ता झाडण्यासाठी व कचरा गोळा करण्यासाठी उपकरणे व मनुष्यबळ यासाठी योग्य व्यवस्था असणे गरजेचे आहे.

यानंतर मिसिंग लिंक्स- साकेत ते वृंदावन आणि पंचगंगा ते वृंदावन हया रस्त्यामध्ये कुठेतरी लिंक्स पाहिजे जेणेकरुन आपल्याला ट्रॅफिक वगळता येईल.राबोडीचे रस्ते खूप अरुंद आहेत. साकेत, कळवा व सरस्वतीकडून श्रीरंग सोसायटीकडे जाणारी जी ट्रॅफिक असते त्यामुळे राबोडी प्रभागामध्ये खूप वाहतूक कोंडी होत असते. म्हणून हे मिसिंग लिंक्स पूर्ण करणे गरजेचे आहे. जेणेकरुन वाहतुक कोंडी होणार नाही. पूर्वीच्या काळी रस्ते करताना गाढव सोडून दयायचे गाढव ज्या मार्गाने गेला त्या मार्गाने रस्ते करायचे आजही अपण त्याच मार्गाने चालत आहोत आणि रस्ते व्यवस्थित करत आहोत. पण थोडे डोके लावून

एखादा शॉर्टकट रस्ता होऊ शकतो किंवा हा रस्ता सरळही होऊ शकतो अिकंवा एखादा नविन मार्ग सुध्दा आपण काढू शकतो असा विचार न करता आपण जे आधीचे रस्ते आहेत तेच वापरतो. आपण एवढे चांगले अभियंता नेमले आहेत त्यांच्या डोक्याचा वापर करुन थोडी सुधारणा आणायला पाहिजे.

यानंतर निर्मल अभियांन- निर्मल अभियान हा अतिशय सुंदर विषय आहे. या विषयावर सगळयांना बोलावेसे वाटते. गेली दोन वर्ष माझ्या प्रभागामध्ये एकच काम चालू आहे. फक्त दोन स्लॅब पडलेले आहेत. फक्त ढाचा आहे विटांचे काम झालेले नाही. गेले दोन वर्ष हा ठेकेदार तिथे काय काम करतोय तेच समजत नाही. लोकांची अत्यावश्यक गरज असतानां ही गरीब लोक कुठे जाणार? ठेकेदार काम करत नाही असे असून सुध्दा आपले अधिकारी त्याच्यावर काहीच ॲक्शन घेत नाही. आम्हाला नविन ठेकेदार देत नाही. हया निर्मल अभियानाच काय चालले आहे? गरिबांसाठी हे काम पूर्ण करुन देणार की, नाही? निर्मल अभियानाचा ढाचा असाच शो-पीस म्हणून राहणार?

पाणी गळतीबाबत आपल्या अधिका-यांना वारंवार सांगून सुध्दा आतापर्यंत तीच परिस्थिती आहे. आपण पाणी नाही म्हणून नेहमी ओरडत असतो. परंतू जिथे पाणी वाहून चालले आहे तिकडे आपले अधिकारी काहीच ॲक्शन घेत नाहीत. उथळसर प्रभाग समितीत सोसायटी खूप कमी आहेत. जिथे स्टोअरेज कॅपॅसिटी आहे. या प्रभागामध्ये जास्त करुन चाळी आणि झोपडपट्टी आहे. हया लोकांकडे स्टोअरेज कॅपॅसिटी नसते आणि ते दिवसांच पाणी भरतात आणि आपण रात्री दिड वाजता पाणी सोडतो. सोसायटीच्या टाक्या भरुन पाणी रस्त्यावर वाहता असते. सोसायटीवाले पाणी भारुन टाकी वाहत असते तरी लक्ष देत नाहीत. झोपडपट्टी आणि चाळीमध्ये राहणारे लोक रात्री दिड वाजता उठून पाणी भरु शकत नाही. म्हणजे गरीब लोकांना पाणी मिळत नाही आणि मोठ मोठया सोसायटयांमध्ये पाणी वाहून जाते. याबाबत वेळेमध्ये काहीतरी बदल करावा असे वारंवार
आपल्या अधिका-यांना सागितले आहे. रात्री तीन वाजता टाकी भरली म्हणून सोसायटीवाले उठून त्यांचा नळ बंद करणार नाहीत आणि त्यांनी अशी कोणतीही सोय केलेली नाही जेणेकरुन पाणी भरुन वाहण्याचे थांबेल. अशा परिस्थितीत पाणी वाचविणे हे गरजेचे आहे की नाही? आपले अधिकारी याबाबत कधी कारवाई करणार ? हा पाण्याचा अपव्यय कधी बंद होणार आहे?

आपल्या अधिकारी आणि कर्मचा-यांना सेल्फ डिफेंन्ससाठी आपण काही कोर्सेस देणार आहोत. हे कोर्सेस सेल्फ डिफेन्स विभाग कलेक्टर ऑफिस मध्ये फ्री ऑफ चार्जेस उपलब्ध आहेत आणि कोर्स अटेंड करणा-या लोकांना ते पैसे सुध्दा देतात. मग ही सोय आपण त्यांच्याकडून का उपलब्ध करुन घेत नाही.? आपण स्वतः यावर खर्च का करायचा? त्यांची सुध्दा ट्रेनिंग उत्तम आहे. तरी ही सोय आपण त्यांच्याकडून घ्यावी. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते. धन्यवाद..

**सौ.परिषा सरनाईक :-**

मा.महापौर महोदय, या सभागृहात मी दुस-यांदा बोलत आहे. यापूर्वी मी ज्या दिवशी सभागृहात तुमचा पहिला दिवस होता त्या दिवशी बोलले होते. आणि बजेट बाबत बोलायचे. आज माझ्या नगसवेक कारर्किदीला एक वर्ष पूर्ण झाले आणि सुदैवाने मला बजेटवर बोलायला संधी मिळली आहे. या एका वर्षामध्ये माझा अभ्यास कमी नाही परंतू अनुभव नक्कीच कमी आहे. तरी या बजेटबाबत थोडसं बोलते.

ठाणे महापालिकेचे सन २००९-१० चे बजेट म्हणजे विकासाचे गोडगुलाबी स्वप्न आहे. पण हे स्वप्न साकार करण्यासाठी आम्ही लोकप्रतिनिधी तसेच पालिकेतील अधिकारी आणि कर्मचारी वर्ग सर्वांनी मिळून हे पूर्ण करायला पाहिजे. तसेच कार्यशील अधिकारी-कर्मचारी आणि त्यांची कामाबाबतची तळमळ हया तीन गोष्टी साध्य झाल्यातर हे साकार होण्यास वेळ लागणार नाही. ठाणे शहरातील शिवसेना-भाजपा

युतीचे म्हणजे सत्ताधारी पक्ष आणि मा.आयुक्त श्री. नंदकुमार जंत्रेसरख्या कर्तव्यदक्ष अधिका-यांनी साथ लाभल्यामुळे शेकडो कोटी रुपयांची विकास कामे सुरु झाली आहेत. यात जवाहरलाल नेहरु योजने अंतर्गत मिळणारे अनुदान आणि कर्जाचा रक्कमेचा मोठा वाटा आहे. पण विकास कामे करताना पाऊल टाकणा-या शहराला राज्याला किंवा देशाला कर्जाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे आपण कर्जबाजारी झालो म्हणून काही बिघडले नाही. घेतलेली कर्ज फेडण्याची ताकद नक्कीच महापालिकेत आहे. मात्र हे कर्ज योग्य कारणासाठी घेतले जाते, काटेकोर आर्थिक व्यवस्थापन करुन त्याची योग्य वेळी परतफेड होत आहे का हे पाहणे आवश्यक आहे. महापालिकेच्या बजेटमध्ये अनेक विकास कामे प्रस्तावित करण्यांत आली आहेत. त्याचबरोबर काही अभिनव योजनांसाठी तरतूदी आहेत. ठाणे शहरात आज पार्किंग समस्येने उग्र रुप धारण केले आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असल्यामुळे खाजगी वाहनांची संख्या वाढतेय. पर्यायी पार्किंगला जागा उरलेली नाही. यावर उपाय म्हणून महापालिकेने भुयारी पार्किंग योजना प्रस्तावित केली आहे. पालिकेने हे काम प्राधान्याने हाती घेण्याची आवश्यकता आहे आणि B.O.T. तत्वावर हा प्रकल्प होण्यास बराच वाव असल्याने पालिकेला आर्थिक भार होणार नाही अशी अपेक्षा आहे. शहरातील रस्त्यांवर पे अँण्ड पार्क किंवा महिला बालकल्याण समितीबाबत बोलायचे झाले तर महिला बालकल्याण समितीचे जे बचत गट असतात ते आर्थिक दृष्टया कमी असलेल्या महिलांचेच बचत गट असतात. म्हणजे नक्कीच त्यात शिकलेली महिला वगैरे नसेल. तरी मला वाटते आता महापालिकेने बचत गटांना प्रशिक्षण चालू केले आहे. त्याचप्रमाणे महापालिकेच्या प्रत्येक कामासाठी माझ्या माहितीप्रमाणे मी सुध्दा याबाबत निवेदन दिले आहे. पे-अॅण्ड पार्क म्हणा किंवा खिचडीचे असो जसे बचत गटांना तुम्ही प्रशिक्षण चालू गेले आहे. तसेच ज्या महिला बचत गटाला तुम्ही काम देता त्या कामाच्या प्रशिक्षणची सुध्दा गरज आहे. कारण जर पे अॅण्ड पार्कचे बघितले तर आदीवासी मागासवर्गीय महिलांसाठी आहे. पे अॅण्ड पार्कचे काम आदीवासी मागासवर्गीय महिला व्यवस्थित करु शकणार नाहीत. माझ्या माहितीप्रमाणे ठाणे महापालिकेने पहिलांदाच प्रशिक्षण योजना चालू केली आहे. त्यामुळे महिला बचत गटांना आपण जी कामे देतो त्याचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे असे मला वाटते.

त्याचप्रमाणे ठाण्यात तारांगण बांधण्यासाठी पालिकेने या बजेटमध्ये तरतूद ठेवली आहे. आज मुंबईतील नेहरु तारांगण वगळता परिक्षार्थी मुलांची विज्ञानाबाबतची जिज्ञासा भागेल असे एकही केंद्र नाही. ठाण्यासारख्या मध्यवर्ती ठिकाणी असे तारांगण झाल्यास हजारो विदयार्थी आणि पालकांची गैरसोय दूर होणार आहे शिवाय ठाण्याच्या शिरावरही मानाचा तुरा रोवलाजाणार आहे आणि हे काम तातडीने मार्गी लावण्याची आवश्यकता आहे.

ठाण्यात असणा-या सुंदर खाडी किना-याचा वापर करुन वाघबीळ ते गायमुख परिसरात शेलो वॉटरपार्क पिकनिक स्पॉटची उभारणी करुन आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ विकासित करण्याची महापालिकेची ही योजना अतिशय चांगली आहे. परंतू हा प्रकल्प अत्यंत महत्वाकांक्षी असून त्यासाठी योग्य त्या नियोजनाची गरज आहे. त्याचप्रमाणे शिवाईनगर, बाळकूम, कौसा, बेतवडे आणि पडली येथे मिनी स्टेडीयम बांधण्याचा

पालिकेचा प्रस्ताव आहे. माझ्या प्रभागात स्लॅम एरिया ३०% टक्के आहे. रस्त्याचे कॉक्रीटीकरण चालू आहे. मुल रस्त्यावरच क्रिकेट खेळतात त्याचा बॉल एखादया महिलेला किंवा सिनीयर सिटीझनला लागतो. एखादया गाडीची काच फुटते. एखाद वेळेस ती मुल गाडीच्या मध्ये येतात. तरी महापालिकेने मिनी स्टेडीयम बांधले पाहिजे. मागच्या बजेटमध्ये तशी तरतूद होते पण ती पूर्ण झालेली नाही. तरी शहरात

असलेल्या मोकळया मैदानाची वाणवा लक्षात घेता, लहान मुलांची मोठया प्रमाणावर कुचंबना होते. त्यामुळे मिनी स्टेडीयम उभारण्याच्या प्रकल्प तातडीने हाती घेणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे कौसा येथे २८ कोटी रुपये खर्च करुन महापालिका अतिशय सुंदर अत्याधुनिक क्रीडा संकुल बांधणार आहे. ही योजना खरोखर उत्तम आहे. पण माझे पती श्री. प्रताप सरनाईक हया सभागृहाचे सदस्य होते तेंव्हा त्यांनी वारंवार सिंथेटीक ट्रॅकची मागणी केली होती पण ती अंमलात आली नाही. कु.ऋचा पाटकर नावाच्या मुलींनी आता सिंथेटीक ट्रॅकची मागणी आता माझ्याकडे केली आहे. ऑलंपिकसाठी खेळणारी मुलगी सिंथेटक ट्रॅक उपलब्ध नसल्यामुळे मागे पडली. मला असे वाटते की, घोडबंदर रोड,पोखरण,वागळेइस्टेट या भागातील खेळाडूंना सरावासाठी कौसा येथे जाणे अवघड आहे. ठाणे शहरातील ॲथलेटिक्स गेल्या अनेक वर्षापासून सिंथेटीक ट्रॅकची मागणी करत आहेत. आता हा ट्रॅक कौसा येथे बांधला जाणार आहे. मात्र ठाण्यातील खेळाडूंना तिथे जाणे अवघड असल्याने शहरातील मध्यवर्ती भागातही असा ट्रॅक असणे आवश्यक आहे.

मा.महापौर महोदय, पाण्याबाबत बोलायचे झाले तर परवाच टीपटॉप प्लॉझामध्ये पाणी वाचवा पाणी जिरवा हा अतिशय चांगला कार्यक्रम झाला. त्यावेळी सौ. मनिषा प्रधान मॅडमनी कुपनलिका आणि विहीरीबाबत खूप चांगली माहिती दिली. मा.आयुक्त साहेबांनी सुध्दा अतिशय चांगले मार्गदर्शन केले. पण मला असे लक्षात आणून दयायचे आहे की, मुंबईतील पाणी पुरवठा करणा-या सर्वच जलवाहिन्या हया ठाणे शहर व पालिका हद्दीतून जातात. मुंबई महापालिका, ठाणे महापालिका वेगवेगळया दराने पाणी पुरवठा करते. ठाणे जिल्हयातून जिथून जलवाहिन्या गेल्या आहेत त्याबद्दल ठाणे जिल्हा परिषद मुंबई महापालिकेकडून रॉयलिटी घेते का? त्याचप्रमाणे ठाणे महापालिकेला रॉयलिटी घेण्याचा अधिकार आहे का? आणि जर असेल तर मला वाटते आपल्या उत्पन्नात नक्कीच भर पडेल. तसेच मा.आयुक्तांनी सांगितले होते की, आपण मीटर्स लावणार आहोत. जर ते मीटर्स लवकरांत लवकर बसविण्यांत आले तर पाण्याची बचत होऊन पाण्याची जी कमतरता आहे ती लवकर दूर होईल. या खेरीज ग्रथालय, दवाखाने,व्यायामशाळा, नाना-नानी पार्क असे प्रकल्प पालिकेने बजेटमध्ये प्रस्तावित केले आहेत. शिवाय एमएमआरडीएच्या माध्यमातून विकास कामे होणार आहेत. त्याचा या बजेटमध्ये समावेश नाही.ठाणे शहरात एकाच वेळी शेकडो कोटीची विकास कामे सुरु होणार आहेत. एकाएकी शहर ट्रॅझिशनमधून जात आहे. अशावेळी दक्ष राहून योग्य नियोजनाचे काम केले नाहीतर विद्रुप होण्याची भिती आहे. ही भीती खोटी ठरवायची असेल आणि शहराला स्वप्नातील रुप दयायचे असेल तर पालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी व जागृत नागरिक या तिन्ही घटकांनी लक्ष राहणे आवश्यक आहे आणि सर्वांनी त्यासाठी प्रतिक्षा करण्याची आवश्यकता आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद..

**सौ. मनिषा साळवी :-**

सन्मा.महापौर महोदय, मा. उप महापौर, मा.आयुक्त साहेब, मी लोकप्रतिनिधीत्व करीत असलेल्या प्रभाग क्रमांक ९५ मधील विविध कामांची यादी खालीलप्रमाणे सादर करीत असून ती पूर्ण करण्याबाबत आपल्याकडून योग्य ते आदेश व्हावेत ही विनंती.

१) न्यू शिवाजीनगर तलाव येथे पादचारी पूल होण्याची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी शाळेत जे-जा करणा-या मुलांची आणि पालकांनी भरपूर वर्दळ असते. त्या ठिकाणी कारशेड गाडयांचे प्रमाणे खूप असते. त्यामुळे मुलांना शाळेत जाण्यास उशिर होतो. कारशेडला गाडी १० ते १५ मिनीटांपेक्षा जास्त वेळ उभी असते.

२) युवराज मेडीकल ते जुना शंकर मंदिर रस्ता तसेच जुना शंकर मंदिर रस्ता ते दत्तमंदिर पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे.

३) स्टेशन रोड ते मुकूंद कंपनीपर्यंत रस्ता करण्यांत यावा.याबाबत आम्हाला नेहमी सांगण्यांत येते की ती जागा मफतलाल कंपनीची आहे. मफतलाल कंपनीची जागा आहे म्हणून त्या ठिकाणी नगरसेवकांनी काम करु नये का?

४) कळवा रेल्वेस्टेशन मागे ६५ मीटर रोड आहे. सदर रोड कच्च्या स्वरुपात आहे त्याचे डांबरीकरण करण्यात यावे.

याचप्रमाणे मी गेल्या वर्षीही माझ्या प्रभागातील कामांची यादी दिली होती. परंतू अद्यापही त्या कामांची पूर्तता झालेली नाही. तरी कृपया ती कामेही होण्याच्या दृष्टीने आदेश व्हावेत.

मा.महापौर महोदय, शौचालयाच्या बाबतीत बोलायचे झालेतर एक विशेष सभा जेंव्हा लावली जाते तेंव्हा त्या अधिका-याला समजत नाही की विशेष सभेचा काय अर्थ असतो.मा.आयुक्त साहेब, कळवा प्रभाग समितीतील सर्व नगरसेवकांच्या सहीने आम्ही यापूर्वी पत्र तुम्हाला दिले होते त्यानुसार त्या अधिका-यावर कारवाई व्हावी एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद जय हिंद जय महाराष्ट्र..

**सौ. सुनिता सावंत :-**

मा.महापौर महोदय, मा.आयुक्त साहेब, सन २००९-२०१० याबाबत बोलायचे झाले तर जमा-खर्च आणि रचना याबाबत बोलायचे आहे. मा.महापौर महोदय,आतापर्यंत दोन-तीन वर्षात अर्थसंकल्पाबाबत संबंधित नगरसेवकांनी सुचना किंवा बदल सांगितले त्याबाबत आजपर्यंत अंमलबजावणी झाली आहे की, नाही? हे मला समजलेले नाही. कारण ज्या ज्या योजना आम्ही सांगितल्या त्यातील कोणत्याही योजना अजून अंमलात आल्या नाहीत. तरी मा.महापौर महोदय व मा.आयुक्त महोदय,ठाणे महापालिकेला उत्पन्न देण्यारी खिडकी म्हणजे जकात आहे. जकात नाक्यांवरील आपल्या अधिकारी व कर्मचारी यांना वसूलीचा इष्टांक दिलेला असतो. त्यानुसार अधिकारी-कर्मचारी व दक्षता समिती इष्टांक पूर्ण करतो किंवा थोडासा इष्टांक कमी देत असतात. आपल्या जकात विभागात दक्षता समिती आहे. त्या दक्षता समितीच्या अधिकारी आणि कर्मचा-याच्या पगारपूर्तीवर आणि दक्षता समितीला दिलेल्या गाडयांच्या पेट्रोल व डिझेलवर सन २००९-२०१० जो खर्च झाला आहे. त्याच्या दहा पट उत्पन्न दक्षता समिती देते का? मा.आयुक्त साहेबांनी आजपर्यंत याबाबत किती वेळा आढावा घेतला आहे. या अर्थसंकल्पात जकात उत्पन्नाची बाजू बघता दिलेल्या इष्टांकापैकी काही कोटी रुपये उत्पन्न कमी झाले आहे ही गंभीर बाब आहे. त्यासाठी कडक शिस्तीचे अधिकारी प्रशासनाने नियुक्त केले पाहिजेत. तसेच जकात नाक्यांवर समांतर डिपार्टमेंट चालू असते असे समजते. जर आपल्याला उत्पन्न वाढवायचे असेल तर माझ्या मते सी.सी..टीव्ही लावले पाहिजेत व फरक पडलाकी नाही याबाबत आपल्याला आढावा घेता येईल. तसेच हल्ली लोका गाडया बाहेरुन आणतात. नंबर इथला घेतात त्यामुळे आपले उत्पन्न घटत असते. जकात खात्यांमधून यापूर्वी ज्यांची बदली केली होती. त्यांना परत जकात खात्यामध्ये घेतले आहे. याला काय कारण आहे उत्पन्न वाढविले की कमी केले? या उद्देशाने त्यांना परत त्या खात्यामध्ये घेतले आहे का? मा.आयुक्त महोदय, याबाबत आपण जास्त चौकशी करुन सी.सी.टीव्ही लावले तर उत्पन्न जास्त होईल.

तसेच मा.महापौर महोदय, पाणी हा विषय जीवनाशी निगडीत आहे. मी अनुभवलेली गोष्ट सांगते. तशाप्रकारची गोष्ट आता सन्मा.सदस्या महेश्वरी तरे यांनी सांगितली आहे. साकेत पंपिंग हाऊसला काही पाण्याचे टँकर अनधिकृतपणे भरतात असे मला पुष्कळ वेळा समजल्यानंतर मी एक दिवस माझ्या

कार्यकर्त्यांना तिथे पाहण्यास पाठविले. तिथे पावती न देता टँकर भरले जात होते.तिथे आपला अधिकारी किंवा वॉचमन उपस्थित नव्हता.  तिथे फक्त एक कर्मचारी होता तो पावती न देता पाणी भरुन देत होते आणि ते टँकर कॉंट्रॅक्ट पध्दतीचे होते. एकही पावती न घेता ते टँकर कसे बाहेर जात होते? मला निरोप आल्यानंतर मी दुस-या दिवशी सकाळी १० वाजता तिथे गेले.दुपारी दोनपर्यंत थांबले होते एकूण १२ टँकर विना पावतीने माझ्या समोर भरले गेले. मी विचारणा केली असता, मला सांगण्यांत आले की, उधारीवर टँकर भरले जात आहेत. नगरपालिकेला उदया भरले जातील. अशी पध्दत आपल्याकडे आहे का? असे होत असल्याची कल्पना आपले जबाबदार नवाजलेले अधिकारी मी आता त्यांचे नांव फोडत इच्छित नाही. त्यांना मी कल्पना दिली त्यांनी सांगितले जे घडले ते जाऊ दया तो आताच्या आता पैसे भरले. जर मी त्या ठिकाणी पाहणी करण्यास गेले नसतेतर ते पैसे भरले गेले नसते. मग अशाप्रकारे पंपिंग हाऊसवर किती टँकर भरले जात असतील. मी टँकरवाल्याचे नांव सागू शकते त्याचे नांव रॉकी ट्रान्सपोर्ट नांवाने तो पैसे भरतो. आपल्या अधिका-याचे नांव सांगू शकत नाही अशा करते त्याच्यात सुधारणा होईल. असे आपले दोन अधिकारी आहेत माझी त्यांच्या बरोबर दोन-तीन वेळा मिटींगी झाल्या. मी त्यांना सांगितले होते तिथे मीटर बसवा. म्हणजे टँकरमध्ये किती पाणी भरले जाते याचा संध्याकाळी आपल्या हिशोब मिळेल. आठ दिवसांनतर मी चौकशी केली तेंव्हाही तिथे मिटर बसलेले नव्हते. अधिका-यांना विचारले तेंव्हा त्यांनी सांगितले की, मीटर तिथे बसविले आहेत. तुम्ही दुर्लक्ष करा. अशी उत्तर त्यांनी मला दिले आहेत आणि अशा अधिका-याचे नांव जर मी सभागृहात सांगितले तर त्या अधिका-यांना भारी पडेल. मा.महापौर महोदय, पाणी गळतीपेक्षा ही गळती किती आहे? आपल्या पंपिंग वरुन दररोज ५० टँकर हे अशाप्रकारे भरले जात असतील. एका टँकरची किती किंमत आहे मला माहित नाही कारण मी कधी टँकर भरायला गेली नाही. त्या ठिकाणी ज्यावेळी मी भेट दिली त्यावेळी मी आरोग्य रक्षण वैद्यकिय सहाय्य समितीची सभापती होते. माझ्या बरोबर माझे पी.ए.वगैरे होते. मी फोन केल्यानंतर साधा नॉमिनल अधिकारी त्या ठिकाणी पाठविण्यांत आला होता. त्यांना सांगितले आता २० टँकर गेले पैकी एका टँकरचे पैसे नगरपालिकेला भरले जातात. सहा वाजता नगरपालिका बंद होते. सहाला पाच मिनिटे असताना तो पावत्या घेऊन आला. त्यापूर्वी पैसे का भरले नव्हते. आपल्याकडे उधारीचा इष्टांक होतो का? जर उधारीचा इष्टांक होत असेल तर आपले सर्वच नगरसेवक फुकट पाणी सगळयांना देतील. आपल्याकडे पाणी गळती पाणी चोरी म्हणून ओरड असते. सर्वात मोठे चारे हे  टँकरवाले आहेत. आपले अधिकारी किती चोर आहेत. आपल्या अधिका-यांनी अजूनही त्याच्यावर कारवाई  केलेली नाही. मी कारवाई करतो, मी बघतो अशीच उत्तरे दिली आहेत. मा.आयुक्त महोदय, तुम्हाला एवढेच सांगणे आहे की, तिथे मीटर लावलेले आहेत की, नाही दररोज मीटरचे रिडींग किती येते. त्याचे पैसे किती येतात, याचा जर हिशोब केलात तर पाणीपट्टी वसूलीमध्ये जो तुटवडा दाखविला आहे तो होणार नाही. गरीब लोक पाणी भरतात ते ८० रुपये देतात. त्यांनी बिल भरले नाहीतर त्यांची लाईन कटींग होते. मग हया लोकांचा जो चोर कप्पा चालू आहे तो कधी बंद होणार त्यांच्यावर जास्तीत जास्त लक्ष देऊन कारवाई करावी. आम्ही टँकर मागितले तर त्यांच्याकडे टँकर खाली नसतात. ते सांगतात टँकर खाली नाहीत त्यामुळे तुमच्या प्रभागात पाणी पाठवू शकत नाही. तरी हया पाणी चोरीला आळा कसा बसेल याबाबत लक्ष दयावे.

मा.महापौर महोदय, छत्रपती शिवाजी महाराज रुगालय ,कळवा हॉस्पीटलच्या बाबतीत थोड बोलणार आहे. तिथल्या पेशंटचे कपडे बरोबर नाहीत. मेन म्हणजे तिथे वॉर्डबॉय नाहीत. तिथे येणारे पेशंट गरीब असतात. त्यांच्या घराच्या माणसांना पेशंट बरोबर जबरदस्ती बसविले जाते. पेशंटला जेवायला दयायचे असेल तर वॉर्डबॉय नसल्याने पेशंटला जेवळ पोहणविण्यासाइी घरचा माणूस तिथे उपस्यित असणे

आवश्यक आहे. कारण हॉस्पीटलचे जेवण वॉर्डच्या दरवाज्या जवळ येते. त्यामुळे त्यांचे सांगणे असते पेशंट बरोबर तुमचा कोणीतरी माणूस ठेवा. मा.महापौर महोदय, आपण इतके सुंदर हॉस्पीटल बांधले आहे. मात्र नातेवाईक २४ तास थांबल्याशिवाय आम्ही पेशंट ॲडमीट करुन घेणार नाही असे सांगतात कारण आमच्याक डे वॉर्डबॉय कमी आहे. मा.महापौर महोदय,हॉस्पीटलची अतिशय वाईट दुर्दशा आहे. प्रत्येक ठिकाणी थुंकून ठेवलेले आहे. मा.धर्मवीर आनंद दिघे यांच्या अथक प्रयत्नांनी हे हॉस्पीटल सुरु करण्यांत आले होते. आज त्या ठिकाणचे व्हेंटीलेटर बंद आहेत. आता ९ मार्चला काहीतरी ॲक्सीडेंट झाला होता. त्या मुलाला रात्री दिड वाजता व्हेंटीलेटरवर ठेवता आले नाही. आपल्याकडे एकूण महन व्हेंटीलेटर आहेत पैकी दोन बंद आहेत आणि तिस-यावर त्याला ठेवल्यानंतर तो ही बद पडल्यामुळे त्याला रात्री इतक्या उशिरा सायन हॉस्पीटल ॲडमीटर करावे लागले. बिचा-याचे नशिब चांगले होते म्हणून तो वाचला.पण तिन्ही व्हेंटीलेटर एकदम बंद पडले तर पेशंट लोकांचे आपण काय करणार? इर्मजंन्सी जे पेशंट येतात त्यांना काय लावणार? जो पेशंट जाण्याच्या मार्गावर आहे त्याला लागलीच दुस-या ठिकाणी पाठवावे लागेल. म्हणजे तो रस्त्यातच मृत्यू पावेल. त्यामुळे आपण हयाकडे स्वतः जातीने लक्ष दिलेतर जे व्हेंटीलेटर बंद आहेत ते तांतडीने दुरुस्त होतील. तसेच आज महिला बालकल्याण समितीचा प्रोग्राम समाज विकास विभागामार्फत सायंकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यांत आला होता. परंतू तिथे नगरसेवक उपस्थित नाहीत आपले सगळे नगरसेवक बजेटच्या मिटींगला आहेत. मग तो प्रोग्राम जो लावला तो फक्त ज्या महिलांना आपण चेक दयायचे होते ते कुठल्या उद्देशाने दयायचे होते ते आम्हाला कळलेले नाही. मग एक वर्षभर ते काय करत होते. आपण ते सात-आठ लाख रुपये देतो ते देण्याचे काम वर्षाच्या अखेरीपर्यंत ठेवतो. त्यापूवी आपण असे कार्यक्रम का ठेवत नाही. मार्च महिन्यात योजना संपून नविन योजना एप्रिलपासून चालू होतात. वाटपाचे काम मार्च अखेरीस का ठेवले आज आमची मिटींग असताना तो कार्यक्रम ठेवण्यांत आला आहे. त्या ठिकाणी नगरसेवक कसे हजर राहू शकतात. नगरसेवकांना काय योजना आहेत, कशा आहेत. हे कसे समजणार? या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमचे मा.आमदार श्री. एकनाथजी शिंदे साहेब होते. विधान सभेत अर्थसंकल्पाबाबत मिटींग असल्यामुळे ते सुध्दा कार्यक्रमाला हजर राहू शकत नाही. मग हा कार्यक्रम आज कोणी ठेवला आहे? मा.महापौर महोदय, यायोजना एप्रिल महिन्यापासून राबविण्ययास सुरुवात करावी अशी विंनती आहे. तरच या योजनेचा लाभ घेता येईल. आता महिलांना शिलाईमशिन आणि घरघंटी देण्याचे ठरले आहे. मार्चच्या ३१ तारखेला आता किती दिवस राहिले? हया शिलाईमशिन आणि घरघंटी केंव्हा देणार आहेत. गेल्या वर्षीचे जे पैसे आले होते ते फुकट गेले. आता आपल्याला साडेसात कोटी रुपये मिळतात. ते केंव्हा वाटणार आहेत? गेल्या वर्षी आम्ही याबाबत चूाप बोललो पण त्याची अंमलबजावणी झाली नाही.

मा.महापौर महोदय,मा.आयुक्त साहेब आपल्या ठाणे महानगरपालिकेत एका उपआयुक्तांना आठ विभागाची कामे दिली आहेत. ही कामे वेळेवर होतात कि नाही ते आपण प्रत्यक्ष पाहिजे असेलच.आम्ही गार्डनबाबत काही चौकशी करायला गेलो असता, त्यांच्यापुढे आठ चौपडया उघडया असतात आणि ते त्याचा अभ्यास करत असतात आणि गार्डनबाबत काही विचारणा केली तर त्यांना त्याची काही कल्पना नसते. मग एका अधिका-याला आठ-आठ विभाग देण्याचे कारण काय ?तो चांगला अधिकारी आहे की, काम चांगले करतो म्हणून त्यांच्याकडे आठ आठ विभाग दिलेले आहेत? मला असे वाटते की, अभ्यास दौ-यासाठी सिमला-कुलूमनाली ते गेले होते. १० दिवस ते दौ-यावर असल्याने लोकांची कामे होऊ शकली नाहीत. त्यांच्या जागा टेंपररी आलेला माणूस कोणत्याही कागदपत्रावर सही करत नाही किंवा जबाबदारी घेत नाही. त्यांना आठ विभाग सांभाळताना नाकीनऊ येतात. कुठलेली काम होत नाही. माझ्या प्रभागात जिथे

गार्डन आहे तिथे पाण्याचा संप आणि पंप बनविताना गार्डनची थोडीची नासधूस झाली होती. त्या संदर्भात मी त्यांच्याकडे दोन-चार वेळा त्यांना सांगायला गेले की, तुम्ही तिथे दोन कामगार गेले आठ महिने ठेवले आहेत तिथे काहीही काम नाही. ते तिथे येतही नाहीत आणि त्यांचा पगारही चालू आहे. हे सांगूनही त्यांचा पगार अजूनही चालू आहे. त्याबाबत कोणताही निर्बंध लावलेला नाही. तरी त्यांच्याकडे आठ-आठ विभागाचे काम देऊ नका.

मा.महापौर महोदय, आपल्या नऊ प्रभाग समितीमध्ये मिळून जेटींग गाडया दोन किंवा तीन आहेत. पैकी एक बिघडलेली असते. आमच्या इथे ड्रेनेज चोकअप होतात. तीन-चार फूट पाणी साचते. लहान मुलांना शाळेत जा-ये करण्यास फास त्रास होता. आपण नऊ प्रभागांना स्वतंत्र जेटींग मशिन देणार होतात. याबाबत मी मागच्या अर्थसंकल्पामध्ये बोलले होते. पण अजूनपर्यंत जेटींग मशिन देण्यात आलेल्या नाहीत. तरी याबाबत लक्ष देण्यांत यावे.

मा.महापौर महोदय, ठाण्यातील पार्किंग व्यवस्थेबाबत बोलायलाच नको. आपल्या ऑफिसच्या आजू-बाजूला अनेक गाडया उभ्या केलेल्या असतात. त्या जकातीसाठी पकडल्या आहेत म्हणा किंवा अशाच पार्क केल्या आहेत. आजच्या पेपरमध्ये याबाबत बातमी आलेली आहे त्यावर लक्ष दिलेतर आपल्या ऑफिसच्या आजूबाजूला ज्या गाडया पार्क केल्या आहेत. तिथे जागा सुटेबल होईल आणि लोकांना येण्या-जाण्यासाठी जागा होइल. आमच्या प्रत्येकाच्या प्रभागात पार्किंगचे लफडे जोरात चालू आहे. मा.महापौर महोदय, शाळेच्याबाबतीत मी जास्त काही बोलणार नाही. पण आमच्या येथे शाळा क्रमांक २३ किसननगरला आहे. तिथे वर्गात ४० मुल आहेत आणि १० बेंच आहेत. तुटलेले बेंच गॅलरीमध्ये ठेवलेले आहेत. मुलांना शाळेत बसायला बेंच नसतील तर मुलांची गळती होईल नाहीतर काय? ज्या वेळी पालक मुल बसली आहेत का, अभ्यास करतात का हे बघायला येतात. त्यावेळी बेंच नसल्यामुळे मुलांना खाली बसलेली पाहिल्यावर मुलांची गळती होणारच.तुटलेल्या बेंचचा लिलाव करावा किंवा ते बाहेर काढून टाकावेत. याबाबत मी दोन तीन वेळा तक्रारी दिलेल्या आहेत. परंतू त्याचा काहीही उपयोग होत नाही. तरी याकडे आपण लक्ष दिले तर फार उत्तम होईल.

त्याचप्रमाणे मा.आयुक्त महोदय, ठाणे महापालिकेत टॅक्सच्या बाबतीत तीन उच्च शिक्षीत अधिकारी आपल्याकडे नेमले आहेत. तरी आपल्याकडे टॅक्स कमी जमा होतो ही बोंबाबोंब होते. उच्च शिक्षित अधिकारी असताना टॅक्सचे उत्पन्न कमी का जमा होते. त्यांना काय कामे दिली आहे. सिव्हील इंजिनिअर, उच्च शिक्षित अधिकारी आहेत, श्री.मोरे साहेब असताना टॅक्स कमी का येतो.हे लोक त्याचा अभ्यास करतात की नाही? कारण काही ठिकाणी अनधिकृत इमारती असतात. त्या इमारतीमध्ये ४० भाडेकरु असतात. दोन-चार भाडेकरुंनी टॅक्स भरला नाही तर इतरही भाडेकरु टॅक्स भरत नाहीत. कारण ते एकमेकाला पुरक असतात. जर प्रत्येकाला त्याची टॅक्स पावती हस्ते म्हणून दिली तर आपली वसूली चांगल्याप्रकारे होऊ शकेल. पाणीपट्टीच्या बीलातही हीच परिस्थिती असते. त्यामुळे पाण्याचे बिल सुध्दा काही इमारतींचे चार लाख रुपये बाकी आहे. आपण जर पाहणी केली तर अनधिकृत इमारतीत चार-चार लाख रुपये थकबाकी आहे. जर प्रत्येकाच्या नांवावर बिले दिलेतर वसूली चांगल्याप्रकारे होईल. तुम्ही मालकाला गाळू नका. मालकाचे नांव लिहून जर भाडेकरुचे नांव हस्ते म्हणून दिलेत तर टॅक्स आणि पाणीपट्टी वसूली अतिशय चांगल्याप्रकारे होऊ शकते. आपली वसूली होऊ आवश्यक आहे. कारण ते त्या ठिकाणी राहत आहेत आपले पाणी वापरत आहेत. त्यांना महापालिकेच्या इतर सुखसोय मिळतात.मग त्यांच्याकडून आपण वसूली करायला काय हरकत आहे? याबाबत मागच्या अर्थसंकल्पात बोलूच देखिल हया वेळेला काहीही झाले नाही. पाईपलाईनच्या बाजूला झोपडपट्टी आहे अर्ध्या लोकांना टॅक्स लागलेला आहे

आणि अर्ध्या लोकांनाटॅक्स लागलेला नाही. त्यांना टॅक्स लावा म्हणून सांगितले तर त्यांच्याकडून उत्तर मिळते की इथे टॅक्स लागू शकत नाही. कारण पाईपलाईनपासून ३० फूटावर झोपडी आहे. पण बाजूच्या झोपडीला टॅक्स लागलेला आहे. मा. महापौर महोदय, वसूलीबाबत जातीने लक्ष दिले तर आपली वसूली चांगल्याप्रकारे होऊ शकते आणि आपल्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच टॅक्स व पाणी पट्टीच्या बिलांचे वाटप आपल्याकडे कर्मचारीवर्ग कमी असल्यामुळे वाटप बरोबर होत नाही. बिलाचे वाटप जून-जुलै नतर पूर्ण होते. ही कामे जर बचत गटांना दिलीतर बिलांचे वाटप वेळेवर व मुदतीत होईल आणि लवकरांत लवकर वसूली सुध्दा होईल. एवढे केलेत तर फार बरे होईल एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

**सौ. अनिता गौरी :-**

मा.महापौर महोदय, सन २०१०-२०११ च्या मुळ अर्थसंकल्प १३३८ कोटीचा तयार केला असून तो मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभापतींनी आपल्यासमोर ठेवला आहे. सदर अर्थसंकल्पास मान्यता देत असताना आम्हा सदस्यांची काही प्रश्न आहेत त्यावर विचार करावा ही विनंती.

मा.सभापतींनी त्यांच्या भाषणात म्हटले आहे की, जुन्या इमारतींना पुर्नबांधणी करण्यासाठी अथवा स्ट्रक्चरल ऑडीट इत्यादीसाठी २५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. तरी त्याबाबत काही धोरणे आहेत ती स्पष्ट व्हावीत. त्यात पहिले असे आहे की, पालिकेच्या कार्यक्षेत्रात सरकारी जागेवरील अथवा विना परवाना इमारतींचा यात समावेश आहे का? त्यानंतर पालिका कार्यक्षेत्रात येणा-या ग्रामिण भागातील जुनी मोडकळीस आलेली घरे अथवा इमारतींचा यात समावेश आहे का? स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी ही २५ लक्षची तरतूद कमी आहे. कारण खारीगांवमध्ये अशा ब-याच जुन्या इमारती आहेत. त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले नाही. त्यांना सनद प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्या मोडून सुध्दा लिगल होऊ शकत नाहीत. आणि दुसरे असे की, शैक्षणिक दर्जाच्या सुधारणेसाठी ऑडीओ व्हीजन पध्दतीने जे केलेले आहे ती समाधानकारक बाब असलीतरी पालिका प्रशासनाने आगोदर सर्व शाळांची पाहणी करुन मुलभूत सेवा पुरविण्याकडे आधी लक्ष दयावे. महत्वाचे म्हणजे धोकादायक शाळा घोषित होऊनही नुतनीकरण करण्यासाठी महासभेचा ठराव मंजूर करुनही आजपर्यंत त्याच धोकादायक इमारतीत विदयार्थी शिकविले जातात. विदयार्थी व शिक्षक यांच्या जीवनाशी न खेळता पालिका प्रशासनाने आगोदर शाळा नुतनीकरण आणि शाळांच्या मुलभूत सुविधा पाहणे आवश्यक आहे. माझ्या प्रभागातील खारेगांव शाळा क्र. ६७ व ११४ धोकादायक घोषित होऊन सुमारे दिड वर्ष पूर्ण झाले. पुर्नबांधणीचा ठराव संमत करुन एक वर्ष झाले तरी आजपर्यंत त्याचा विचार झालेला नाही. तरी या बजेटमध्ये तरी त्याबाबत दरतूद व्हावी अशी मी विनंती करते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सगळीकडे खूप कॉलेज आहेत. त्यामानाने ठाण्यात कॉलेजची संख्या खूप कमी आहे. तरी पालिकेने नविन कॉलेजचा विचार करावा किंवा शैक्षणिक दृष्टीकोनातून जे भूखंड आरक्षित आहेत त्यांच्यावर कॉलेजचा विचार करावा. म्हणजे शासनाचा जास्त कॉलेज बनविण्याचे जे धोरण आहे. ते .भूखंड घोषित करुन त्यांना परवानगी देण्यांत यावी.

मा.महापौर महोदय, पाणी ही अत्यंत जीवनावश्यक बाब आहे. पाण्याच्या अनधिकृत नळ कनेक्शनवर नियंत्रण ठवणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे जास्तीत जास्त दंड आकारणी केली पाहिजे हे करुन होत नसेल तर अनधिकृत कनेक्शन देणारे कर्मचारी आणि अधिकारी यांच्यावर प्रशासकिय कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे.

मा.महापौर महोदय, या अर्थसंकल्पात पान क्र. ३५ वर उदयानासाठी २.१० लाखाची तरतूद केलेली आहे. गेले तीन वर्ष सतत उदयानासाठी ही तरतूद केली जात आहे. आणि सतत तीन वर्ष तरतूद ठेऊनही खारेगावच्या हरी पाटील उदयानाचे काहीही काम झालेले नाही. आणि विचारले गेले असता हा निधी

वापरला गेला आहे असे सांगतात. परंतू त्या निधीचा वापर त्या परिसरासाठी केला जात नाही. तरी याबाबत चौकशी व्हावी आणि यावर्षी तरी त्या उद्यानाला न्याय मिळावा असे मला वाटते.

त्याचप्रमाणे खारेगांव आणि कळवा प्रभागातील ब-याच नगरसेवकांनी कळवा हॉस्पीटलमध्ये पोस्ट मार्टेमची सुविधा २४ तास असावी अशी मागणी केली आहे. तरी याबाबत शासनाकडे योग्य तो पत्र व्यवहार करुन ही सुविधा चालू करण्यास शासनाची मान्यता लवकरात लवकर घ्यावी असे मला वाटते. आणि विशेष म्हणजे तेथील स्वच्छता आणि सेवेकडे लक्ष देऊन तात्काळ आरोग्य सेवा पुरविण्याचे आदेश करण्यात यावेत. व्हावेत.

त्याचप्रमाणे मा.सभापतींनी आपल्या निवेदनात सांगितल्याप्रमाणे ठाणे महापालिकेच्या हद्दीतील वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे होणारी वाहतुक कोंडी हा गंभीर प्रश्न होत चालला आहे. व तो सोडविण्यासाठी तीनहात नाका जंक्शन,हाजूरी व गोल्डन डाईज नाका येथे उड्डाणपुल किंवा भुयारीमार्ग तयार करणे आवश्यक आहे. व त्यासाठी ५० कोटीची तरतूद ठेवली आहे त्याप्रमाणे कळवा नाका परिसरात याबाबत तरतूद करावी. कारण एकीकडे मुंब्रा रस्ता आणि दुसरीकडे नवी मुंबईकडे जाणारा रस्ता आहे. सकाळी आणि संध्याकाळी त्या ठिकाणी वाहतूक कोंडीचा त्रास असतो. तरी मा.आयुक्त साहेब याबाबतही विचार व्हावा. जेएनएनयूआरएम सारख्या स्कीम असतील तर येणा-या पुढच्या वर्षात कळवा परिसरात फ्लाय ओव्हर होणे गरजेचे आहे.

आरक्षित जागा संपादित करण्यासाठी भूमी संपादन या लेखाशिर्षका खाली २४ कोटीची तरतूद आहे. ती तरतूद पाच कोटींनी वाढविण्यांत आली आहे. शहराचा विकास आणि सौंदर्य वाढविण्याचा विचार या अर्थसंकल्पात केला आहे याबद्दल धन्यवाद.. त्याचप्रमाणे आरक्षित मोकळया जागा आणि त्यासाठी संरक्षक भित त्वरीत बांधाव्यात जेणेकरुन या मोकळया भूखंडावर अतिक्रमण होणार नाही.

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत ब-याच स्मशान भूमी आहेत. त्याचाही वाढीव बजेटमध्ये समावेश असावा आणि नवीन पध्दतीने स्मशानभूमी तयार करण्यांत याव्यात. तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी गॅस स्मशानभूमी पध्दतीचा विचार करण्यांत यावा. स्मशानभूमींसाठी अडीच कोटीची तरतूद ठेवण्यांत आली आहे. संपूर्ण ठाणे महापालिका हद्दीतील स्मशानभूमींसाठी मला ही तरतूद कमी वाटते. त्या जास्तीत जास्त वाढ करण्यांत यावी. कारण खारेगांव सारख्या परिसरामध्ये सी.आर.झेड मुळे स्मशानभूमीच्या सुविधा अजून मिळालेल्या नाहीत. तरी या बजेटमध्ये त्याची तरतूद करण्यांत यावी.

ठाणे महापालिका क्षेत्रातील सोसायटयांच्या अंतर्गत कामांबाबत सूचवायचे आहे. सोसायटयामधून आपल्याल्या करोडो रुपये कराच्या रुपाने मिळत असतात. पण सोसायटयांना त्यांची अंतर्गत कामे करण्यासाठी महापालिका सुविधा देत नाही. त्या लोकांकडून आम्हाला विचारणा असते की, आम्ही करोडो रुपयांचा टॅक्स देऊनही आमच्या सोसायटयां अंतर्गत कामे करण्यास महापालिका देत नाही. तरी त्याबाबत काहीतरी विचार करण्यांत यावा. काही सोसायटयांमधून संपूर्ण परिसराचा ड्रेनेज जात असतो. पण पालिकेचे कर्मचारी सांगतात की, सोसायटीच्या आतमध्ये असल्यामुळे आम्ही काही करु शकत नाही. आपल्याकडे त्यांच्याकडून करोडो रुपयांचा टॅक्स जमा होत असतो.परंतू आपण त्यांना मुलभूत सुविधा देत नाहीत. त्याबाबत या अर्थसंकल्पात विचार व्हावा. त्यांच्या परिसरात अंतर्गत पेव्हरब्लॉक बसविणे किंवा इतर ज्या मुलभूत सुविधा आहेत त्या दयायला काहीच हरकत नाही. कारण करोडो रुपये टॅक्स आपल्याला त्यांच्याकडून मिळत असतो. तरी याबाबत प्रशासनाने काहीतरी धोरण आखावे किंवा काहीतरी ठोस निर्णय या बजेटमध्ये घेण्यात यावा.

यानंतर महापालिकेच्या उत्पन्नाच्याबाबत मला सांगायचे आहे. जकातीमधून आपल्याला जास्तीत जास्त उत्पन्न मिळत असते. आपल्या जकात नाक्यांवर सी.सी. कॅमेरे किंवा स्कॅनिंग मशिन अशाप्रकारची अधुनिक यंत्रे बसविली तर भ्रष्टाचारास आळा बसेल. गोडाऊनला स्कॅनिंग मशिन असलेतर तुम्हाला कुठेतरी नियंत्रण ठेवता येईल.

तसेच अनधिकृत इमारतींना पाणीपुरवठा करु नये व चालू असलेला पाण्याचा दर हा व्यवसायिक करुन उत्पन्नात भर वाढवावी. मागच्या बजेटच्या वेळी मी ॲमिनिस्ट्री स्कीम सुचविली होती. या वेळेच्या बजेटमध्ये बघितले तर जास्तीत जास्त ॲमिनिस्ट्री स्कीममुळे महापालिकेला फायदा झालेला आहे. आणि त्यामुळे बाहेरुन ठाण्यात येणा-या आणि ठाण्यात वापरणा-या गाडयांमुळे उत्पन्नात भर पडेल व त्यावर नियंत्रण ठेवल्यास उत्पन्नात वाढ होईल.

मा.महापौर महोदय, मागच्या महासभेत कच-यापासून वीज निर्मितीचा जो प्रस्ताव होता की, एक कंपनी येऊन अभ्यास करुन कच-यापासून वीज निर्मिती करणार होती. यामध्ये नव्याने असे करण्यांत यावे की, कच-यापासून वीज निर्मिती सुध्दा होते आणि यापूर्वी सन्मा.सदस्य श्री. नजीब मुल्ला यांनी सुचविल्याप्रमाणे मला ही असे वाटते की, कच-यापासून जशी वीज निर्मिती त्याचप्रमाणे कार्बन क्रेडीटच्या रुपात मिळणा-या परकिय चलनाचा काही हिस्सा महापालिकेला मिळावा. त्यासाठी आपण प्रयत्न करावा.

मा.महापौर महोदय, सिव्हरेजचा ८० कोटीचा प्रकल्प आहे परंतू आतापर्यंत व्यवस्थीत काम कोठेही सुरु झालेले नाही. संपूर्ण ठाणे शहरात ठिक ठिकाणी कामे अर्धवट स्थितीत आहेत. या कामाची कुठेही मुदत दिलेली नाही. शहरात सगळीकडे खोदलेले आहेत. तरी हे काम पावसाळयाच्या आत युध्द पातळीवर सुरु करण्यांत यावे. जेणेकरुन आपल्या भागातील रस्ते युटीडब्ल्यूटी च्या अंतर्गत होतील.

मा.महापौर महोदय, गरीब लहान मुलांसाठी हेल्थ क्लबचा हेल्थ कार्ड असते. गरीब मुलांना औषधासाठी किंवा इतर सोयीसाठी हे हेल्थ कार्ड असते.तसे हेल्थ कार्ड महापालिकेने गरीब मुलांसाठी देण्याचे सुरु करावे म्हणजे गरीब मुलांना त्याचा उपयोग होईल. त्याचप्रमाणे शहरात शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांचा सर्व्हे करुन त्या मुलांसाठी काहीतरी करावे किवा त्यांच्यासाठी बजेटमध्ये काहीतरी तरतुद ठेवावी जेणेकरुन त्यांना महापालिकेकडून शिक्षण मिळू शकेल.

तसेच विद्यार्थ्यासाठी एक वसतीगृह ठाणे येथे असावे. आपल्याकडे कुठेही विदयार्थांसाठी वसतीगृहाची सोय नाही.

मा.महापौर महोदय, आरोग्याच्या दृष्टीकोनातून बोलायचे झालेतर आपल्याकडे फवारणीची एकच गाडी आहे. मला वाटते की, प्रत्येक प्रभाग वाईज फवारणीची गाडी असावी. कारण माणसांद्वारे जी फवारणी केली जाते ती व्यवस्थित होत नाही आणि जी होते ती पुरेशी वाटत नाही. कारण एखादया आठवडयात एक माणूस गल्लीत येऊन ती फवारणी करतो त्याचा काहीच असर हाते नाही. म्हणून प्रत्येक प्रभाग वाईज फवारणीची गाडी असावी. ज्या ज्या भागात रस्ते आहेत त्या ठिकाणी गाडीने फवारणी करण्यांत यावी. तसेच जेटींगच्या गाडीबाबत मी मागच्या वेळी सुध्दा सुचना केली होती की, फॉरेनमध्ये जशी सिस्टीम आहे एक जेटींगची गाडी जाऊन प्रत्येक रस्त्यावर आठवडयातून एक-दोन वेळा फवारणी केली जाते. आता सध्या रिक्षा टाईप जेटींगची गाडी आली आहे आणि फक्त दोन ते अडीच लाख रुपये तिची किंमत आहे. मा.महापौर महोदय, आपल्याला या नऊ गाडया घ्यायला काहीच हरकत नाही. जेणेकरुन परिसरातील ड्रेनेजची समस्या दुर होईल. आणि जसे बजेट या सभागृहात मांडला जातो. त्याप्रमाणे तो मा.आयुक्त साहेबांचा आदेशानुसार तो त्या त्या तरतूदीसाठी वापरला जावा. जेणेकरुन तेच तेच मुद्दे पुढील बजेटमध्ये येणार नाहीत. अंदाजित आणि प्रस्तावित रक्कमेची कामे वेळीच पूर्ण झाल्यास नागरिकांच्या रोषाला आम्हा

नगरसेवकांना सामोरे जावे लागणार नाही. महिला बालकल्याण समितीच्या सगळयांच सदस्यांनी सांगितले आहे की, आपल्या योजनांसाठी असलेल्या अटी व शर्ती थोडया शिथील करण्यांत याव्यात. जेणेकरुन गरजू लाभार्थिंना त्याचा लाभ घेता येईल. तसेच गेल्या तीन वर्षापासुन घरघंटी आणि शिलाईमशिनसाठी बजेटमध्ये तरतुद केलेली आहे. त्या यंत्रे मला वाटते यावर्षी मिळतील. हया आशेवर आम्ही आहोत. मा.आयुक्त साहेबांना विनंती आहे की, त्यांनी याबाबत विशेष लक्ष दयावे.

यांनतर महापालिकेला उत्पन्नाचे सोर्स असलेल्या मोबाईल टॉवर बाबत बोलायचे आहे. याबाबत सर्व्हेक्षण होणे आवश्यक आहे. कारण त्यातून आपल्याला मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळू शकेल. सर्व सदस्यांना जर हे मान्य असेल तर त्याबाबत विचार करायला हरकत नाही. कारण सोसायटीमध्ये ते लावले जातात आणि सोसायटीला त्याचा फायदा होतो. तरी महापालिकेने ते कायदेशीर करुन त्यातून उत्पन्न कसे मिळविता येईल याबाबतही विचार करायला हरकत नाही असे मला वाटते.

मागच्या वेळी खेळाच्या मैदानाचा प्रस्ताव घेतलेला आहे की, खारेगांव परिसरामध्ये कुठेही खेळाचे मैदान नाही. तरी मफतलाल कंपनीची जागा कोर्टरिसिव्हरच्या माध्यमातून महापालिकेला मिळण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. तरी मला असे वाटते की, त्या ठिकाणी खेळाचे मैदान करण्यांत यावे. तरी याबाबतचा समावेश असावा. जेणेकरुन मफतलाल ग्राऊंडचा आम्हा खारेगांवच्या लोकांना फायदा होईल. त्याचप्रमाणे खारेगांव महापालिकेच्या हद्दीत असून सुध्दा अजूनपर्यंत खारेगांवला ब-याचशा सुविधा आलेल्या नाहीत. मा.आयुक्त साहेबांना विनंती आहे की, गावाचे शहरीकरण करण्यांत यावे आणि जास्तीत जास्त आमची कामे या बजेटमध्ये घेण्यांत यावी ही विनंती आहे. मला बजेटवर बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आभारी आहे.धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.. ..

**श्री. भैय्यासाहेब इंदिसे :-**

मा.महापौर महोदय, मा.आयुक्त महोदय, सन २००९-२०१० चे सुधारीत अंदाजपत्रक आणि सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रक या ठिकाणी मंजूर करत असताना, मा.महापौर महोदय, माझ्या काही सूचना आहेत त्या सूचनांचा हया अंदाजपत्रकात समावेश करण्यांत यावा. मा.आयुक्त महोदय, महानगरपालिकेचे जे उत्पन्नाचे मुळ साधन आहे ते जकात विभाग आहे. गेल्या वर्षी जकात विभागाचे उत्पन्न ३०० कोटी होते. यावर्षी ते ३७५ कोटी रुपये झाले. मला असे वाटते की, जकातीचे खाजगीकरण केलेतर खाजगीकरणाच्या माध्यमातून आपल्याला ५०० ते ५५० कोटीचे उत्पन्न मिळू शकते आणि आज जे ३७५ कोटीचे उत्पन्न त्यात आपण प्लसमध्ये १२५ कोटी रुपये जास्त उत्पन्न घेऊ शकतो आणि आपल्या जकात विभागात सध्या जे कर्मचारी काम करतात. महापालिकेच्या इतर विभागात कर्मचा-यांची जी कमतरता भासते. त्या विभागात त्यांच्या बदल्या कराव्यात. मग ते पाणी खाते असेल आरोग्य खाते असेल अन्य इतर ठिकाणी त्यांच्या उपयोग होईल.पाणी पट्टीच्या बिलाच्या वसूलीमध्ये जी घट होत चालली आहे. कर्मचारी मिळाल्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढू शकते. हया गोष्टीचा विचार करण्यात यावा. यानंतर जवळ जवळ सर्वच सन्मा. सदस्यांनी परिवहन,शिक्षणमंडळ यबाबत चर्चा केली. मा.आयुक्त साहेब,परिवहन सेवेला तुम्ही कितीही पैसे दिले, बजेटमध्ये कितीही मोठी तरतुद केली तरी त्यात सुधारणा होणे शक्य नाही. महापालिकेच्या मुख्यालयात परिवहन सेवेच्या संपूर्ण कार्यालयासाठी जर पाचवा मजला तयार केला तरच सुधारणा झालीतर झाली. आणि शिक्षणमंडळाबाबत बोलायचे तर र्चा करुनही शिक्षणमंडळात काही फरक होत नसेल तर आणि महापालिकेच्या शाळांतील पटसंख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. याबाबत जर गांर्भियाने विचार केला जेवढया आपल्या महापालिकेच्या शाळा आहेत. जर काही शिक्षण संस्था भाडयाने घेत असतील तर त्यात आपला ३०% वाटा ठेवून त्या त्यांना भाडयाने चालविण्यास दयाव्यात

जेणेकरुन आपल्याला तिथूनही उत्पन्न घेता येईल. आणि शाळांमध्ये जो कर्मचारी वर्ग शिक्षक, लिपिक व शिपाई आहेत तो त्याच शिक्षण संस्थेने सांभाळावा. तसेच आपले सन्मा.सदस्य श्री.सुरेश कांबळे, सौ.महेश्वरी तरे, आणि सौ. अनिता गौरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, महापालिकेचे एक कॉलेज असावे आणि सौ.गौरीमॅडमनी सांगितले की, महापालिकेचे एक वसतीगृह असावे. मी ही सांगातो की, जरुर असावे परंतू त्याचे नियंत्रण शिक्षणमंडळाकडे नसावे. त्याचे नियंत्रण मा.महापौर महोदय, आपल्या देखरेखीखाली असावे. तरच ते होऊ शकते. तरी या सर्व गोष्टींचा विचार करताना मा.महापौर महोदय, बजेटमध्ये एक नविन हेड तयार करावा अशी सर्व सभागृहाला माझी विनंती आहे. भारतरत्न परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस २४ एप्रिल रोजी असतो. जशी आपण छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात सर्व राजकिय पक्षांना एकत्रित घेऊन ठाणे महानगरपालिकेच्या वतीने साजरी करतो. त्याचप्रमाणे शहिर अण्णभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्ताने आपण नविन हेड तयार केलेला आहे. तसाच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त एक नविन हेड सुरु करुन त्यात पाच ते सात लाखाची तरतूद करावी. जेणेकरुन ठाणे रेल्वे स्टेशन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा ते कोर्टनाका येथील बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळापर्यंत भव्य मिरवणूक १४ एप्रिला सर्व राजकिय पक्षांना एकत्रित घेऊन सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० पर्यंत काढण्यांत यावी व ती ही ढोल ताशांच्या जल्लोषात त्याचप्रमाणे दिनांक १५ एप्रिल रोजी सायंकाळी ४.०० ते रात्रौ १०.०० वाजेपर्यात शिवाजी मैदान, तलावपाळी येथे महामानवाच्या जीवनावरील एक प्रबोधनपर कार्यक्रम व काही महामानवांच्या जीवनावरील व्याख्याने आयोजित करणे असा एक नियोजन बंध  कार्यक्रम असावा आणि त्यास पाच ते सात लाखाची तरतूद करण्यांत यावी. त्याचप्रमाणे डेव्हलपमेंट प्लॅन मधले जे जे रस्ते आहेत.मग ते ठाणे शहरातील कूठलेली रस्ते असू दया. ते सर्व हाती घेण्यात यावे.

तसेच मा.आयुक्त साहेब, घोडबंदर रोडचा जो झपाटयाने विकास होत आहे. त्याबाबत विचार करुन तिथे जी ट्राफिक असते ती वसंत विहार पोखरण रोड नं.२ मागे शिवाईनगर, देवदयानगर,शास्त्रीनगर येथे कधी लक्ष्मीपार्क या बाजूने तर कधी वर्तकनगर या बाजूने मुंलूड वगैर परिसरात ती बाहेर पडते. त्यातील डेव्हल्पमेंट प्लॅनचे जे रस्ते आपले मंजूर आहेत. ते रस्ते त्वरीत घेण्यांत यावेत. तत्वज्ञान विद्यापिठ ते २२ नंबर सर्कल तसेच आमच्या शास्त्रीनगर हत्तीपुल ते चौकीचा पाडा हत्तीपुल ते लोकमान्य बस डेपो हे जे रस्ते आहेत ते सर्व रस्ते त्वरीत घेण्यांत यावेत आणि हया रस्त्यांमध्ये रस्ता रुंदीकरणात जे-जे विस्थापित होतील त्या सर्वांचे पुर्नवसन एस.आर.डी. किंवा बीजएस.यु.पी.या योजनेखाली करण्यांत यावे. जर एस.आ.डी.योजनेमध्ये त्यांचे पुर्नवसन होत असेल तर त्याचा एफ.एस.आय. संबंधित विकासकांना देण्यात यावा.

मा.महापौर महोदय, अनधिकृत बांधकामांवर सर्वांचे लक्ष असते. मग ते येऊरचे बंगले असोत किंवा अन्य इमारती असो. मा.आयुक्त महोदय, आपण अधिकृत बांधकामातील  अनधिकृत बांधकाम कधीही शोधत नाही. काही ठिकाणी लिगल मध्ये एसटीपी अनधिकृत असते. तर कुठे वापर परवाना नसतानाही ते वापर सुरु करतात. किंवा मंजूर प्लॅनच्या व्यतिरिक्तही बांधकाम केलेले असते.हे जर आपल्या शहर विकास विभागाने शोधले तर आणि संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली तर त्यातूनही आपल्याला चांगल्याप्रकारे उत्पन्न मिळू शकते. जो टीडीआर ते विकत घेतात किंवा अन्य टिडीआर ते वापरतात. त्या टिडीआर व्यतिरिक्त ते जास्त बांधकाम करतात. अशा बाबी आपण बारकाईन शोधून काढल्यातर त्यातूनही आपल्याला चांगले उत्पन्न मिळू शकते. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र ..

**श्री. जनार्दन खेतले :-**

मा.महापौर महोदय, सन २०१०-२०११च्या मुळ अर्थसकल्पावर सभागृहातील बरेच सदस्य बोलले आहेत. मी काही ठरावित सूचना करणार आहे. सर्व प्रथम मी म.महापौर, मा.आयुक्त, मा.स्थायी समिती सभापती यांचे मनःपुर्वक आभार मानतो. हयावेळी त्यांनी सर्व गुणसंपन्न असा माणूस असतो तसा सर्व गुण संपन्न अर्थसंकल्प सादर केलेला आहे. आपला अर्थसंकल्प १३ कोटी २९ लाखाचा आहे. .आणि त्यामध्ये प्रामुख्याने आपण रस्ते आणि इतर चांगले प्रकल्प घेतले आहेत. सर्व प्रथम मी उत्पन्नाच्या बाबींबाबत बोलेन. कारण पैसा असेल तर आपण पुढे सतत चांगल्या सोयी देऊ शकू. ठाणे महापालिकेच्या उत्पन्नातील सगळयांत मोठे ४८ % उत्पन्न हे आपल्याला जकातीपासून मिळते. मालमत्ता करापोटी आपल्याला २१.८९% उत्पन्न मिळत असते आणि पाणीपट्टीतून ९ .११ % तसेच विकास करातून ९.४६ % असे आपल्याला उत्पन्न मिळत असते. हे आपले हक्काचे उत्पन्न आहे. आणि सर्वप्रथम मी आपल्या निदर्शनास आणून देईन की, जे आपले उत्पन्नाचे स्त्रोत आहेत तिथे आपला कर्मचारी वर्ग कमी पडतोय असे मला वाटते. मग तो जकात विभाग असो,पाणी पुरवठा विभाग असो किंवा मालमत्ता कर विभाग असो. गेली दोन-दोन वर्ष काही ठिकाणी पाण्याचे कनेक्शन देऊन झाले आहेत. पण लोक अर्ज करुन पाण्याच्या बिलाची मागणी करतात तरी सुध्दा त्यांना आपण पाण्याचे बिल देऊ शकत नाही. कराच्या बिलाबाबत तिच परिस्थित आहे. झोपडपट्टी भागात तळ+एक अशा अशी अनेक घरे आणि चाळी आहेत. परंतू आपण त्यांच्या वरच्या मजल्याला टॅक्स लावत नाही. पण रस्त्यावर जर हातगाडी उभी राहिली तर त्यांच्याकडून १५-२० रुपये घेतो.परंतू वर्षानुवर्षे तिथे घरे असून आपण त्यांच्याकडून टॅक्स घेत नाही. माझ्या प्रभागात १९९४ पूर्वीच्या झोपडपट्टया आहेत. त्यांच्याकडे निवडणूकीचे ओळखपत्र आहे.,रेशनकार्ड आहेत परंतू त्यांना आजपर्यंत टॅक्स लावू शकलो नाही. आपण टॅक्स का लावत नाही? आपण त्या झोपडीला टॅक्स लावला म्हणून ती झोपडी अधिकृत होणार आहे का? आपण आपल्या टॅक्स
पावतीवर अनधिकृत बांधकाम म्हणून शिक्का मारतो.अशा अनेक ठिकाणाहून आपल्याला उत्पन्न मिळू शकते पण आपले कुठेतरी दुर्लक्ष होत आहे. विकास कराची परारिस्थिती सुध्दा तीच आहे. आपल्याकडे जाहिरातीच्या माध्यमातून जेवढे उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे तेवढे मिळत नाही. कारण तिथेही कर्मचारी अपुरे आहेत आणि अनधिकृत होर्डिग्ज् अनेक आहेत. आपल्याला जे अधिकृत होर्डिग्जमधून उत्पन्न मिळत आहे. त्याच्या कितीतरी पटीने जास्त उत्पन्न आपल्याला अनधिकृत होर्डिग्ज्मधून आपण उत्पन्न मिळवू शकतो. मा.आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे की, आपले जे उत्पन्नाचे स्त्रोत आहेत तिथे आपल्या हक्काचे उत्पन्न आहे. तिथे कर्मचारी वर्ग वाढवा. अन्य ठिकाणी कर्मचारी थोडा कमी असेलतरी चालेल. अथवा ज्याप्रमाणे एम.एस.ई.बी.कडे बीले वाटण्यासाठी बचत गटांना किंवा सामाजिक संस्थांना देतात तसा प्रयोग आपण आपल्याकडे करुन बघा. कर वसूली,पाणीपट्टीची बिले किंवा त्यांचा सर्व्हे करायचा असो याबाबत आपण प्रायोगिक तत्वावर करुन बघा उत्पन्न वाढते किंवा कमी होतेय हे करुन बघायला काही हरकत नाही असे मला वाटते.

मा.महापौर महोदय, रस्ते बनविण्यासाठी सुमारे ११८.५० लाख रुपये खर्च करणार आहोत. आपण अनेक रस्त्यांचे रुंदीकरण केलेले आहे. या रुंदीकरणामध्ये अनंक लोक बाधित झालेले आहेत. आपण अजून ११८ कोटी रुपये या रस्त्यांवर खर्च करणार आहोत. यात आपला उदेश असा आहे की, शहर सुंदर दिसावे यासाठी आपण उद्याने व चौक सुशोभिकरणावरही खर्च करतोय, फुटपाथ.दुरुस्तीवर खर्च करतोय. परंतू आज आपल्या शहरातील फुटपाथ सुस्थितीत आहे का? मोकळे आहेत का?, फुटपाथवरुन नागरिक चालू शकतात का? याचा आपण कधी विचार करत नाही. कोटीच्या कोटी रुपये खर्च करतोय. परंतू सर्व्हीस

रोड पाहिलात तर मॉलमध्ये येणा-या लोकांच्या गाडया तिथे पार्क केलेल्या असतात. तीन पेंट्रोलपंपा पासून या रोडपर्यंत ठिक-ठिकाणी गॅरेज झालेले आहे. एक गाडी जाणे तिथे मुश्कील झाले आहे. मग रस्त्यावर आपण का खर्च करतोयृ लोकांना का विस्थापित करतोय?आपण खर्च करत असताना आपला उद्देश असेल की, आपले शहर सुंदर दिसाव। चांगले दिसावे, आपल्या शहराला जे वेगवेगळे पुरस्कार मिळतात त्याच्यात अजून मानाचा तुरा रोवला जावा असा आपला उद्देश असताना, आपला अतिक्रमण विभाग मात्र त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतोय. माझा अतिक्रमण विभागावर आरोप आहे की, शहरामध्ये ज्यावेळी आपली अनधिकृत फेरीवाले उचलण्यासाठी गाडी जाते त्यावेळी गाडी पुढे गेल्यावर पुन्हा त्या ठिकाणी रस्ता पूर्णपणे व्यापलेला असतो. आपल्या अतिक्रमण वाल्यांची त्यांना भिती का वाटत नाही? याचा अर्थ अतिक्रमण विभागामध्ये बदल करण्यीच गरज आहे. अतिक्रमण विभागाने काही ठराविक इमारती तोडल्या म्हणजे काम झाले असे नाही. आज शहरात रस्त्यावर जे अतिक्रमण होत आहे त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. मा.आयुक्त महोदय, याकडे लक्ष देणे अतिशय गरजेचे आह

यानंतर आपण रस्त्याच्या अपेक्षित परिणामामध्ये लिहीले आहे नविन पुल,पादचारी पुल बांधण्यांत येणार असल्यामुळे अपघाताच्या प्रमाणामध्ये घट होईल आणि वाहन चालकांसाठी येणारे अडथळे कमी होतील. पे ॲण्ड पार्किंग, सिग्नल, झेब्रा पेटींग, स्पीड ब्रेकर इत्यादींमुळे वाहतुकीमध्ये सुसुत्रिकरण येईल आणि अपघाताचे प्रमाण कमी होईल. इत्यादी बाबींमुळे शहराचा प्रवास सुखकर,आनंददायी , वाहतुक कोंडी मुक्त व अपघात विरहीत होण्यास मदत होईल. पदपाथ निर्मिती बांधकामात सुधारणा केल्यामुळे पादचारी वाहतुक लक्षणीय सुधारणा होईल. मा.आयुक्त महोदय, आपण हे जे फायदे लिहीले आहेत परंतू जोपर्यंत आपल्या फुटपाथवर टप-यांचे राज्य आणि गॅरेजवाल्यांनी आपले फुटपाथ व रस्ते पूर्णपणे व्यापले आहेत. जोपर्यंत ते पूर्णपणे हटविले जात नाहीत तोपर्यंत आपल्याला अपेक्षित परिणाम दिसणार नाहीत. तरी याबाबत तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे आपण काही संस्थांकडून रस्ता खोद फी घेतो. परंतू दर पंधरा दिवसांनी किंवा एका महिन्यांत वेगवेगळया संस्थांना रस्ते खोदायला आपण परवानगी देतो. असे का करतो. आपण एका वेळी सर्व संस्थांना काम करायला सांगावे. तसे होत नसल्यामुळे आज रस्त्याची दुरुस्ती झाली तर उदया लगेचच तो रस्ता पुन्हा खोदला जातो. आपले काही चतुर अधिकारी एकाच वेळी तीन चार संस्थाना रस्ता खोदायची परवानगी देतात. तीन जणांना पैसे लावतात आणि शेवटचा जो ठेकेदार असतो त्याच्याकडून रस्ता दुरुस्तीचे काम करुन घेतात. मा.आयुक्त महोदय, याबाबतीत आपण चौकशी करावी आणि एखादया प्रभागात काम चालू झाले तरी संबंधित नगरसेवकांना त्याची कल्पना नसते. नागरिक आम्हाला विचारतात काल रस्ता बनविला तो आज का खोदतात? ज्या प्रभागामध्ये एखादे काम मुख्यालयामार्फत किंवा प्रभाग समितीमार्फत होणार त्याची कल्पना त्या नगरसेवकांना असावी. आमच्या प्रभागात काय काम चालले आहे याची कल्पना आम्हालाच नसते. नगरसेवक निधी आणि प्रभाग सुधारणा निधींच्या कामांची आम्ही पत्र दिलेली असतात म्हणून तीच कामे आम्हाला माहिती असतात. तरी असे होता कामा नये नगरसेवकांना विश्वासात घेऊन कामे करा. आमचा तुमच्या कामामध्ये कुठेही अडथळा नसेल. नगारिक जेंव्हा आम्हाला चालू असलेल्या कामाबाबत विचारणा करतात ते काम चालू होत असल्याचे आम्हालाच माहिती नसेल्यामुळे त्यांच्या समोर आमचा अज्ञानपणा दिसून येतो.त्या
नागरिकांना आम्ही उत्तर देऊ शकत नाही. तरी याबाबत आपणांस विनंती आहे की, प्रभागात काम सुरु करण्यापूर्वी संबंधित नगरसेवकांना त्या कामाची माहिती असावी.

त्याचबरोबर मार्केट बांधण्यासाठी १ कोटी १० लाखाची तरतूद केलेली आहे ही चांगली गोष्ट आहे. परंतू यापूर्वी आपण बांधलेले गांवदेवी व जोगिला मार्केट किंवा आपल्या शहरातील मेन गार्डन असेल त्या

लोकांची आज परिस्थिती काय आहे? त्या मार्केटमध्ये विक्रेते बसतात का? आपण करोडो रुपये खर्च करुन मार्केट बांधतोय परंतू विक्रेते मार्केटमध्ये न बसता फुटपाथवर-रस्त्यावर बसतात. मग आपला उद्देश पूर्ण होतोय का? याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. महापालिकेची सुरक्षा व्यवस्था वाढविणे हा अतिशय महत्वाचा आणि गरजेचा विषय आपण घेतलेला आहे आणि त्यासाठी आपण ५.५५ लाख रुपये खर्च करतोय. आपले महापालिका मुख्यालय अतिरेक्यांच्या हिट लिस्ट असल्याचे वर्तमानपत्रात वाचले होते. अशावेळी आपली सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे आपली उदयाने आहेत त्या ठिकाणीही आपली सुरक्षा व्यवस्था पुरविणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे आपण शाळांसाठी ८.२० लाख खर्च करतोय. नौपाडा ठाणे महापालिका शाळा क्र. १९ विष्णूनगर शाळेवर तिसरा व चौथा मजला चढविणे. मा.महापौर महोदय, आज त्या शाळेत तेवढे विदयार्थी आहेत का? मग आपण हा खर्च का करणार आहोत? विदयार्थी सख्या अपुरी असताना मजल्यावर मजले का चढवायचे? त्या ऐवजी इतर शिक्षणावर खर्च केलातर बरे होईल असे मला वाटते.

मा.महापौर महोदय, माझ्या दृष्टीने सर्वात महत्वाचा विषय आहे आपण तलाव सुशोभिकरणासाठी चार कोटी रुपये खर्च करण्याची यावर्षी तरतूद ठेवली आहे. परंतू आपले बरेचसे तलाव आपण भाडे तत्वावर दिलेले आहेत आणि भांडे तत्वावर देताना प्रत्येक तलावाच्याबाबत वेगळे ॲग्रीमेंट झालेले आहे आणि त्यामध्ये कोणी तीन कोटी, कोणीला चार कोटी, कोणी पंचवीस कोटी रुपये खर्च करायचे आहेत. त्यापैकी त्यांनी एक रुपयातरी खर्च केला आहे का?आपण त्याच्याकडे का लक्ष देत नाही? मासुंदा तलाव ठाणे शहराचे नाक आहे. आपल्या शहराच्या सौदर्यीकरणात भर टाकणारे सर्वांत मोठा तलाव आहे. आणितो ही आपण २५ वर्षासयाठी भाडयाने दिलेला आहे आणि त्यावर त्यांनी काही कोटी रुपये खर्च करायचे आहेत. त्याच्यावर आपणच करोडो रुपये खर्च करतोय. आणि परत आता आपण मासुंदा तलावाचे पर्यावरणीय दृष्टया संवर्धन करणे यासाठी त्याच्यावर आपण अजून खर्च करतोय. ही कामे आपण ज्या ठेकेदाराला तो तलाव दिला त्याच्याकडून का करुन घेत नाही? मा.आयुक्त महोदय, तलावाच्याबाबतीत आपण चौकशी करावी आणि त्यांची ॲग्रीमेंट तपासून पहावीत. ॲग्रीमेटमध्ये कोणी किती खर्च किती वर्षात करायचा आहे ते दिलेले आहे. पण माझ्या माहितीप्रमाणे कोणीही एक रुपया खर्च करत नाही. जो काही खर्च करतो तो आपणच करतो.

मा.महापौर महोदय, आपण स्मशानभूमी सुधारणेसाठी २.५० कोटी रुपये ठेवलेले आहेत. ही फार चांगली बाब आहे कारण मुंबईमध्ये आपण पाहिलेतर काही स्मशानभूमीमध्ये लोक फिरायला येतात. एवढया दर्जेदार आणि सुंदर स्मशानभूमी आहेत. आपल्याकडे वागळेइस्टेट भागात मा.आमदार श्री.एकनाथ शिंदे साहेब हयांच्या आमदार निधीतून अतिशय चांगली अशी स्मशान भूमी तयार झालेली आहे. परंतू आपल्या जेवढया स्मशानभूमी आहेत त्या स्मशानभूमीमधून जो धूर निघतो तो बाहेर जाण्यासाठी आपण धुरांडे बसवित नाहीत. मुंबई महापालिका हद्दीतील प्रत्येक स्मशानभूमीमध्ये धुरांडे बसविले आहेत. त्यामुळे त्या विभागाला किंवा तिथे राहणा-या नागरिकांना त्यामुळे प्रदुषण होत नाही.मा.आयुक्त महोदय, आपल्याला विनंती आहे की, आपण त्यासाठी २.५० कोटी रुपये खर्च करणार आहोत. त्यापैकी जास्तीत जास्त खर्च धुरांडावर करावा की, ज्यामुळे प्रदुषण कमी होईल.नागरिकांच्या आरोग्याला त्रास होणार नाही.

मा.महापौर महोदय, आपण उद्यानांसाठी ७.५ कोटी रुपये खर्च करतोय. ही चांगली गोष्ट आहे. परंतू आपण जेवढा खर्च करतोय त्या मानाने आपली उदयाने आणि चौक सुशोभित नाहीत. याचे कारण आपण काम करतो आणि त्यानंतर तिकडे पाहत नाही. यबाबत माझी विनंती आहे की, आपण एखादे उद्यान बनविले की, कायम त्यावर आपले लक्ष राहिले पाहिजे. त्यासाठी आपण सुरक्षा व्यवस्था पुरविणे गरजेचे

आहे. माझ्या प्रभागात हाजूरी येथील उद्यानाचा अर्धा भाग अजून तयार व्हायचा आहे. त्याची देखभाल आणि सुरक्षेसाठी खर्च वाढवून मिळावा ही विनंती.

मा.महापौर महोदय, आपल्या हद्दीत अनेक खाजगी सोसायटया  आहेत. खाजगी सोसायटीवाले त्यांचा टॅक्स व पाणी बील वेळेवर व जास्त भरतात. परंतू आपल्या महापालिकेतर्फे  आपण त्यांना कुठल्याच सोई-सुविधा देत नाहीत. फक्त त्यांना त्यांच्या गेट बाहेर रस्ता आणि रस्त्यावर दिवाबत्ती  देतो. माझी आपल्याला विनंती आहे की, आता दिवसेंदिवस आपल्याकडे पाणी कमी होत जाणार आहे. आणि लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे सोसायटीच्या प्रत्येक विंगला महापालिकेतर्फे कुपनलिका खोदून देण्यास विनंती आहे. जेणेकरुन पिण्याचे पाण्याचा इतर ठिकाणी वापर  कमी होईल. सोसायटीची लोकसंख्या जेवढी आहे तेवढे पिण्याचे पाणी तुम्हाला
देण्यांत येईल उर्वरित पाणी तुम्ही कुपनलिकेमधून घ्यावे. आणि सोसायटीची छोटी-छोटी कामे करण्यास परवागनी दयावी ही विनती.

मा. महापौर महोदय, जकात विभागाबाबत बोलायचे राहिल. मा.उपआयुक्त श्री. भट साहेब यांचे मी या ठिकाणी मनापासून अभिनंदन करतोय कारण ते आल्यापासून आपल्या जकातीच्या उत्पन्नामध्ये वाढ झालेली आहे. आपल्यापैकी काहीजण त्यांच्यावर नाराज असतील पण मी मात्र मनापासून खुष आहे. आमच्याकडे काही लोक जकात वाचविण्यासाठी मदत मागायला येतात पण भट साहेब सांगतात आधी पैसे भरुन घ्या मग मदत करा आणि मला वाटते ते बरोबर आहे .

मा.महापौर महोदय, बजेटबाबत बरेचसे सदस्य बोलले आहेत. मला वाटले तेवढे बोललो आहे. त्याचा योग्य तो विचार व्हावा हि विनंती. धन्यवाद.. ..जयहिंद जय महाराष्ट्र. ..

**श्री. अनिल सावे :-**

मा.महापौर महोदय, अर्थसंकल्पाच्या पान क्र. ११० वर योजने अंतर्गत सन १०८५मध्ये पाईप लाईन टाकलेली आहे. प्रिटींग चूक झालेली आहे. तरी ती दुरुस्त करुन घ्यावी.

**श्री. रमाकांत मढवी :-**

मा.महापौर महोदय, सन २०१०-२०११चा मुळ अर्थसंकल्प तसेच शिक्षणमंडळ आणि परिवहन सेवेचा अर्थसंकल्पावर गेले दोन दिवस चर्चा चालू आहे. तुमच्या परवानगीने मी या ठिकाणी बोलाण्यासाठी उभा आहे. मागील दोन वर्षात जो अर्थसंकल्प सादर झाला त्याला वेगवेगळी नांवे देण्यांत आली. कधी हरीत अर्थसंकल्प तर कधी व्हीजन २०३० अशी नांवे अर्थसंकल्पाला देण्यांत आली. यावर्षीचा अर्थसंकल्प मा.स्थायी समिती सदस्य, मा.महापौर, मा.आयुक्त आणि मा.स्थायी समिती सभापती तो ठाणे शहरातील सर्व नागरिकांच्या दृष्टीने विचार करुन बनविण्यात आला आहे. अर्थसंकल्पावर चर्चा करते वेळी जमेची बाजू अत्यंत महत्वाची आहे. जर जमा असेल तरच आपण खर्च करु शकतो.

यावर्षीचा आपला अर्थसंकल्प १३४९ कोटीचा आहे. आपले उत्पन्नाचे स्त्रोत असलेल्या जकात विभागाची मागणी ४०५ कोटी होती. आणि सुधारीतमध्ये आपण ३८५ कोटीचा इष्टांक आपण गाठू शकलो होतो. यावर्षी ४२५ कोटी जकातीपोटी उत्पन्न अपेक्षित धरलेले आहे. मागील वर्षाचा आढावा घेता अनेक कारणाने आपण जकातीची उद्दिष्ट अतिशय मेहनत घेऊन ३८५ कोटीपर्यंत पोहचलो आहोत.याबाबत आपल्या अधिकारी आणि कर्मचा-यांचे कौतुक करणे आवश्यक आहे. परंतू हे करत असताना जकातीच्या उत्पन्नामध्ये आपण अजूनही भरारी घेऊ शकतो. कारण जकात चोरी,जकात गळती योग्य प्रकारे जकात न आकारणे याबाबी प्रर्कषाने जाणवत आहेत. याचबरोबर याला पुरक असणा-या बाबी म्हणजे जकात नाक्यांचे आधुनिकीकरण संगणकीकरण, अपुरा कर्मचारी वर्ग, व कर्मचा-यांच्या शिफटमध्ये अनियमितता इत्यादी

करणामुळे माझ्या माहिती प्रमाणे अंदाजे १५% जकातीच्या उत्पन्नापासून आपण वंचित राहतो. उदा.जकात नाक्यांवर स्कॅनर बसविणे, म्हणजे माल घेऊन जाणा-या गाडयांचे स्कॅनिंग होऊन योग्य ती जकात भरुनच गाडी महापालिका हद्दीत प्रवेश करेल. तसेच जकात नाक्यावर व्हायरलेस सेट बसवून स्कॉड भरुन जाणा-या गाडया महापालिकेच्या हद्दीबाहेर ठराविक वेळेत गेल्या नसतील तर व्हायरलेस सेटवर संपर्क साधून संबधित गाडयांच्या मालकांवर दंड आकारुन त्यांच्याकडून जकात वसूली करता येईल. तसेच ट्रान्सपोर्ट कंपनी आणि जकात विभाग यांचे साटेलोटे काही प्रमाणांत असल्यामुळे आपण ब-याच उत्पन्ना पासून वंचित राहत आहोत. सगळयात महत्वाचा मुद्दा म्हणजे उदयाच्या १ एप्रिल पासून "ड" वर्ग महापालिकांची जकात बंद केलेली आहे. आणि भविष्यात "क " वर्ग महापालिका म्हणजे आपल्याही महापालिकेवर ते संकट येऊ शकते. येणा-या वर्षभरात आपले जकातीचे उत्पन्न बंद झाले तर आता आपले ३८५ कोटीचे असलेले उद्दिष्ट एवढेच शासनाकडून अनुदान आपल्याला अपेक्षित ठेवता येईल. तसा निर्णय होण्यापूर्वी जर आपण जकातीच्या खाजगीकरण करुन आपल्याला सन २०१०-२०११ च्या अर्थसंकल्पात असलेले उद्दिष्टाच्या बदल्यात ५००-५२५ कोटी रुपये उत्पन्न खाजगीकरणाच्या माध्यमातून कोणी आपल्याला देत असेल तर तसे केले आणि भविष्यात जर जकात बंद झाली तर आपण शासनाकडून ५०० ते ६०० कोटी अनुदानाच्या स्वरुपात घेऊ शकतो.

मा.महापौर महोदय, जकातीच्या व्यतिरिक्त आपले उत्पन्नाचे स्त्रोत मालमत्ता कर आहे. आपले मागील वर्षाचे उद्दिष्ट १६४ कोटीचे होते. ४ कोटीची त्यात भर पडली आणि १६८ कोटीचे उत्पन्न आपण वसूल करु शकलो. परंतू आपण अजून २०% मालमत्ता करात वाढ करु शकतो. काही झोपडया सरकारी आणि वन खात्याच्या जमिनीवर असल्याने आपण त्यांना कर आकारणी करत नाही. ती करणे गरजेचे आहे. त्या व्यतिरीक्त एखादी इमारत उभी राहिल्यानंतर त्या इमारतीत सर्व रहिवाशी रहायला आल्याशिवाय आपण त्या इमारतीला कर आकारणी करत नाही. त्यामुळे आपल्या उत्पन्नाचे नुकसान होते. त्या व्यतिरिक्त एखादया इमारतीत ५०% रहिवाशी रहायला आले आणि ५०% सदनिका जर रिकाम्या असतील मात्र जे रहिवाशी रहायला आले आहेत त्यांच्या सदनिकांना कर आकारणी करावी आणि ज्या सदनिका रिकाम्या आहेत त्या सदनिकांना संबंधित बिलडरच्या नांवाने कर आकारणी केली तर आपल्या उत्पन्नात नक्की भर पडेल. दुसरे म्हणजे जोपर्यंत नागरिक आपल्याकडे कर आकारणीसाठी अर्ज करत नाहीत किंवा तशी मागणी करत नाहीत तोपर्यंत आपण कर आकरणी करत नाही. त्या व्यतिरिक्त महापालिका क्षेत्रात जी वास्तू किंवा इमारत उभी राहिल, नागरिक आपल्याकडे येण्यापेक्षा आपल्या मालमत्ता कर विभागाच्या कर्मचा-यांनी त्या ठिकाणी मोजणी करुन त्या बांधकामाला मालमत्ता कराची आकारणी केली तर जो चार-पाच वर्ष आपला कर बुडतो तो न बुडता आपल्या करात नक्कीच अपेक्षित वाढ होईल आणि एकूण सर्व दृष्टीने विचार केलातर, मालमत्ता करात २०% वाढ होऊ शकेल.

मा.महापौर महोदय, माझ्या प्रभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर १९९० सालापर्यंत दिवा विभागातील दातिवली आणि आगासन ही दोन उप विभाग कार्यालये कार्यान्वित होती. नागरिक तिथे मालमत्ता कर पाणीपट्टी भरण्यासाठी जात होते आणि आपल्या तक्रारी देखिल नोंदवित होते. पण सन १९९० नंतर सदर उप विभाग कार्यालये बंद करण्यांत आली आणि पाच किलोमीटर लांब उपनगरीय रेल्वे आणि कोकण रेल्वेचे असे मिळून एकूण १२ रेल्वे रुळ ओलांडून जीवघेणा प्रवास करुन त्यांना टॅक्स-पाणी भरण्यासाठी जावे लागते. एखादया जुन्या घराला २५/- रुपये कर आकारणी असेल तर त्याला २५/- रुपये रिक्षासाठी खर्च करावे लागतो. त्यामुळे सदर नागरिक कर भरायला जाण्यास टाळा-टाळ करतो. त्यामु आपल्या मालमत्ता कराचे नुकसान होते. तरी मध्यवर्ती ठिकाणी पुन्हा उप विभाग कार्यालये

कार्यान्वित करावीत. जेणेकरुन नागरिकांचाजीव धोक्यात येणार नाही आणि आपली मालमत्ता कराची वसूली वेळेवर होऊ वसूलीत वाढ होऊ शकेल.

मागील वर्षी आपण ८० कोटी पाणीपट्टीचे उद्दिष्ट अपेक्षित धरले होते पण फक्त ६५ कोटीचे उत्पन्न आपण गाठू शकलो आहोत. त्याला मुख्य कारण म्हणजे पाणीपट्टी आकरणीबाबत प्रभावीपणे कारवाई न झाल्यामुळे,तसेच पाण्याची गळती, पाण्याची चोरी, यामुळे नागरिक, प्रशासन, नागरिक व लोकप्रतिनिधी हे तीघेही हैराण आहेत. त्यामुळे पाणीपट्टी आकारणीबाबत न बोललेले बरे. माझ्या माहितीप्रमाणे ठाणे महापालिका हद्दीतील ब-याच भागांना पाण्याची वसूली करण्यांत आलेली नाही. याबाबत संबंधित अधिकारी काय करतात किंवा त्यांची मानसिकता काय आहे? याबाबत न बोललेले बरे. आपण कर वसुली व पाणीपट्टी वसूली एकत्रितपणे करण्याचे मागील बोर्डात ठरविले.जेणेकरुन कर्मचारी वर्ग व स्टेशनरी कमी लागेल. असा त्याचा उद्देश होता. परंतू याबाबतीत आपण यशस्वी ठरलो नाही. तरी पाणीपट्टी वसूली योग्य पध्दतीने होण्यासाठी येत्या दोन महिन्यात संपूर्ण ठाणे शहरातील सर्व्हे करुन उदा. एखादया सदनिकेमध्ये ४० कुटूंब राहत असतील आणि सदर इमारत उभी करते वेळी संबंधित बिल्डरने चोरीचे कनेक्शन घेऊन बिल्डींग उभी केली आहे. आणि नंतर त्या इमारतीत सुरुवातीला जे दहा लोक रहायला आले त्या दहा लोकांच्या नांवावर अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करुन घेतली आहे.आणि ती इमारती संपूर्ण भरल्यानंतर आता चार-पाच वर्षात एकूण ४० सदनिकाधारक त्या कनेक्शनमधून पाण्याचा वापर करत आहेत. मात्र आपल्याकडे फक्त १० लोकांचे रेकॉर्ड आहे. आणि आपण दहा लोकानांच पाणीपट्टीची आकारणी करतो.तीस सदनिकाधारक मोफत किंवा आपल्या चुकीच्या पध्दतीने पाण्याचा वापर होत आहे आणि आपल्या पाणीपट्टीच्या वसूलीत घट होत आहे. तसेच झोपडपट्टी व इमारतीमधील अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करणेबाबत आपण जे पाऊल उचलले आहे. त्याची अंमलबजावणी प्रामाणिकपणे होणे गरजेची आहे असे मला वाटते. परंतू सदर अंमलबजावणी झाल्यांनतर पाणी चोरीबाबत कठोर भुमिका घेणे गरजेचे आहे. संबंधित पाणी चोरी करणारे विकासक व प्लंबर यांच्यावर अजामिनपत्र गुन्हा दाखल केल्याशिवाय पाणी चोरीस आळा बसणार नाही. तसेच इतर महापालिकांना एम.आय.डी.सी.कडून ७/-रुपये दराने पाणी पुरवठा केला जातो. मात्र आपल्याला हेच पाणी ८/- रुपये दराने दिले जाते. या मागे काय कारण आहे याचा खुलासा होणे गरजेचे आहे. व पाण्याबाबत इतर महापालिका व आपली महापालिका याचा पाणी दरामध्ये समानता असणे आवश्यक आहे. याबाबत आवश्यक ती कार्यवाही व्हावी.

मा.महापौर महोदय, ठाणे शहरात असलेल्या व्यवसायिक गाळयांचे संख्या आणि प्रत्यक्ष आपल्या परवाना विभागात नोंदणी करुन व्यवसाय करणा-या गाळयांची संख्या यामध्ये खूप मोठी तफावत आहे. त्यामुळे आपल्या उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नाही. अपु-या कर्मचारी वर्गामुळे ६०% गाळेधारकांची नोंदणी झालेली नसल्यामुळे आपला महसूल बुडत आहे. याला जबाबदार कोण आहे? याचाही खुलासा होणे गरजेचे आहे. यावर उपाय म्हणून एखादया संस्थेच्या माध्यमातून ठाणे शहरातील व्यवसायिक गाळयांचे सर्व्हेक्षण करुन सदर गाळेधारकांकडून नोंदणी फी द्वारे उत्पन्न होणा-या रक्कमेतून सदर संस्थेंस नाममात्र रक्कम देऊन आपल्या उत्पन्नात वाढ व आस्थापना खर्चात कपात करुन आपण आपले उत्पन्न काही प्रमाणात वाढवू शकतो.

**स्थावर मालमत्ता विभाग** -आपल्या स्थावर मालमत्ता विभागाकडून मिळणारे उत्पन्न आणि "ड " वर्ग महानगरपालिका यांचे स्थावर मालमत्ता विभागाकडून मिळणारे उत्पन्न यांची तुलना केली असता, "ड" " वर्ग असलेल्या महापालिका आपल्या महापालिकेच्या उत्पन्नापेक्षा उजव्या ठरत आहेत. याचा अर्थ आपला स्थावर मालमत्ता विभाग सक्षम करण्याची गरज आहे. तसेच ठाणे नगरपालिका व ग्रामिण भाग मिळून

निर्माण झालेल्या ठाणे महापालिकेत समाविष्ट झाल्यानंतर देखिल सदर प्राधिकरणाच्या ज्या वास्तू होत्या त्या आजही ग्रामपंचायत किंवा इतर प्राधिकरणांच्या नांवे आहेत. उदा.दयायचे झाले तर शाळा, ग्रामपंचायतीचे कार्यालय, ग्रुप ग्रामपंचायतीच्या नांवे नोंद असलेल्या सातबारा आजही ग्रामपंचायतीच्या नांवे आहे. आज २८ वर्षानतर देखिल आपल्याला आपली मालमत्ता आपल्या नांवावर करुन घेण्यास अपयश आलेले आहे. म्हणजे आपल्या उत्पन्नात वाढ न करु शकलेले स्थांवर मालमत्ता विभाग हे एकमेव उदाहरण आहे.

मा.महापौर महोदय, ठाणे महानगरपालिका हद्दीत असलेल्या खाजगी सोसायटयांच्या आवारात आपण कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देत नाही. परंतू सदरहू नागरिक सातत्याने आपल्याकडे कर भरणा करत आहेत. याबाबत माझे असे मत आहे की, गेले दहा वर्ष सतत जे नागरिक विना खंडीत मालमत्ता कर व पाणीपट्टी कर भरत आहेत अशा सोसायटयांना सुविधा देण्या संदर्भात प्राधान्यक्रमाने विचार करण्यास हरकत नाही.

ठाणे महापालिका हद्दीमध्ये विविध कारणांसाठी सातत्याने रस्ता फोड करण्यांत येते. विविध संस्था/कंपन्या ठाणे महापालिका हद्दीत कार्यान्वित आहेत. यांच्याकडून आपण योग्य ती फी आकारत असतो. परंतू आपल्याकडून संबधित कंपन्या चार रस्त्यांची परवागनी घेतात आणि प्रत्यक्षात दहा रस्ते खोदाई करुन आपले काम करुन घेतात. त्यामुळे आपल्या उत्पन्नात तूट होऊन त्याउलट उर्वरित सहा रस्त्यांचे चर भरण्याचे कामास आपल्याला आपला निधी विनाकारण वापरावा लागतो. तरी यावर योग्य तो अंकूश ठेवण्यासाठी आपल्या महापालिकेच्या सार्व.बांधकाम विभाग, शहर विकास विभाग व परवानगी देणारे इतर विभाग .यांचा परस्परांशी समन्वय असणे आवश्यक आहे. तसेच शासनाकडून आपल्याला काही अनुदाने येत असतात. त्यानुसार आपण अर्थसंकल्पात तरतूद करत असता.परंतू यासाठी आवश्यक असलेला पाठपुरावा होत नसल्याने आपल्याला योग्य वेळेत अनुदान मिळत नाही. आणि अशाच कारणामुळे सन २००९-२०१० चा १४६५ कोटीचा असलेला अर्थसंकल्प ११५९ कोटीवर येतो व सन २०१०-२०११ च्या अर्थसंकल्पाला आपल्याला १३५० कोटीपासून मांडणी करावी लागते. तसेच महापालिकेला अनुदान मिळवून देण्यासाठी सबंधित खात्याकडे सातत्याने पाठपुरावा व्हावा. यासाठी सक्षम अधिका-याची नेमणूक होणे अत्यंत गरजेचे आहे. तरच आपण अर्थसंकल्पात उद्दिष्ट गाठू शकतो. त्याचबरोबर महापालिका क्षेत्रात आवश्यक असलेले प्रकल्प राबविण्याकरीता शासनाच्या विविध खात्यांची परवानगी लागते त्यासाठी पाठपुरावा करणे आवश्यक असते. पण आपल्या महपालिकेतील अधिकारी कोणत्याही खात्यात पाठपुरवा करत नाही. त्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करुन अधिकारी नेमण्यांत यावा जेणेकरुन प्रस्ताव मंजूरीप्रमाणे आणि ठरलेल्या दरात आणि वेळेत पूर्ण होतील. वाढीव खर्च मंजूरीची आवश्यकता भासणार नाही. सन २००८-०९ व सन २००९-२०१० या अर्थसंकल्पात ग्रामिण भागात विशेष कामे करण्यांत येतील असे आश्वासन मा.आयुक्तांच्या भाषणात दिले होते. परतू या सर्व बाबी कागदावरच राहिल्या. ग्रामिण भागात दवाखाने अग्निशमन केंद्र,शाळा किमान डांबरी रस्ते आरओबी अशा सुविधा देण्याचे स्वप्न येथील नागरिकांना दिले होते परंतू ते स्वप्न हे स्वप्नच राहिले असे वाटते.

मा.महापौर महोदय, मी आपणास विंनती करणार आहे की, रस्त्याच्या बीएमएसी डांबरी ट्रीटमेंटसाठी मागील महिन्यात झालेल्या टेंडर व्यतिरिक्त दिवा विभागातील रस्त्यांना ३.५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. या अर्थसंकलपात ती तरतूद होणे गरजेचे आहे. जेणेकरुन नागरिकांना किमान चालण्यासाठी रस्ते उपलब्ध होतील व आपण महापालिकेत समाविष्ट असल्याचा त्यांना समाधान प्राप्त होईल. ठाणे शहराच्या गल्ली बोळयात अनावश्यक ठिकाणी दोन-दोन, तीन-तीन मीटर रुंदीचे रस्ते कॉंक्रीटीकरण होत असताना दिवा स्टेशनचा मुख्य रस्ता ते साबेगांव हा एकमेव रस्ता कॉक्रीटीकरण होणे

गरजेचे आहे. तसेच आपतकालीन व्यवस्थापनाचे पुस्तक छापताना २६ जुलै २००५चा फोटो छापून दिव्याबाबत दिशाभूल करुन आपले उद्दिष्ट साध्य करुन घेण्यात आले. मात्र स्ट्रॅंग वॉटर ड्रेनेज सिस्टीमच्या माध्यमातून उप नाले व गटारे ज्यांच्या माध्यमातून लोकवस्तीतून मुख्य नाल्यापर्यंत सांडपाण्याचा निचरा होऊ शकेल व दिवा वासियांचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून गेल्या तीन वर्षापासून बनवून तयार असलेला सदर प्रस्ताव निधी अभावी एका कोप-यात टाकून दिलेला आहे. विशेष म्हणजे २८ वर्षात रस्त्यालगत गटार नसलेला भाग हा महापालिकेत समाविष्ट आहे.व गावठाणामधील गटार दुरुस्ती करण्यास व गटार बांधण्यास निधी उपलब्ध नाही याबाबीवर चर्चा करण्यास व नागरिकांना उत्तरे देताना महापालिकेचा विश्वस्त म्हणून मला वाईट वाटत असून प्रशासन त्याकडे लक्ष देत नाही म्हणजे प्रशासनाला ते भूषणावह वाटत असेल.

मा.महापौर महोदय, ठाणे शहरात पटसंख्ये अभावी आपल्या शाळा ओस पडत आहेत. तरी देखिल शाळेच्या मोठ मोठया वास्तू उभारण्यांत प्रशासन मग्न आहे. याउलट ग्रामीण भागात पटसंख्या वाढत असून तिथे जागे अभावी एका वर्षात दोन इयत्तेचे शिक्षण एकत्र दिले जाते. जिल्हा परिषदेच्या जागा उपलब्ध असून देखिल शहरात इतर ठिकाणी कायदयाचे उल्लंघन होत असताना देखिल ग्रामिण भागात मात्र देखिल विदयार्थ्यांना सी.आर.झेड किंवा इतर शासकिय कारणे सांगून या विद्यार्थ्यांना कोंबडयांच्या खुराडयात शिक्षण घेण्यास आपण भाग पाडत आहोत. या अर्थसंकल्पीय वर्षात दातिवली व साबे येथे शाळा इमारती बाधण्याची तरतूद करावी. किंवा महापालिकेच्या आवारात ग्रामिण भागातील विदयार्थ्यांचे वर्ग भरविण्याची माझी मागणी पूर्ण करावी.तसेच ठाणे महापालिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपण ज्या वस्तू देत असतो त्या वस्तूंचे वाटप शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच करावे. जेणेकरुन त्या योग्य वेळी मिळाल्याने त्याचा वापर होईल. आणि आपण ज्या उद्दिष्टासाठी जी तरतूद ठेवली आहे ते उद्दिष्ट साध्य झाल्याचे समाधान होईल. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत प्रत्येक शिक्षकासाठी शासनाकडून दहा हजार रुपयांचे अनुदान प्राप्त होते. आपण सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत दहा हजाराचे अनुदान घेऊन शिक्षक नेमले तर तरुणांसाठी नोकरीची संधी उपलब्ध होईल. परंतू आपल्या शिक्षण मंडळामध्ये त्या शिक्षकांची भरती करण्या ऐवजी आपल्या आस्थापनेवर जे शिक्षक आहेत त्यांना सर्व शिक्षा अभियानासाठी वापरले जाते आपण ते अनुदानही घेत नाही आणि ठाणे शहरातील तरुणांना नोकरीच्या संधीपासून वंचित ठेवतोय. तरी कृपया पुढच्या वर्षापासून प्रती शिक्षकासाठी दहा हजार अनुदान आहे त्याचा आपण स्विकार करावा आणि जेणेकरुन आपल्या खर्चात कपात होईल आणि शिक्षकांची संख्या वाढल्याने सध्या जे एका शिक्षकाला दोन-दोन वर्ग शिकवावे लागतेय त्याऐवजी अतिरिक्त शिक्षक आपल्याला लाभल्याने आपल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढेल.

मा.महापौर महोदय, पदपथावरील दिव्यांबाबत बोलताना, शहरातील चांगल्या अवस्थेतील पथ दिवे काढून नविन अधुनिक दिवे बसविले जात असताना,दिवा विभागातील मुख्य रस्त्यांवर मात्र प्रशासनाला अभिमान वाटावा असे आडवे झालेले वीस वर्षापूर्वी बसविलेले गंजलेले, दुरावस्था झालेले विजेचे पोल दिवा विभागातील रस्त्यावर प्रशासनाचे नावलौलिक वाढवित आहेत. या विभागातील पदपथावरील दिव्यांचे फोटो कुठल्यातरी पुरस्कारासाठी पाठवावेत जेणेकरुन आपल्याला अधिक निधी उपलब्ध होईल.

मा.महापौर महोदय, मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातील १४ गांवे मानपाडा-घोडबंदर विभागातील १२ ते १५ गांवे यांना आरोग्य सेवा देण्यासाठी वार्षिक एक कोटी रुपयांचे तरतूद करण्यांत यावी. याद्वारे मोबाईल दवाखाना दररोज या विभागात पाठविणेत यावा. जेथे आवश्यक असलेली तपासणी,एक्सरे,रक्त तपासणी खाजगी माध्यमातून किंवा निविदा प्रक्रिया करुन या सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यातअशी मी आपल्याकडे

मागणी करीत आहे. विविध नागरी सुविधांसाठी संपादित केलेल्या जमिनी उदा. रस्त्यांसाठी बाधित शेतक-यांना त्याचा मोबदला शहर विकास विभागाकडून आज २३ वर्षानंतरही देण्यात आलेला नाही. त्यामुळे शेतक-यांमध्ये आपल्या जमिनी महापालिकेने हडप केल्याची भंवना निर्माण झालेली आहे. मात्र आपला शहर विकास विकास विभाग ग्रामिण भागातील विकासासाठी कोणताही प्रकल्प किंवा कोणतीही जमिन मोकळी करण्याचा त्यांचा मनोदय नसतो आणि शेतक-यानाही मोबदला देऊ इच्छित नाहीत. ते फक्त स्वतःच्या विकासाचा विचार करतात. म्हणून या शहर विकास विभागाला शहर विकास विभाग न म्हणता विकासक विकास खाते असे म्हणावे अशी मी आपणांस विनंती करतो.

मा.महापौर महोदय, ठाणे महापालिका हद्दीतून दररोज ६५० टन घनकच-याची निर्माण होतो.पण घनकच-याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्थं मात्र आपल्या शहरात नाही. सन १९९२ पासून आजपर्यंत माझ्या प्रभागाच्या सिमेवर ठाणे शहरात निर्माण झालेला कचरा आणून टाकला जातो. ज्यामुळे प्रभागातील नागरिकांना दुर्गंधी व घनकच-याच्या आगीच्या धूरामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत प्रशासनाकडून होणारे दुर्लक्ष दिवा विभागातील नागरिकांची झालेली अवस्था बघता आपण भविष्यात जो डायघर येथील प्रकल्प कार्यान्वित करण्याची स्वप्न बघतोय. दिव्यातील नागरिकांची जी अवस्था तुम्ही करुन ठेवली आहे ते पाहता डायघरच्या नागरिकांची घनकचरा प्रकल्प राबविण्यासाठी त्यांची मानसिकता तयार होईल असे मला वाटत नाही कारण की, अनधिकृतरित्या जिथे आपण डंपिंग करतोय त्यांची जी बिकट अवस्था करुन ठेवली आहे. ते टायफाईड,मलेरिया आणि निमोनिया सारख्या आजाराचे प्रकार वाढत आहे. पण दिव्यातील लोक तुमचा ६५० टन कचरा निमुटपणे सहन करत आहेत परंतू त्यांच्या आरोग्याकडे आपण दुर्लक्ष करतोय. दवाखाने बांधण्यासाठी आपण वेगवेगळी कारणे सांगतोय.

ठाणे महापालिकेने ठाण्यातून दिव्याला जाण्यासाठी स्वतःचा हक्काचा किमान एक तरी रस्ता २८ वर्षात तयार करायला हवा होता तो बनविला नाही. तरी मा.महापौर महोदय, आपल्या कारर्किदीत नक्की तो रस्ता होईल असा मला विश्वास वाटतो.

तसेच शहरात वाढलेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी आपण कणखर भुमिका घेऊन आपल्या प्रतिमेला साजेसे काम केले. तसे सन १९८२ पासून ते आजपर्यंत हेतुपुरस्सर दिवा विभागाला विकासापासून वंचित ठेवण्याची मोहिम प्रशासनाकडून आखली गेली होती. तिला कुठेतरी खंडीत करुन दिव्याच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले रस्ते,गटार, पद दिवे,शाळा या सारख्या मुलभूत गरजा पुरविण्यास जर आपण यशस्वी ठरलात तर दिवा विभागातील जनता आपल्या नांवाने बोटे मोडण्याऐवजी आपली प्रशंसा करेल व आपणासही समाधान प्राप्त होईल.

तसेच अविकसित गांव विकास योजने अंतर्गत माझ्या प्रभागासाठी सन २००९-२०१० साली जो निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. तो १२ मार्च २०२० रोजी उपलब ध करुन देण्यात आला आहे. माझ्या प्रस्तावांवर बजेटची नोंद २३ मार्च २०१० रोजी झाली आहे. म्हणजे माझे प्रस्ताव तयार असून देखिल बजेट प्रशासनाकडून उपलब्ध करुन दिले नव्हते म्हणून या आर्थिक वर्षात माझे प्रस्ताव पूर्ण होऊ शकणार नाहीत आणि पुढच्या. वर्षी ते स्पीलओव्हरमध्ये जाणार आहेत. तरी चालू वर्षी मला दिलेले जे बजेट होते ते पुढे चालू रहावे किंवा नविन हेड निर्माण करावा. जेणेकरुन माझ्या ग्रामिण भागातील नागरिकांवर अन्याय होणार नाही.

मा.महापौर महोदय, मी आपणास एक उदाहरण देतो. सन १९८६ साली ठाणे महापालिकेचा अर्थसंकल्प ५८ कोटीचा होता. आणि आता २००९ साली तो १४६९ कोटीचा होता. १९८६ ते २००९ या कालावधीत अंदाजे अकरा हजार ते बारा हजार कोटीचा अर्थसंकल्प आता पर्यंत झाला आहे. या

अकरा-बारा हजार कोटीच्या अर्थसंकल्पापैकी आस्थापनेवर ३३ ते ३५% खर्च झालेला आहे. उर्वरित अर्थसकल्पातील जी रक्कम होती ती काही प्रमाणात कमी-जास्त पण सगळया प्रभागात खर्च होणे अपेक्षित होते. मी घेतलेल्या माहितीप्रमाणे माझ्या प्रभागात सन १९८६ ते आजपर्यंत किमान ७५ कोटी रुपये खर्च होणे अपेक्षित होते. परंतू आजपर्यंत तिथे २५ कोटीही खर्च झालेले नाहीत. माझे भाषण मी थांबविण्यापूर्वी उदाहरण सांगेल की, एखादया जोडप्याला दोन मुल असतील आणि एक सावहा आणि दुसरा गोरा गोमटा असेल तर गो-या गोमटया मुलाला आपण शाळेच्या कालावधीत पॉकेटमनी आणि मोठा झालयावर फिरायलाजाण्यासाठी, पाटर्यासाठी पैसे, त्याच्यासाठी चिकन बिर्याणीची व्यवस्था करणार असाल आणि काळया-सावळया मुलाला वडापावही देणार नसाल तर आणि दुजाभंव करणार असाल तर त्यादुस-या मुलाच्या मनात आपलया बद्दल क्लेश निर्माण होतील. तरी जे झाले ते गंगेला मिळाले. तरी यापुढे तरी आपण समान न्याय दयाल आणि ग्रामिण भागाच्या विकासाला चालना दयाल. एवढी मी अपेक्षा ठेवतो आणि मी वरीलप्रमाणे केलेल्या सूचनांचा आदर करुन दिवा विभागाला योग्य न्याय दयाल अशी मी आशा बाळगतो. आणि मला दोन शब्द बोलण्याची संधी दिलीत त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो आणि या अर्थसंकल्पाला मी मंजूरी देतो. धन्यवाद. जयहिंद जय महाराष्ट्र..

**मा. महापौर :-**

सभेची वेळ एक तास वाढविण्यात येत आहे.

**सौ. वनिता इंदिसे :-**

मा.महापौर महोदय, मा.उप महापौर, मा.आयुक्त साहेब, मा.स्थायी समिती, सभापती मा.विरोधी.पक्षनेते मा.सभागृह नेते, सर्व सन्मा.नगरसेवक आणि नगरसेविका, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग, पत्रकार बंधू आणि भगिनींनो.

मा.महापौर महोदय, सन २००९-२०१०चा सुधारीत व सन २०१०-२०११ चा मुळ अर्थसंकल्पावर गेले दोन दिवस चर्चा चालू आहे. चर्चेमध्ये अनेक सन्मा.सदस्यांनी भाग घेतलेला आहे. मा.महापौर महोदय, अर्थसंकल्प म्हटला की, उत्पन्नात वाढ करावी हे सगळयांचे मत असते. त्याप्रमाणे अनेक सन्मा.सदस्यांनी ज्या प्रॉपर्टीला टॅक्स लागलेला नाही त्यांना टॅक्स लावून उत्पन्नात वाढ व्हायला पाहिजे आणि जी पाण्याची गळती आहे आणि १०-१५ वर्ष कनेक्शन घेऊन झाली आहेत तरी त्यांना पाण्याचे बिल जात नाही. माझ्या प्रभागातही ही परिस्थिती आहे. तरी अशा प्रत्येकांना पाण्याच्या बिलाची आकारणी करुन आपल्या उत्पन्ना वाढ व्हावी अशी सर्वांची इच्छा आहे आणि हया मताशी मी ही सहमत आहे. मा.महापौर महोदय, हे करत असताना आपण पाण्याचे बिल दिले म्हणजे प्रत्येकाला पाणी, प्रत्येक घरात पाणी जाईल हया गोष्टीकडेही आपण लक्ष दिले पाहिजे. परंतू पाणी खात्यामध्ये कर्मचारी वर्ग कमी कमी असल्यामुळे पाणी पुरवठा यंत्रणेच्या कामकाजावर परिणाम होत आहे.
म्हणून पाणी खात्यात कर्मचा-यांची वाढ करुन आपल्या उत्पन्नात कशी भर पडेल याकडे लक्ष यावे असे मला वाटते.

मा.महापौर महोदय, माझ्या प्रभागामध्ये बराचसा म्हाडाचा भाग येत आहे. कुठेही काम करायचे असेल तर म्हाडाचे अधिकारी हात वर करतात. म्हाडा कुठलेही काम करत नाही आणि ठाणे महापालिकेकडे म्हाडासाठी कुठलेही काम करायला बजेट नाही. अशा परिस्थितीत काही जीवघेणी कामे माझ्या प्रभागात आहेत. पाण्याच्या टाकीचा स्लॅब पूर्णपणे जीर्ण झालेला आहे. याबाबत मी तीन वर्षापासून मागणी करीत आहे. पंरतू आजतागायत म्हाडाचे हस्तांतरणही होत नाही आणि ही कामे करायला मला बजेटही मिळालेले नाही म्हणून ती कामे तशीच रेंगाळलेली आहेत. इमारत क्रमांक ५६गेल्या दोन वर्षापूर्वी खाली केली आहे. फक्त

११ कुटूंबांसाठी अति धोकादायक म्हणून घोषित झालेली इमारत आहे. ११ कुटूंबांसाठी ती इमारत आजही पाडण्यात येत नाही. प्रत्येक वेळी आम्हाला आठ दिवस-आठ दिवस असे सांगण्यात येते. तरी मा.आयुक्त साहेब, आपण याबाबत लक्ष घालून त्या ११ कुटूंबांचे पुर्नवसन करुन ती इमारत ताबडतोब पाडण्यात यावी आणि इमारत क्रमांक ५४,५५ आणि ५६ हया इमारती बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत घेतलेल्या आहेत आणि ५४,५५मध्ये संपूर्ण कुटूंब त्या ठिकाणी राहत आहेत. लोक राहतात म्हणून तिथे सुविधा पुरविणे आपले कर्तव्य आहे. त्यांच्या पाण्याच्या समस्येला वेळोवेळी तोंड दयावे लागते. रोज १००-१५० लोकांचा मोर्चा माझ्याकडे येतो. अश वेळी काय करायचे? मा. आयुक्त महोदय, म्हाडाचे लवकरांत लवकर हस्तांतरण करण्यांत यावे अशी मी विनंती करत आहे. आणि इमारत क्र.५४-५५ च्या ज्या पाण्याच्या लाईन आहेत त्याही २५-३० वर्षाच्या झालेल्या असल्याने आतून गंजलेल्या आहेत, आणि त्या ठिकाणी पाण्याचा प्रश्न नेहमीच उद्‌भवन असतो आणि त्याला नेहमी सामोरे जावे लागते. तरी हे काम कोणत्या निधीतून आणि कशाप्रकारे करायचे याबाबत आपण विचार करावा अशी मी विनंती करते.

मा.महापौर महोदय, माझ्या प्रभागामध्ये उन्नती गार्डन या ठिकाणी गेल्या वर्षी स्टेडीयम मंजूर झालेले आहे. परंतू एक वर्ष झाले आपला दुसरा अर्थसंकल्प मंजूर होण्यासाठी आपल्या समोर आला आहे. परंतू ती स्टेडीयमच्या फाईलबाबत कधी अधिकारी वर्ग टाळाटाळ करतात तर कधी आर्किटेक्ट नाहीत म्हणून टाळाटाळ होते.आणि अशाप्रकारे एक वर्षाचा कालावधी निघुन गेलेला आहे. एका मागासवर्गीय महिलेल्या प्रभागात एखादी चांगली वास्तू उभी करण्याची आपल्या अधिका-यांची इच्छ दिसत नाही असे माझे मत झालेले आहे. म्हणून मा.आयुक्त महोदय, याबाबत आपण स्वतः लक्ष घालावे कारण आजपर्यंत त्यांचे टेंडर निघालले नाही. तरी याबाबत आपण जातीने लक्ष घालून या कामाला प्राधान्य दयाल अशी अपेक्षा करते.

मा.महापौर महोदय, **U.T.W.T.** अंतर्गंत गेंल्या वर्षी रस्ते मंजूर झालेले आहेत आणि ते रस्ते करत असताना ड्रेनेज लाईनर वगैरे थांबलेल्या आहेत. एका वर्षाचा कालावधी तो ही निघुन गेलेला आहे. माझ्या प्रभागातही एक रस्ता मंजूर आहे आणि तो करीत असताना बाजूला जो छोटा रस्ता आहे तो त्यात अंतभूत करण्यांत यावा अशी मी विनंती करते.

लोकमान्यनगर येथे लोकमान्य हॉस्पीटल कोटयावधी रुपये खर्च करुन ती वाास्तू त्या ठिकाणी बांधून ठेवली आहे. परंतू त्या ठिकाणी आपण काय आरोग्य सेवा देतो तर फक्त ओ.पी.डी. चालवली जाते. जर ओ.पी.डी. चालू ठेवायची होती तर दोन-चार खोल्यांचे बांधकाम करुन आरोग्य केंद्र आपल्याला करता आले असते. कोटयावधी रुपये कशाला खर्च केले? स्टाफ कमी आहे हया नावाखाली ती वस्तू नुसती उभी केली आहे मात्र त्या ठिकाणी लोकांना आरोग्य सेवा मिळत नाही. म्हणून मा.महापौर महोदय,मा.आयुक्त साहेब आपण स्वतः जातीने लक्ष घालून त्या ठिकाणी स्टाफ कसा वाढवता येईल आणि ज्या विभागातील गोर-गरीब लोकांसाठी ती वास्तू उभारली आहे.. त्या लोकांना आरोग्य सेवा कशाप्रकारे देता येईल याकडे आपण लक्ष घालावे अशी विनंती करते.

मा.महापौर महोदय, वर्तकनगर नाका ते देवदयापर्यंत वाहतुक कोंडीमुळे संध्याकाही तासंतास उभे रहावे लागते. गाडया पुढे सरकत नाहीत. लोकाना जायला रस्ता उपलब्ध नसतो. तरी वर्तकनगर नाक्यावरओव्हर ब्रिज वगैरे बांधता येईल का? याबाबत मा.महापौर महोदय, मा.आयुक्त साहेब आपण लक्ष घालावे आणि लोकांची ती समस्या दुर करावी अशी मी विनंती करते.

मा.महापौर महोदयांसाठी आकस्मित निधी म्हणून एक कोटीची रक्कम ठेवण्यांत आली आहे. मा.महापौरांवर सर्वांच अधिकार आहे सर्वजण अपेक्षेने मा.महापौर साहेबांकडे बघणार आहेत आणि

प्रत्येकजण मागणी करणार आहेत आणि म्हणून मा.महापौरांच्या आकस्मित निधीमध्ये वाढ करावी अशी विनंती आहे.

मा.महापौर महोदय, मी आपला जास्त वेळ न घेता, सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करुन हा अर्थसंकल्प मंजूर करावा अशी मी विनंती करते आणि माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र .. .. ।

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, सन २०१०-२०११ चा मुळ अर्थसंकल्प सुटा-बुटात आपल्या समोर सादर होईल असे वाटले होते. परंतू यावर्षी हिंदु संस्कृतीला धरुन सादर करण्याचा प्रयत्न आमचे मित्र श्री. मिलींद पाटणाकर साहेबांनी केला.

झब्बा-लेंगा आणि घालून जाकेट अर्थसंकल्पाचे उघडले मिलींद रावांनी पाकिट.
सन २००९-२०१० व २०१०-२०११ च्या अर्थसंकल्पावर केले त्यांनी निवेदन.
आकस्मित निधीमध्ये ५०% मला कसे मिळतील याचे केले संशोधन.
१४ पानी निवेदनात माझा काही संबंध नव्हता मागील सभापतींनी बनविलेला अर्थसंकल्प मुळात माझाच नव्हता.
उपमहापौर, आयुक्त, सचिव व मागे सर्व अधिकारी, म्हणूनच आपण समजता स्वत:ला महापालिकेचे उत्तराधिकारी.
खरतर आम्ही बसलो असू आपल्या समोरील बाकावर म्हणूनतर ठाणे महानगरपालिकेची गाडी चालते चार चाकावर.
वक्तव्य करताना मन माझे नेहमीच साशंक असत शोधण्यात शब्दाचे नवीन अर्थ अविचारात गर्क असत.
अर्थसंकल्प झाला अंदाजे १३३९ कोटीचा त्यात मोठा वाटा आहे तरबेज चतुर आयुक्त नंदकुमार जत्रे साहेबांचा
महापौर असोत पदाधिकारी नगरसेवक असोत किंवा पत्रकार किंवा असोत दक्ष नागरिक
सर्वांशी नम्रतेने वागून सर्वांशी संबंध ठेवून सर्वांची नाडी जाणून ठरले आहात उत्तम प्रशासक.
प्रत्येक जण याचक म्हणून आला त्याची हर एक मागणी मी पूर्ण केली माझ्या स्वभावाचा त्यात काय दोष सर्वांनी मिळून मला कर्ण केल.
महापौर साहेब आपण संख्येने असाल जास्त म्हणून असाल सत्ताधारी परंतू एक लक्षात ठेवा निंदकाचे घर असावे शेजारी.

मा.महापौर महोदय, हा झाला विरंगुळा अर्थसंकल्पामध्ये तो हवाच असतो. कारण सन्मा.सदस्य श्री. अनिल सावे यांच्या भाषणानंतर मध्ये बराच वेळ भाषण थोडी टेन्समध्ये झालेली आहेत. आतापर्यंत या ठिकाणी अर्थसंकल्पावरील जी भाषण ऐकली त्यावरुन असे वाटते की, आपण प्रभाग समित्या निर्माण का केल्या? कारण आपला प्रभाग समिती निर्माण करण्याचा जो उद्देश होता तो उद्देश मुळात आपला या ठिकाणी साध्य होत नाही. प्रभागामध्ये लहानसहान कटकट-कुरबुरी ज्यांना म्हणतात त्या सुध्दा या ठिकाणी मुख्यालयात येणार असल्या तर मग या महासभेचे स्वरुप काय असावे आणि अर्थसंकल्पावर काय चर्चा व्हावी? याबाबत पुन्हा एकदा चर्चा करणे गरजेचे आहे. मा.सभागृह नेते आणि या ठिकाणी उपस्थित असलेले इतर जेष्ठ नगरसेवक यांनी व यापूर्वी या सभागृहात असलेले द्वारकानाथ पवार, वसंत डावखरे, प्रकाश परांजपे, अशा अनेक सन्मा.सदस्यांनी या सभागृहासाठी चांगले आदर्श निर्माण केले

होते.  परंतू या अर्थसंकल्पामध्ये जमेच्या बाजूने काय बोलावे आणि खर्चाच्या बाजूने काय बोलावे आणि एकूण अर्थसंकल्पावर काय बोलावे असा प्रश्न आहे. मला आठवते ज्या वेळी सन १९९२ साली पहिल्यांदा या ठिकाणी नविन नगरसेवक म्हणून आलो होतो. त्यावेळी चर्चा करतांना माझ्या प्रभागातील एक व्यथा मांडली होती की, माझ्या प्रभागामध्ये मला गार्डन करायचे आहे मला दोन लाखाची आवश्यकता आहे. त्यावेळी श्री. प्रकाश परांजपे यांनी सांगितले की, तुझे भाषण तुर्तास थांबव. उदयाच्या भाषणात तु बोल आणि  माझ्याकडे ये. कारण दोन लाख रुपये तुला गार्डनसाठी खर्च करायचे असतील तर जमेच्या बाजूने दोन लाख तू कसे जमा करणार आहेस? त्याचे सुध्दा या ठिकाणी विश्लेषण झाले पाहिजे. मगच ख-या अर्थाने तू अर्थसंकल्पावर चर्चा करतोस अशाप्रकारचे या ठिकाणी चित्र निर्माण होईल. आणि म्हणून आपण बघतो की, आपली दोन दिवसापूर्वीची  अर्थसंकल्पाची जी सभा होती. ती सभा आपल्याला गणपूर्ती अभावी तहकूब करावी लागली. हा अर्थसंकल्प अर्थहीन आहे का, त्यात नगरसेवकांना रुची का नाही, नगरसेवक उपस्थित का राहत नाही, पक्षाच्या बैठका बंद झाल्या आहेत का,सर्वपक्षिय चर्चा संपल्या आहेत का, हे सगळे विचारात घेत असताना आपल्या सारख्या संस्थेच्या नेतृत्वाने, जेष्ठ नागरिकांच्या वतीने अर्थसंकल्पावर बाहेर चर्चा होत असताना या ठिकाणी नाराजीचा सुर अथसंकल्पाच्या माध्यमातून दिसतो. मा.महापौर महोदय, मी माझ्या प्रत्येक अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये मी माझी सूचन मांडली होती की, लोकसभेचा अर्थासंकल्प असू दे,विधानसभेचा अर्थसंकल्प असू दे, हे अर्थसंकल्प संपूर्ण देशभर टेलिकास्ट होतात आणि ते टैलिकास्ट होत असताना त्याच्यातून जे काही फायदे होतात, त्याच्यातून जी रुची निर्माण होते. त्यातून काही सूचना आपल्याला येतात. काहीवेळा चूकीच्या निर्णयाबाबत आपल्याला सूचना केल्या जातात. त्या सूचनांचा उहापोह व्हावा म्हणून डायरेक्ट लाव्हू टेलिकास्ट करावा जेणेकरुन या सभागृहाची वास्तविकता सूधारुन जाईल. या सभागृहामध्ये आपल्या प्रभागाचा नगरसेवक आपल्या विभागासाठी काय चर्चा करतो, काय मांडतोय, त्यावर महापौर या नात्याने, आयुक्त या नात्याने आणि प्रशासनाच्या माध्यमातून आपल्याला काय निर्णय मिळतोय. पेट्रोलची दरवाढ कमी झाली आहे हे किती लोकांपर्यंत पोहचणार आहे. सोन्याचे भाव वाढले का, जकातीबबात काय निर्णय घेतला आहे, स्वच्छता-आरोग्याबाबत काय निणर्य घेतलेला आहे. या तीन वर्षातील निर्णयापैकी १० टक्के  निर्णय नागरिकांपर्यंत पोहचलेले नाहीत. या ठिकाणी आपण जे अर्थसंकल्पाचे पुस्तक सादर केलेले आहे. या अर्थसंकल्पाच्या पुस्तकामध्ये जवळ जवळ २४ लोकापर्ण केलेल्या प्रकल्पाचे प्रमुख तपशिल दिलेले आहेत. यापैकी किती तपशिल ठाणेकर जनतेला टक्केवारीत माहित आहेत. मा.महापौर महोदय, त्याचे उत्तर नाही असे आहे. माझ्या बरोबर काही सदस्यांनी सुध्दा हे विचार मागच्या अर्थसंकल्पामध्ये मांडले होते की, हा अर्थसंकल्प टेलिकास्ट करावा कारण  महाराष्ट्रातील ही पहिली ठाणे महानगरपालिका असेल की, प्रशासक आणि सदस्य यांच्या प्रयत्नाने करोडो रुपयांचा निधी राज्य सरकार आणि केंद्र सरकारने आम्हाला दिलेला आहे. मग एखाद वेळेला दक्ष नगारिक, एखाद वेळेला पत्रकार जे आपल्या ठाणे महानगरपालिकेची बदनामी करण्याचा प्रयत्न करतात. आपल्या अधिका-यांबाबत वेडीवाकडी चर्चा करतात. आमच्या सदस्यांबाबत वेडीवाकडी चर्चा करतात. या अशा चर्चेला कुठेतरी पुर्णविराम मिळेल. आज अनेक चांगली कामे ज्या पध्दतीने आणि ज्या वेगाने आपण करतो आहोत त्या वेगाने प्रसिध्दी आपल्या नागरिकांपर्यंत पोहचत नाही. म्हणून दुसरी पारदर्शकता जो प्रकार असतो. जी पारदर्शकता आमच्या अर्थसंकल्पाची मी म्हणत नाही की, प्रत्येक महासभा टेलिकास्ट करावी. केली तर उत्तमच. परंतू शक्यतो अर्थसंकल्पाची मिटींग टेलिकास्ट करावी. असा एक मानस माझा आहे. मला वाटते की, सभागृह या गोष्टीला सहमती दर्शविल.

मा.महपौर महोदय, हे जे अंदाजपत्रकाचे पुस्तक आपण तयार केले आहे. ते असे तसे पुस्त क नाही ते बनविण्यासाठी प्रचंड मेहनत करावी लागते.  जे ख-या अर्थाने अर्थसंकल्पावर चर्चा करतात. ते श्री.

सावे साहेब असोत, महिलांमधील एक-दोन महिला सदस्या होत्या. हे जेव्हा अंर्थसंकल्पाच्या भाषणाच्या तयारीला लागतात त्यावेळी त्यांना कळते की यात किती मेहनत आहे. म्हणून हे पुस्तक बनवण्यामध्ये देखिल फार मेहनत आहे. यातील फोटो, यातील विशेष वैशिष्टये,आकडेमोड, हे सगळ एखादया चांगल्या लेदरच्या पाऊचमध्ये व्यवस्थीत पॅक करुन देण. यासर्व गोष्टी फारच महत्वाच्या असतात. या अर्थसंकल्पात प्रभाग समितीसंदर्भात जी कुरबुर आहे त्याबाबत मी मगाशी बोललो. आपली महानगरपालिका अचानक श्रीमंत झालेली महानगरपालिका आहे. मगाशी माझ्या मित्रानी सांगितले की, सन १९८४ सालच अर्थसंकल्प ५८ कोटीचा होता. आणि आज आम्ही १४०० कोटींवर पोहचतोय. मा.महापौर साहेब आणि मा.आयुक्त साहेब आपले ख-या अर्थाने कौतुक करावे लागेल कारण या अर्थसंकल्पाला सहमती दर्शविण्याचे भाषण करतोय. या अर्थसंकल्पाला विरोधक म्हणून आम्ही वेगवेगळी नांवे दिली असतील. परंतू या अर्थसंकल्पाला काय नांव दयायचे असा विषय आला तर त्या ठिकाणी प्रश्न चिन्ह निर्माण होईल. पण आयुक्त महोदय अचानक श्रीमंत झालेली महानगरपालिका मग तोडेसे कडू फार जास्त नाही. पण या सभागृहामध्ये वॉर्डाच्याबाबत प्रभागाबाबत चर्चा व्हायला नको. एवढी प्रचंड निधी असलेल्या अर्थसंकल्पामध्ये लहानसहान कुरबुरी आमच्या नगरसेविका आमचे नगरसवेक ज्यप्रमाणे करतात आणि या फक्त मोघम करत नाही. यासाठी आपल्या प्रॅक्टीकली नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. सर्वात लहान बाब म्हणजे सार्व.शौचालयाला असणा-या कडया-कोयंडे., दरवाजे, लाईट दिली असेल तर ती बंद झाल्यानंतर तिची मेंटनन्स कोण करणार हयाबाबत आज देखिल कोणत्याही विभागाकडे कबूली नाही की ते काम आम्ही करु. जेटींग गाडी आणि ॲब्यूलन्ससाठी १४०० कोटीचा अर्थसंकल्प असणा-या महानगरपालिकेकडे सदस्यांनी ओरडावे, पाण्याचे टँकर, मी फार शॉटकटमध्ये आणि लवकरच माझे अर्थसंकल्पावरील भाषण संपविणार आहे. मा.महापौर महोदय, या लहान-सहान तक्रारी ज्या तक्रारी आहेत त्याला कारण काय आहे? तर आमचे ॲडमिस्ट्रेशन,आस्थापना विभाग, मॅनेजमेंट,आणि आमच्या अडचणी कधीतरी संपणार आहे की, नाही ? प्रभाग समितीच्या प्रभाग अधिका-यांना काही तरी निधी उपलब्ध करुन देणार आहात की, नाही? आम्ही मुख्यालयात येऊन नगरअभियंत्यांशी काय चर्चा करायची तर आमच्या शौचालयाला लावण्यासा कडया दया. म्हणजे किती फारकत मा.आयुक्त साहेब आपल्याकडे देखिल बहुतांश सदस्य कडयांसाठीच येतात. प्रभागातील एका सदस्याची मागणी फार तर काय असू शकते. मोठया प्रकल्पाच्या संदर्भात आपण स्थिरतेने

काम करु शकत नाही. कारण आजूबाजूला आमच्या सारख्या लहान मुंग्या चिमटे काढत असतात. प्रशासनाला काम करु देत नाहीत. आणि म्हणून मा.महापौर महोदय, कुठेतरी या लहानसहान गोष्टींवर विरजण घातले पाहिजे. वर्षानुवर्षे त्या जेटींग आणि सक्शनगाडी साठी आम्ही ओरडतोय. मागच्या

सभागृहामध्ये आमच्या ताई या ठिकाणी बोलल्या. परंतू येरे माझा मागल्या. कचरा उचलण्यासंदर्भात टी.व्ही.वर दाखविले जाते सुका कचरा आणि ओला कचरा वेगळा दया. गाडी तुमच्या घराजवळ येईल सुका कचरा सुक्या कच-यात टाका आणि ओला कचरा ओल्या कच-यात टाका. मग तो डंपिंगला जाईल आणि तुम्हाला दुर्गंधी येणार नाही. कुठल्या प्रभागामध्ये अशी सिस्टीम आहे का ते हया सभागृहात सांगावे. मला या गोष्टीचे दुर्दैव वाटते. कारण आपण लोकांना दाखवितो मी कधीच असे म्हणणार नाही की एखादे काम १०० टक्के झाले पाहिजे. कारण ते होणारच नाही. पण माझी साधी अपेक्षा ७० टक्क्यांची असते. आमचे सदस्य नेहमीच ओरडत असतात की, कचरा वेचणा-या ज्या संस्था आहेत. त्यांना अनुदान देऊन त्यांना प्रेरीत करा. मा.महापौर महोदय, आपण खाली असताना ओरडलात आज आम्ही ओरडतोय. ही एक लहान गोष्ट आहे पण फार मोठी गोष्ट आहे. एखादया घरातील कचरा तेथून बाहेर गेल्यानंतर

त्याचे डंपिंग कुठे केले हा त्या घराचा त्या कुटूंबाचा प्रश्न नसतो. त्याच्या घरातून कचरा बाहेर गेला एवढेच तो बघत असतो. मा.महापौर महोदय, ज्या बेसिक गोष्टी आहेत त्या फरा महत्वाच्या असतात. मला आठवते राहुल गांधी, खासदारांनी त्या कलावतीचे उदाहरण दिले होते. त्याला कारणच असे होते की, आम्ही सर्व मोठया गोष्टी करत करत घरातील लहान-सहान गोष्टी विसरुन जातो. आणि म्हणून काही निर्णय मग तो हातगाडयाचा निर्णय असू दया, फुटपाथवरील टप-या चायनिजच्या गाडयांचा निर्णय असू दे, संस्थांना अनुदान देण्यासंदर्भात आपण वर्षानुवर्षे मागे पडलो आहोत. कोणीतरी कोर्टात किंवा शासन दरबारी तक्रार केली होती तेंव्हा पासून ते बंद आहे. आणि त्याचा त्रास आज सर्वसामान्य नगरसेवकांना होतोय. संस्थाना जर आपण अनुदान दिले तर ते सण साजरे करु शकतील. ते कार्यक्रम राबवू शकतील ही एवढी लहान गोष्ट आहे परंतू आम्ही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. नाले सफाईच्याबाबतीत वर्षातून दोन वेळा नाले सफाई करा याबाबत आम्ही वारंवार बोललो आहोत या ठिकाणी चर्चा झालेल्या आहेत परंतू आपण ब-याच मोठ मोठया गोष्टी करतोय म्हणून आज लहान गोष्टीबाबत बोलावे लागत आहे. लाला साहेबांनी अंडर ग्राऊंड ड्रेनेजचे काम फार मोठया प्रमाणावर वेगाने काम केले आहे. माझ्या प्रभागामध्ये आजूबाजूच्या प्रभागामध्ये फ ार चांगले काम झाले आहे. पंरतू ती लाईन एखादया घराला जोडण्याचे कामाकडे आपण लक्ष दिलेले नाही. ते काम कोण करणार कोणत्या निधीतून करणार? माझ्या प्रभागामध्ये संपूर्ण काम झाले आहे. त्यापुढे श्री. राम रेपाळेच्या प्रभागात,सौ.सांवतताईच्या प्रभागात काम चालू आहे. काम वेगाने सुरु आहे. परंतू हया लहानशा गोष्टीसाठी तेथील लोक आमच्या घरी रात्री जेवण झाल्यावर येतील आणि विचारतील ही लाईन आमच्या घराला कधी जोडणार? मा.आयुक्त साहेब या गोष्टीवर आपण कधी लक्ष देणार? अशाप्रकारच्या लहानसहान गोष्टी मोठया प्रमाणावर अर्धवट राहिल्या आहेत. अर्थसंकल्पाबाबत बोलताना आम्ही आमच्या प्रभागावरच चर्चा करतो. एखादया वेळेस टॅक्स जमा करण्याबाबत किंवा टॅक्स किती टक्के वाढले याबाबत कधी चर्चा होत नाही. चांगल्या संकूलांसाठी आम्ही चर्चा करत नाही. एखादाच नगरसेवक उठतो आणि सांगतो की, माझ्या प्रभागामध्ये मिनी स्टेडीयम बांधा. परंतू ९०% सदस्य शौचालयाला कडया लावा, दरवाजे लावा, साफ-सफाई होत नाही. कचरा वेहेवर उचलला जात नाही अशाप्रकारच्या तक्रारी करतात. आणि म्हणून आपण एक मोठी उडी मारत असताना, हया लहान कामावर लक्ष घालून त्या नियमामध्ये दैनंदिनीमध्ये बसवाव्यात अशी या ठिकाणी आपल्याला प्रार्थना आहे.

मा. महापौर महोदय, या ठिकाणी मी वागळेइस्टेट-रायलादेवी प्रभागाबाबत बोलणार आहे. लोकार्पण केलेल्या प्रकल्पाच्या प्रमख्र कामाच्या तपशिलामध्ये १२४ मध्ये पान क्रमांक ११ वर रायलादेवी आणि वागळेइस्टेट या प्रभागामध्ये एकही प्रकल्प प्रशासनाला किंवा आपल्याला करावा असे कधी जाणवले नाही आणि म्हणून आता माझे मित्र सदस्य बोलले की, घरी एक काळा आणि गोरा मुलगा जन्माला तर त्यात समानता असायला पाहिजे. पण आपण मुंब्रा-कौसाकडे जास्त लक्ष केंद्रीत केले आहे. तिथे सध्या दोन-दोन आमदार आहेत. चांगला मोठा प्रोजेक्ट बांधताय. पण आमच्याकडे एक लहानसे संकूल असावे. सर्व नगरसेवकांना एकत्र घेऊन बसून त्या भागासाठी आम्ही काय करु शकू याबाबत चर्चा व्हावी. मा. महापौर महोदय, आपण अर्धवट प्रकल्पाच्या संदर्भामध्ये जर चर्चा केली तर आपले अर्धवट प्रकल्प कितीतरी राहीले आहेत. एकात्मिक नाले विकास प्रकल्पा अंतर्गत किती टक्के काम झाले आहे? याचा आढावा कोणी घेत आहे का? कारण तत्कालीन महापौर श्री. राजन विचारे यांनी सांगितले होते की, ज्या ठिकाणी एखादी इमारत आडवी येईल,झोपडी किंवा स्ट्रक्चर आडवे येईल त्या त्या ठिकाणी आम्ही सदस्य जाऊन तुम्हाला नाला रुंद करायला मदत करु. परंतू आज देखिल त्याबाबत कुठलाही

निर्णय नाही.  कोपरी रेल्वे ब्रिजचा प्रकल्प असाच अर्धवट राहिलेला आहे. हे अर्धवट प्रकल्प आपल्याला कलंकीत करत असतात आणि हे कोणाच्या तरी चुकीने
अर्धवट राहतात हे देखिल मी या ठिकाणी मान्य करतो. परंतू याबाबत संपूर्ण आढावा घेतला पाहिजे. कारण रिंग रेल्वे सारख्या प्रकल्प अर्थसंकल्पाची संपूर्ण पाने मी वाचलेली नाहीत. रिंग रेल्वेचा आपण सर्व्हे करुन वर्षे झाली.  मला वाटते महाराष्ट्रात पहिला सर्व्हे हा ठाण्यात झाला असेल. आपल्या मागून मुंबई

महानगरपालिकेने उडी घेतली आणि  मोनोरेल,रिंग रेल, मेट्रो रेल त्यांच्याकडे उद्‌घाटनाच्या दरात आहेत. मा.आयुक्त साहेब, मी तुम्हाला चतुरच म्हणेन कारण ज्याप्रमाणे अपण ठाणे महानगरपालिकेला निधी उपलब्ध करुन दिला. ही ठाणे महानगरपालिका आपल्याला विसरु शकत नाही. ज्याप्रमाणे तत्कालीन आयुक्त श्री. चंद्रशेखर साहेबांनी ठाण्यातील रस्ते रंदीकरण करुन आमच्या शहराचा रेट वाढवला. त्यांना आम्ही विसरु शकत नाही त्याप्रमाणे हया शहरासाठी आपण जो निधी आणला त्याबाबत आम्ही आपाल्याला चतुर समजून यापुढेही आपल्याकडे अपेक्षेने बघत आहोत. ज्याप्रमाणे रोड झाले म्हणून ठाणे शहराचा रेट वाढला. आणि म्हणून अजून एक उडी मारायची असेल तर लाला साहेब या ठिकाणी मोनोरेल,मेट्रोरेलची फार आवश्यकता आहे. कारण काहीतरी नविन असल्याशिवाय कोणी या ठिकाणी येत नाही. या शहरामध्ये काल परवापर्यंत एखादा मोठा बिल्डर आमंत्रण देऊन देखिल यायला तयार नव्हता आणि आता स्वत:हून बिल्डर येत आहेत. मुंबईने पहिला क्रमांक पटकावला असला तरी आपण दुसरा क्रमांक पटकवावा अशी इच्छा जर मा.महापौर महोदय, मी आपल कारर्किदीमध्ये व्यक्त केली. ज्याप्रमाणे या सभागृहात उपस्थित सदस्यांचे वजन आप-आपल्या पक्षामध्ये आहे. त्याप्रमाणे मा.आयुक्त साहेब, आपले वजन देखिल केंद्रामध्ये चांगल्याप्रकारे आहे. त्याचा आपण वापर करुन ही रिंग रेल्वे,मोनोरेल या ठिकाणी आणली तर खऱ्या अर्थाने आपण आपला उच्चांक गाठू आणि विकासाच्या माध्यमातून देखिल आपला रेट वाढेल असे मला वाटते.

मा. महापौर महोदय, धोकादायक इमारतींच्या संदर्भामध्ये घोडे कुठे आडले आहे? आमचे आमदार मित्र मा.जितेंद्र आव्हाढ साहेब, श्री. प्रताप सरनाईक, श्री.एकनाथ शिंदे साहेब या सर्वांनी या संदर्भात जो पाठपुरावा केलेला आहे.  त्याबाबत माझी एक विनंती राहिल की,  आपण या संदर्भामध्ये मा.सभागृह नेता,विरोधी पक्षनेता,गटनेता, मा.आयुक्त साहेबांसमवेत मा.मुख्यमंत्र्यांची भेट घेतली तर असे हे दोन-तीन विषय रिंग रेल्वे,धोकादायक इमारती असे विषय हातासरशी निघुन जातील. आपल्याकडे बरेच काम पडलेले आहे. पंरतू आपली मानसिकता कुठटेतरी अडकून आहे. मी आपल्याला प्रोत्साहीत करण्यासाठी या ठिकाणी भाषण करतोय. कारण मला माहित आहे की,सॅटीस सारख्या एखादा प्रकल्प करताना अनंत अडचणी त्या ठिकाणी येत असतात. त्या अडचणी महापौरांना येतात प्रशासनालाही येतात आणि आपण त्या ठिकाणी अडकून राहतो. कधी आम्ही नगरअभियता यांच्या केबीनमध्ये जातो कधी मा.आयुक्त साहेबांना भेटतो. त्यावेळी त्यांना बरेच काही करायचे असते. परंतू काही नागरिक असे असतात की, त्यांना आपण डी नागरिक म्हणू किंवा अजून काही म्हणू. त्यांच्या प्रश्नाला उत्तरे देण्यासाठी मा.आयुक्त साहेब मला असे वाटते की, एक स्वतंत्र असे गोडबोल्याचा एक कक्ष तयार करा आणि तुम्ही आणि महापौर साहेब तुम्ही देखिल या ठिकाणी अडकू नका. आपण आपला प्रोजेक्ट घेऊन चला. कारण या सभागृहाने आजपर्यंत कुठल्याही प्रोजेक्टमध्ये राजकारण आणलेले नाही.  इतर महानगरपालिकेमध्ये मी पाहिलेले आहे. अनेक ठिकाणी निरिक्षक म्हणून जातो. मी त्या ठिकाणी पाहिलेले आहे प्रत्येक प्रोजेक्टमध्ये राजकारण असते. परंतू ठाणे महापालिका अशी महापालिका आहे की, जी कुठल्याही प्रोजेक्टमध्ये राजकारण आणत नाही. वेळ आली तर प्लेन सात वाजताचे असेल तर सहा वाजता मंजूरी

दिलेले हे सभागृह आहे आणि म्हणून महापौर महोदय, लहान- सहान कटकटी ज्याला तुम्ही आम्ही कटकटी म्हणू ज्यांचा ख-या अर्थाने नगरसेवकांना त्रास होतो. तो एक भाग. आपण प्रभाग समित्या का निमार्ण केल्या त्या ठिकाणी आपण उप आयुक्त का नेमले आहेत आणि ते उपआयुक्त त्या ठिकाणी काय काम करतात. याचा आपल्याला अभ्यास करायला पाहिजे कारण आपण सदस्य आहात आपल्याला जाणवत असेल की, आमचे अधिकारी आणि नगरसेवक या ठिकाणी प्रवेश करतात किंवा नोकरीला लागतात. त्यावेळी ते आरोग्याने उत्तम असतात. परंतू त्यानंतर महिना भरामध्ये कोणाली बी.पी.चा त्रास तर कोणाला डायबिटीसचा त्रास सुरु होतो. त्याला कारण आहे सर्व सामान्य नागरिक नगरसेवकाला रात्री बाराबारा,दोन-दोन वाजेपर्यंत जाब विचारण्याचा अधिकार ठेवतो. आणि काही विचित्र लोक अधिका-यांना देखिल झोपू देत नाहीत. रात्री फोनवर एसएमएस करत असतात. फोन करुन त्रास देत असतात आम्हा नगरसेवकांना त्याची सवय झालेली आहे. रात्री अपरात्री मोर्च्यांना समोरे जायची. पंरतू अधिका-यांना आपण सांगावे की सहा-सात नंतर तात्काळ असेल अतितात्काळ असेल तर ठिक आहे नाहीतर अशा लोकांचे फोन टाळा आणि आपल्या संसारामध्ये सुखी राहून सकाळी चांगल्या कामाच्या मूडमध्ये रहा. मा.महापौर महोदय, अर्धवट पकल्पातील स्काय वॉक हा जो प्रकल्प आहे. त्याचा या सभागृहात आपण डेमो दाखविला होता. परतू त्या कामाने अजून स्पीड घेतलेला नाही. कोपरीमध्ये या कामाची सुरुवात केली गेली. पंरतू ज्या गतीने ती सुरुवात केली आहे ती गती मला तरी मान्य नाही. कारण अशाप्रकारचे मुंब्रा भागामध्ये माजिवडा भागामध्ये वागळेइस्टेट भागामध्ये एका वेळेला याची सुरुवात झाली पाहिजे. याबाबत आपण लक्ष घालावे.

मा.महापौर महोदय, या ठिकाणी स्मशानभूमी संदर्भात देखिल या ठिकाणी नेहमी चर्चा होते. आमचे नगरसेवक नेहमी उदाहरण देतात की, इतर महापालिकेमध्ये अंत्यविधी हया फुकट केल्या जातात. अर्थसंकल्पाचे भाषणात याबाबत कोणीही उल्लेख केला आहे की एखादया गरीबाकडे अंत्यविधीसाठी पैसे नसतात. म्हणून मी आपल्याला पत्र देत आहे की, माझ्या प्रभाग निधीमधून अंत्यसंस्कार विधीसाठी लागणारे रॉकेल आणि लाकूड हयासाठी जर आपल्याला अर्थसंकल्पामध्ये तरतूद करता येत नसेल तर माझ्या प्रभाग निधीन घेण्यात यावे. मला अशा आहे आपण अर्थसंकल्पामध्ये तरतूद कराल . ज्याप्रमाणे पेट्रोलचे दर कमी करण्याबाबत एका वर्षी सांगितले होते ते दुस-या वर्षी कमी झाले असे न होता आपण हयाचा गंभीरतने विचार करावा. अन्यथा माझ्या निधीन करावे असे मी या ठिकाणी सूचित करत आहे.

मा.महापौर महोदय, तलाव सुशोभित करण्याच्या दृष्टीकोनातून आपण ज्या भागामध्ये राहता, ज्या भागाचे आापण नेतृत्व करता वागळे-रायलादेवी त्या भागातील रायलादेवी तलाव आहे त्याच्याकडे आपण कानाडोळा करु नये. कारण ठाणे महापिलका कार्यक्षत्रातील बरेचसे तलाव सुशोभित सुंदर चागल्या स्थितीत करण्याचा मानस या सभागृहाने पूर्ण केला आहे. रायलादेवी तलाव देखिल यावर्षी कराल असे मला वाटते.

मा.महापौर महोदय,मा.आयुक्त साहेबांनी अनेक सदस्यांच्या मागणीवरुन वागळेइस्टेट आणि रायलादेवी जो भाग आहे याच्यामध्ये एमआयडीसी आहे, फॉरेस्ट विभाग आहे, आपण प्रयत्न करुन त्या ठिकाणी घरांची योजना राबविण्याचा मानस आपण सन्मा.मुख्यमंत्री श्री. अशोकजी चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आपण मंजूर करुन आणला. माझी या सभागृहाला विनंती अहे की, ज्याप्रमाणे आपण ठाणे शहरातील झोपडपट्टया डेव्हलप करण्याच्या दृष्टीकोनातून काहीतरी टेंडर काढले होते त्यापैकी दोन-तीन टेंडर काढायचे अजून बाकी आहेत. मुंबईमध्ये जो एसआरए जो होते त्याबाबत आपल्या माहिती आहे की, मोठ-मोठे बिल्डर आणि झोपडीदादा अशा चौकशीमध्ये त्या ठिकाणी अनेक एसआरए अडकलेले आहेत. तरी तशाप्रकारचे कुठलेही वेगळे वळण या आमच्या भागाला लागू नये म्हणून महापालिकेने एक

एमआयडीसीला एक प्रस्ताव दयावा की, यासर्व बाबतीत ठाणे महानगरपालिकेला अधिकार दयावेत आणि आम्ही ते टेंडर काढून त्याप्रमाणे विकास करु. कारण काही बिल्डर घरोघरी फॉर्म वाटप करत आहेत आणि तो भरुन पुन्हा आमच्याकडे परत करा असे सांगत आहेत. मात्र लोकांना कुठल्याही प्रकारे मार्गदर्शन होत नाही. लोकांना योग्य मार्गदर्शन होणे गरजेचे आहे.

मा. महापौर महोदय, आपल्याकडे काही प्रोजेक्ट हत्तीला पोसण्यासारखे आहेत. मग ते छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय असो, स्टेडीयम असो, मी या ठिकाणी सभापतींचे आणि आपले या ठिकाणी नक्कीच कौतुक करेन की, आपण स्टेडीयमचे खाजगीकरण करण्याचा मानस दाखवला आहे. मा.महापौर महोदय, शिवाजी महाराज रग्णालयाच्या बाबतीत संपूर्ण अभ्यास करावा लागोल कारण मी आता म्हणणार नाही की त्याचे खाजगीकरण करावे. परंतू या रुग्णालयाची परिस्थिती सुधारण्याची फार गरज आहे. कारण आम्ही सदस्य म्हणून या रुग्णालयाची तुलना सिव्हील हॉस्पीटलशी करण्याचा प्रयत्न करत असतो. कारण ज्याच्या जवळ आम्ही आहोत ते रुग्णालय आम्ही व्यवस्थीत सांभाळू शकत नाही परंतू राज्य सरकार सिव्हील हॉस्पीटल चांगल्याप्रकारे सांभाळू शकते अशाप्रकारचे चित्र या ठिकाणी निर्माण झ्ााले आहे. त्यामुळे या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाबाबत सतत ज्या तक्रारी होत असतात त्या थांबविण्याचा प्रयत्न आपण करावा. ा.महापौर महोदय, आपल्याकडील सुरक्षा व्यवस्थेबाबत अर्थसकल्पाच्या बैठकीपूर्वीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली होती. मा.आयुक्त साहेबांनी काही कारवाई देखिल केली. त्यानंतर मी थोडासा अहवाल घेतला आहे. मा.आयुक्त महोदय, आपल्या ठाणे महानगरपालिकेसाठी साधारणत: ५०० सुरक्षारक्षकांची आवश्यकता आहे. परतू आजच्या घडीस आपल्याकडे १७० सुरक्षरक्षक आहेत. त्यापैकी १५-२० जण आता नजिकच्या काळात सेवानिवृत्त होणार आहेत. त्यानुसार आपल्याला जवळ जवळ ३५० रिक्त पदे भरायची असतील आणि मी त्यांच्याकडून ठाणे महानगरपालिकेची सुरक्षा चांगल्याप्रकारे पाहिजे म्हणून अपेक्षा केली तर ते शक्य नाही. म्हणून याबाबत विचार करत असताना मी आपल्याला सूचना करतो की, ज्याप्रमाणे आपण गडकरी रंगायतनमध्ये सी.सी. टी.व्ही.बसविल्यामुळे त्या ठिकाणी जी घटना घडली त्यातील काही लोक पकडले गेले ते त्या सी.सी. टी.व्ही. मुळे शक्य झाले. मी बँकॉक देशात गेले होतो. त्याठिकाणी रस्त्यावर एकही हवालदार नाही. पण ज्यावेळी मी सिग्नल तोडून क्रॉस करत होतो. तितक्यात एक हवालदार आला आणि म्हणाला तुम्ही आलात कोठून? त्या ठिकाणी सी.सी. टी.व्ही. होते त्यांनी मला सिग्नल तोडतांना त्या टी.व्ही. मध्ये पाहिले होते. म्हणून या ठाणे महापालिकेच्या संपूर्ण इमारतीमध्ये सी.सी. टी.व्ही.चे प्रयोजन केले तर आणि त्या सी.सी.टी.व्ही. मध्ये सर्व जकात नाक्यांचे सी.सी. टी.व्ही. आणि आपल्या इतर वास्तूंच्या सी.सी.टी.व्ही. चे कनेक्शन आपण या ठिक्ाणी कंट्रोल केले तर आपल्याला अपेक्षित असलेली सुरक्षा आणि इतर ज्या गोष्टी आहेत त्या सफल होतील. मा.महापौर महोदय, सी.सी. टी.व्ही. फार महाग वस्तू नाही. जो खर्च आपल्याला एखादया सरुक्षारक्षकावर करायचा आहे त्याचा अर्धा खर्चात हे सी.सी. टी.व्ही. घेऊ शकतो. त्यामुळे आम्ही सदस्य म्हणून जे म्हणतो याला सोडले त्याला सोडले नाही ते आरोप होणार नाहीत. एखादया संघटनेने किंवा एखादया पक्षाने या ठिकाणी आंदोलन केले तर त्यामध्ये कोण लोक होती, कोणी कोणी काय-काय कृत्य केली आहेत त्याच्यावर काय कारवाई करायची ते अधिकृतरित्या आपण करु शकतो. त्यामुळे ज्या अतिरेक्यांनी आपले हे मुख्यालय टारगेट केले आहे त्यांना देखिल वचक राहिल. या ठिकाणी वेडीवाकडी आंदोलने करणा-या संघटना असतील अशा संघटनांना देखिल आळा बसेल. त्यामुळे मी केलेली ही मागणी आपल्या ठाणे महानगरपालिकेला उपायुक्त आहे असे मला वाटते. त्यामुळे तात्काळ कार्यवाही करावी अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

मा.महापौर महोदय, खर्चाच्या बाबतीत मी बरच बोलालो आहे. आता थोडस जमेच्या बाजूने मी बोलणार आहे.

मा.महापौर महोदय, दरवेळेला जमेच्या बाजूने सदस्य आपल्याला मार्ग सुचवितात की आमच्या भागात झोपडपट्टी आहे. त्या झोपडपट्टीतून टॅक्स वसूल केला जात नाही. आमच्याकडील इमारतीमध्ये ४-५ लाखाचा टॅक्स बाकी आहे. एका हेकेखोर माणसामुळे सर्व लोकांचा टॅक्स घेतला जात नाही. म्हणून त्या भागात एखाद दिवशी कॅम्प लावावा. किंवा घरोघरी जाऊन टॅक्स वसूली करावी. जेणेकरुन आमच्या जमेमध्ये २० ते २५ % वाढ होईल. कारण यापूवी असा प्रयत्न केला गेला होता आणि तो सफल देखिल झ्ााला होता. काही कॉलेजचे तरुण देखिल या कामामध्ये सामिल झाले होते. असे जर केले तर आपल्या जमेमध्ये चांगलीच वाढ होईल. जकातीबाबत बोलायचे तर मला असे कळ्ले आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातून जकात काढण्याचे काहीतरी चालू आहे. पुढे आपल्यावर जर अशाप्रकारचे भयानक स्थिती आपल्यावर ओढावाली तर आपण तिला कसे सामोरे जाणार आहोत याबाबतच्या उपाययोजनेबाबत आपण लवकरच गटनेत्यांची मिटींग बोलावावी. कारण आपला मुख्य भरणा जो आहे तो जकातीमधून आहे आणि त्याबाबत लवकरच विचार व्हावा असे वाटते.

अतिक्रमणाबाबतच्या चर्चेमध्ये एका नागरिकांनी सांगितले की, तुम्ही ज्याप्रमाणे पाण्याचे बील भरा म्हणून मागे लागता त्याप्रमाणे अतिक्रमण तोडल्यानतंर त्याचे पैसे भरा म्हणून मागे लागत नाहीत. आपण अतिक्रमण तोडण्याची प्रक्रिया जेवढया प्रकर्षाने करतो तेवढया प्रकर्षाने दंडाची फी वसूल करत नाही ती करावी अशी विनंती मी करतो.

मा.महापौर महोदय, जवळ जवळ १० वर्षापूर्वी आपल्या शहरात बेसमेंटमधील हॉटेलला आग लागली होती. त्यावेळेच्या तत्कालीन महापौरींन आदेश काढून देखिल बेसमेंटमध्ये जी हॉटेल आहेत त्या हॉटेलमध्ये आज देखिल सर्रास व्यवसाय चालू आहे. अशा हॉटेलमध्ये पुन्हा र्दुघटना होऊ शकतो याबाबत देखिल आपण जातीने लक्ष दयाल अशी आपेक्षा करतो.

त्याचप्रमाणे ज्या मॉल्सना अंडरग्राऊंड बेसमेंटमध्ये पार्किंगची मुभा दिलेली आहे. ती पार्किग व्यवस्था त्याठिकाणी फ्री दिली पाहिजे पण त्या ठिकाणी पार्किगची आकारणी करतात. त्याबाबत मागे प्रशासनाने कारवाई केली होती परतू ती मोघम कारवाई होती. आजही आपल्याकडे जेवढे मॉल आहेत त्या ठिकाणी १५-२० रुपये पार्किंगसाठी मोजावे लागतात. तरी याबाबत लक्ष घालावे. त्याचप्रमाणे सर्व्हीस रोडवरील पार्किंगच्याबाबतीत सुध्दा या ठिकाणी चर्चा करण्यात आली. आज आपल्या समोर जो पार्किंगचा प्रश्न आहे आणि जो भविष्यात देखिल आपल्याला भेडसावणार आहे. तो एवढया भयानक आहे की, त्याच्याबाबतीत आज आपल्याला निर्णय घेणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, मी या ठिकाणी अजून जास्त काही बोलणार नाही. परंतू आपल्यामध्ये पत्रकार हा चौथा स्तंभ असतो. आणि त्या काही पत्रकार ख-या अर्थाने दक्ष नागरिकांचे काम करत असतात. आपल्याला सूचना करत असतात. परंतू आजच्याच पेपरमध्ये बातमी आहे की, सॅटीसचा जो ब्रीज बांधलेला आहे. त्याच्या खाली पुन्हा गाडया लागलेल्या आहेत. तरी आपण ती कारवाई का करु शकत नाही ? जर त्या ठिकाणी रोज गाडया उभ्या राहणार असतील तर सॅटीस उभारुन काहीच उपयोग नाही. अशाप्रकारची मानसिकता जर नागरिकांच्या मनामध्ये रुजली तर ते चुकीचे होईल. याबाबत कोठल्याही राजकारणाला उभे न करता प्रशासनाने ठोस कारवाई करावी ज्याप्रमाणे इतर ठिकाणी केली जाते त्याप्रमाणे करावी. मा.महापौर महोदय, काही वेळेला अनेक चांगल्या गोष्टी निदर्शनास येतात. परंतू त्याच्या चर्चा या सभागृहात आपण बंद केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने चर्चा करण्याची मुभा सुध्दा आपल्या अधिपत्याखाली दयावी. आणि मा.आयुक्त महोदय, त्याची आपण कुठेतरी नोंद घेऊन त्याबाबत

चांगल्याप्रकारे निर्णय घ्यावा.  आणि सन २०१०-२०११ चा अर्थसंकल्प अतिशय सुरेख विचार करुन बनविलेला आहे. ज्या काही सूचना मी केल्या आहेत त्याबाबत आपण विचार विनिमय कराल आणि जो नगरसेवक आरोग्याने सुदृढ असेल त्याचे आरोग्य धोक्यात येणार नाही, त्याला त्रास होणार नाही. आम्हाला टेंशन देणार नाही आणि आपणही टेंशन घेणार नाही.  आपल्याला शुभेच्छा देतो आणि हा अर्थसंकल्प ख-या अर्थाने आपण संकल्पात उतरवाल आणि रिंग
रेल्वे सारखा जो मोठा प्रोजेक्ट मी आपल्याला सांगितला आहे तो आपण विचारात घ्याल. कारण आयुक्त साहेब आपण एखादी गोष्ट विचारात घेता ती साम,दाम,दंड,भेद वापरुन पूर्ण करता याचे मला ज्ञान आहे आपण त्यात चतुर आहात. आपल्याला शुभेच्छा. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.. ..

**श्री. अनिल सावे :-**

मा.महापौर महोदय, मी गेली १३ वर्ष या सभागृहात आहे आणि सन्मा.सदस्य श्री.मनोज शिंदे हे सन १९९२ पासून या सभागृहात आहेत. कित्येक वर्षानंतर ते आज चांगले बोलले आहेत. त्यांचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो.

मा. महापौर :-

आजची सभा येथे खंडीत करण्यांत येत असून या पुढील सभा मंगळवार दिनांक ३० मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता घेण्यांत येईल.

मा. सचिव :-

मा.महापौर महोदय, मा. कोकण विभागीय आयुक्तांचे मान्यतेनुसार आपल्याकडील प्रभाग समिती अध्यक्ष पदाच्या निवडणूकीसाठी  मा. श्री. ज-हाड साहेबांची पिठासिन अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे. त्यानुसार मंगळवार दिनांक ३० मार्च रोजी  नऊ प्रभाग समिती अध्यक्ष पदाची नामनिर्देशन पत्र स्विकारायची आहेत.  त्यानुसार आताच मा.महापौर महोदयांनी मंगळवारी सकाळी १०.३० वाजता महासभा घेण्याचे घोषित केले आहे. त्यानुसार मा.महापौर महोदयांचे मान्यतेने आपण जेवणापूर्वी एक तास किंवा ते वेळ देतील त्यावेळेमध्ये नऊ प्रभाग समित्यांचे नामनिर्देशन फॉर्म स्विकारु.

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, जेष्ठ नाटयकर्मी  आणि निर्माते श्री. मोहन वाघ यांचे काल दु:खद निधन झ ाले आहे. एका श्रेष्ठ नाटयकारास आपण आज मुकलो आहोत. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभण्यासाठी या महासभेने दोन मिनिटे स्तब्धता पाळावी ही विनंती.

(तद्नंतर मृतात्म्यास श्रध्दांजली अपर्ण करुन मा.महापौर सभा संपल्याचे जाहिर करतात.)

सही/- श्री. अशोक बारकू वैती,
महापौर,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**सही/-**
**(सौ. छाया मानकर)**
**महापालिका सचिव**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**सभा खंडीत केल्याची वेळ- रात्री ९.०० वा.**
**दिनांक :-२६/०३/२०१०**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**